आर्थिक । राजकीय । सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

शेतकरी संघटक

२१ सप्टेंबर २०११ । वर्ष २८ । अंक १२

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

कांद्याचा भडका

कितीदा पेटणार?
किती दिवस पेटणार?



शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १२ । २१ सप्टेंबर २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
सुरेशचंद्र म्हात्रे

कार्यकारी संपादक
श्रीकांत उमरीकर

सल्लागार संपादक
डॉ. मानवेंद्र काचोळे
डॉ. गिरधर पाटील

साहाय्यक संपादक
ज्ञानेश्वर शेलार

मुखपृष्ठ/अंक मांडणी
श्रीकांत झाडे

वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ

(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)

संपर्क : कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

अंतरंग

मुद्दा
अण्णा हजारेंचे डावे विरोधक- आपुले मरण पाहिले म्या डोळा
अजित नरदे ३

जागरण
सहकाराची साखर फक्त नेत्यांसाठी गोड
श्रीकृष्ण उमरीकर ८

आजकाल
कांद्याचा भडका, कितीदा पेटणार?, किती दिवस पेटणार?
ज्ञानेश्वर शेलार १०

मुद्दा
भू-संपादन बिलाचे मायाजाल- भाग २
ॲड. अनंत उमरीकर १३

मधोमध
गणपती बाप्पा पुढच्या वर्षी थोडा उशीरा ये रे बाबा...
दत्ता जोशी १६

कॉमन नॉन सेन्स
आंदोलनाने उभे केलेले प्रश्न
सुधाकर जाधव १९

वाङ्मय शेती
सत्ता स्थळ हेच भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र : उत्तरार्ध
गंगाधर मुटे २३

(उ)संतवाणी
रोजचाल विधेयक
'थंडा' महाराज देगलूरकर २६

अभिजात वाङ्मय
गोदान
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर २८

शेतकरी संघटना वृत्त ३२

कांद्याचा पॉलिटीकल लोचा!

कांद्यावर काय आणि कसं लिहावं हेच आता कळेनासं झालं आहे. गेल्या किमान ३२ वर्षांपासून या प्रश्नावर शेतकरी चळवळीने सातत्याने आंदोलनं केली आहेत आणि तरीही राज्यकर्ते सातत्याने कांद्याची हेळसांड करत आहेत. यावेळेसचं चित्र तर मोठंच गंमतशीर आहे. पिंपळगाव बसवंतला रस्त्यावर उतरलेल्या शेतकऱ्यांबरोबर राष्ट्रवादीचे खासदार समीर भुजबळ आणि काँग्रेसचे राज्याचे कृषीमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हेही उतरले होते. शेतकऱ्यांनी त्यांच्या गळ्यात कांद्याच्या माळा घातल्या. हेपण निर्लज्जपणे 'केंद्रशासन या प्रश्नावर राज्याला विचारात घेत नाही,' असली उत्तरे द्यायला लागले आहेत. खा. समीर भुजबळ, आ. पंकज भुजबळ आणि माननीय नामदार छगन भुजबळ यांनी टीव्हीच्या दांडक्यापुढे असलेलं आपलं तोंड आपले राजकीय श्रेष्ठी शरद पवार बारामतीकर यांच्याकडे का नाही केलं? सर्वसामान्य शेतकरी चिरडीला येऊन रस्त्यावर उतरत होता. त्याच्या रेट्यामुळे अपरिहार्यपणे यांनाही रस्त्यावर यावं लागलं, मग हाच जोर आपल्या श्रेष्ठींसमोर का नाही दाखवला. केंद्र राज्याला विचारात घेत नाही, असं कुठल्या तोंडानं राधाकृष्ण विखे सांगत आहेत. पृथ्वीराज चव्हाण यांना इतकी वर्षे दिल्लीला राहिल्यावर दिल्लीची कामकाजाची पद्धत ओ की ठो माहीत नाही असं समजायचं की काय?

आता नेमकं काय केलं म्हणजे राज्यकर्त्यांना कांदाप्रश्नी अक्कल येणार आहे. श्रावणातच काय; पण त्यानंतरचे तीन महिने म्हणजे चातुर्मासात भारतात कांद्याचा वापर लक्षणीयरीत्या घटलेला असतो. या कांद्याला भारतामध्ये ग्राहक मिळण्याची शक्यता नाही. मग हा कांदा अडवून सरकार नेमकं काय साधत आहे? उद्या जर कांद्याचे भाव वाढले, तर त्यातून असं काय नेमकं घडणार आहे, की जेणेकरून सरकारने निर्यातबंदीची कुऱ्हाड शेतकऱ्यांवर चालवली असावी.

अण्णा हजारेंच्या आंदोलनानंतर एक सकारात्मक चित्र दिसण्यास सुरुवात झाली आहे. लोकक्षोभामुळे तसेच लोकांच्या दबावामुळे लोकप्रतिनिधींनाही मनात नसताना जनआंदोलनात उतरावं लागत आहे. किंबहुना आपणही लोकांच्या पाठीशी आहोत, हे निदान दाखवावं तरी लागत आहे. म्हणजे हा एक पॉलिटीकल लोचाच झाला. छगन भुजबळ आणि त्यांची पिलावळ यांना हे पक्क माहीत आहे- कांदा प्रश्नी आपण काहीच केलं नाही, तर हे आपले शेतकरी भाऊ आपला वांधा केल्याशिवाय राहणार नाहीत आणि एकदा का आपले आपल्या मतदार संघातून पंख कापल्या गेले तर आपले राजकीय श्रेष्ठी माननीय शरद पवार बारामतीकर हे आपल्याला कुठलीही मदत करू शकणार नाहीत. मग निदान लोकांमध्ये उतरून काहीतरी केलेलं बरं... या उद्देशानं हे सगळं चालू आहे. राधाकृष्ण विखे पाटलांची तर मोठीच अडचण... सहकाराचं माहेरघर असलेला नगर त्यांचा जिल्हा. सहकाराची चळवळ त्यांच्या आजोबांनी जन्माला घातली. ती अख्खी चळवळ व्यवस्थित पचवून त्यांचे सगळे आप्तस्वकीय, पक्षातील सहकारी, मित्रपक्षातील सहकारी- सगळ्यांनी ढेकर दिला आहे. इतकंच नाही, आपणच सहकारात बुडवलेले कारखाने परत आपणच भंगार भावात विकत घेऊन, परत स्वत:ची चांदी केली आहे. आजपर्यंत सहकाराचं गाजर दाखवून तमाम जनतेला भुलवता येत होतं. आता कळतंय की यातून फक्त यांचीच पोटं भरली हे स्वच्छपणे समोर आलं आहे. मग आता करायचं काय? आपण कुणब्याच्या पोटी जन्माला आलो; पण कुणब्याच्या पाठी रट्टा दिल्याशिवाय आपला दिवस मावळला नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना तोंड द्यायचं आहे. विधानसभा राहिली दूर; पण या मिनी विधानसभेमध्ये तमाम शेतकरी मतदार आपल्या पाठीत रट्टा दिल्याशिवाय राहणार नाही. त्यात परत अण्णा हजारेंनी निर्माण केलेला लोचा अजूनच मोठा. विखेंच्या जिल्ह्यातच अण्णांनी जनआंदोलनाचं यज्ञकूंड पेटवून ठेवलं आहे. त्याचे चटके विखे आणि त्यांच्या तमाम भाईबंदांना बसणारच. काहीच न करता, कुठलेच गाडी-घोडे मॅनेज न करता, खाण्यापिण्याची कुठलीच सोय न करता, हजारो लाखोंनी माणसं अण्णांनी रस्त्यावर आणली. अगदी खेड्या खेड्यातसुद्धा लोक रस्त्यावर आले, यामुळे भुजबळ असो की विखे असो यांचे डोळे पांढरे झाले आहेत. एक सरळ साधा आणि स्वच्छ संदेश आता सगळ्यांपर्यंतच पोहोचला आहे. सर्वसामान्य लोकांना फार काळ गृहीत धरून चालणार नाही. तुमच्या गाडी घोड्यांचा, तुमच्या बंगले -मांड्यांचा जाब सर्वसामान्य माणूस विचारू पाहत आहे. त्याला उत्तर काय देणार? मग यापेक्षा सोय म्हणून लोकांबरोबर थोडावेळ रस्त्यावर बसलं तर काय चाललंय? असा विचार करून विखे आणि भूजबळ कंपनी कांद्यासाठी रस्त्यावर आली.



शिवसेनेने कांदा प्रश्नी भूमिका घ्यायला सुरुवात केली आहे. कांदा जमिनीत पिकतो का जमिनीवर पिकतो याची ज्यांना माहिती नव्हती त्यांनीही कांद्यासाठी आंदोलन करावं याला काय म्हणणार? याचा अर्थच असा - सत्ताधारी असोत की विरोधक सर्वसामान्यांच्या रेट्याची आता यांना चांगलीच आच पोहोचत आहे. खरे तर हे लोकशाही प्रगल्भ झाल्याचंच लक्षण मानावं लागेल. अण्णा हजारेंचं उपोषण १३ दिवसांत संपलं म्हणून ठीक अन्यथा जागोजागी लोकांनी आमदार-खासदारांच्या घराला निश्चितच घेराव घातला असता. औरंगाबादचं उदाहरण आहे. महानगरपालिकेत शिवसेना-भाजप युतीची सत्ता आहे. वर्षोगणती चाललेल्या क्रांतिचौकातील पुलाच्या कामामुळे लोक त्रस्त झाले आहेत आणि शेवटी शिवसेनेच्याच खासदाराला लोकांच्या रेट्यामुळे पुलाखालचा रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा लागला. मतदान होईपर्यंत आम जनतेचे आणि मतदानानंतर फक्त आपण आपलेच अशा कोषात वावरणाऱ्या लोकप्रतिनिधींनी यातून धडा घेण्याची गरज आहे. म्हणूनच कांद्याने मोठाच पॉलिटीकल लोचा करून ठेवलाय असंच म्हणावं लागेल.

अण्णा हजारेंचे डावे विरोधक
आपुले मरण पाहिले म्या डोळा

केवळ शक्तीमान लोकपाल सर्व भ्रष्टाचार संपवेल हा गैरसमज आहे. भ्रष्टाचाराला पोषक कामाच्या रीती राहिल्या तर भ्रष्टाचाराची सुनामी येईल. त्यात शक्तीमान लोकपाल वाहून जाईल. मात्र कामाच्या रिती भ्रष्टाचाराला वाव न देणाऱ्या असतील तर मुळातच भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होईल. अशा स्थितीत भ्रष्टाचाऱ्यांना शोधणे व शिक्षा करणे शक्य होईल. अशा वेळी लोकपाल थोडा कमी शक्तीमान असला तरी चालू शकेल.

अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचार विरोधी चळवळीला अनपेक्षित असा खूप मोठा पाठींबा मिळाला. तसेच खूप मोठ्या प्रमाणात विचारवंत आणि कार्यकर्ते यांच्याकडून टीकाही झाली. अण्णा हजारेंवर कठोर टीका करणाऱ्यांत तवलिन सिंग, स्वामिनाथन अंकलेश्वरीया अय्यर आणि इंडियन एक्सप्रेसचे संपादक शेखर कपूर असे नामवंत उदारीकरणाचे समर्थक होते. तसेच डावे उदारीकरणाचे विरोधक प्रफुल्ल बिडवाई, नर्मदा बचाव आंदोलन आणि नक्षलवादी चळवळीचे समर्थन करणाऱ्या अरूधंती रॉय सारख्या विदूषींनीही विरोध केला.

मात्र प्रमुख डाव्या पक्षांनी विरोध केला नाही. कारण राजकीयदृष्ट्या काँग्रेस अडचणीत येणे त्यांना सोयीचे होते. पुरोगामी, भाजपविरोधी, सेक्यूलर, अमेरिकाविरोधी असा विचारवंतांचा गटही अण्णांना तिखट शब्दांत विरोध करीत होता. त्यात महेश भट्ट यांच्यासारखे दिग्दर्शक आहेत. दलित, इतर मागासवर्गीय लोकांचे जातीय प्रतिनिधित्व, नेतृत्व करणारे लोकही विरोधात आहेत. आनंद तेलतुंबडे यांचेसारखे दलित विचारवंत आहेत. मुस्लीम हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारे जामा मशिदीचे इमाम बुखारी यांचेपासून पत्रकार विचारवंत सीमा चिस्ती विरोधात आहेत. बहुतेक उर्दु वृत्तपत्रांचा (म्हणजेच मुस्लीम विचारवंतांचा) रोख देखील आंदोलनाकडे संशयाचा आहे.

थोडक्यात अण्णा हजारेंना व्यापक जनमताचा पाठिंबा आहे. तेवढाच विचारवंत, राजकीय कार्यकर्ते, नेते यांचा विरोध आहे. या विरोधात उजव्यापासून थेट डाव्या विचार प्रणालीचे लोक आहेत. असे भाग्य यापूर्वी फक्त शरद जोशींना मिळाले होते. शेतकरी आंदोलनाला शेतकऱ्यांचा देशभर पाठींबा मिळाला. गोविंद तळवळकर, गंगाधर गाडगीळ, वि.स. दांडेकर यांचेसारखे उजवे विचारवंत शेतकरी आंदोलन विरोधी होतेच तर डावे शरद जोशी सीआयएचे एजंट असल्याचा आरोप करीत होते.

आता हे लोक का विरोधात आहेत ते पाहू.



अजित नरदे

प्रफुल्ल बिडवाई हे पुरोगामी, डावे, विचारवंत आहेत. त्यांनी दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या 'उपोषणाचे राजकारण' या लेखात आपली भूमिका मांडली आहे. त्यांचा जनलोकपालाला विरोध पुढील कारणांसाठी आहे.

जनलोकपाल, ''पोलिस, चौकशी यंत्रणा, न्यायालयीन व्यवस्था यांच्यावरही नियंत्रण ठेवील. अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याच्या लोकशाही तत्त्वाच्या हे विरुद्ध असणार आहे. ''भ्रष्टाचार घडण्याचे खरे कारण सत्तेपर्यंत पोचता न येणे हेच असते. (म्हणजे काय?) खाजगीकरणातून निर्माण होणारे उदार धोरण, (म्हणजे काय?) उद्योजकांचा लोभीपणा, सरकारी नोकरांची तडजोड करण्याची वृत्ती आणि न्यायव्यवस्थेचा संभ्रमपणा म्हणजे काय? ही भ्रष्टाचाराची कारणे आहेत.''

''एलिट वर्गाने या चळवळीचे नियोजन केले. त्याचे स्वरूप कॉर्पोरेट स्वरूपाचे आहे. १९९१ च्या उदार आर्थिक धोरणातूनच त्यांची निर्मिती झाली आहे. ते लोक नव्या सेवा क्षेत्राशी तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी जुळलेले आहेत. या लोकांचा सामान्य लोकांशी संबंध नाही, त्यांना मीडिया संचलित घटना आकर्षित करीत असतात. म्हणूनच त्यांना वर्ल्ड कपप्रमाणे अण्णा हजारेंच्या आंदोलनाचे आकर्षण वाटते,'' असे बिडवाई म्हणतात.

''या आंदोलनाला कॉर्पोरेट जगताने आर्थिक पाठबळ पुरविले आहे. १४ जानेवारीला काही उद्योगपतींनी पंतप्रधानांना पत्र पाठवून भ्रष्टाचारावर देखरेख ठेवण्यासाठी लोकपाल नियुक्त करण्यात यावा अशी मागणी केली होती. लंडन येथील उद्योगपती एस.पी. हिंदूजा यांनीही लोकपाल नियुक्त करण्याची मागणी उचलून धरली आहे. अनेक उद्योगपतींना सोनिया गांधींचे डाव्या पक्षाकडे झुकणारे धोरण आवडत नाही.'' असे बिडवाई म्हणतात.

पुढे ते या आंदोलनामागे भाजप आणि रा.स्व. संघ आहे, असे म्हणतात. अण्णांना हाताशी धरून सरकार उलथून पाडण्याचे भाजपचे मनसुबे आहेत, असाही आरोप करतात. बिडवाई यांची भूमिका मी थोडी विस्ताराने दिली. कारण ते साऱ्या डाव्या मंडळींचा दृष्टीकोन मांडतात.

भ्रष्टाचाराचा सामान्य लोकांना त्रास होतो हे खरे आहे. पण त्याहूनही अधिक त्रास उद्योगपती आणि व्यावसायिक लोकांना होतो. संपत्ती निर्माण करणाऱ्या या लोकांना छळण्यात, लुटण्यात नोकरशहा आणि राजकारण्यांना विशेष फायदा असतो. सामान्य लोकांच्यापेक्षा जास्त वेळा यांना विविध कामांसाठी सरकारकडे जावे लागते. यामुळे प्रामाणिक उद्योगपतींना भ्रष्टाचाराचा सर्वांत जास्त त्रास होतो. तर लोभी, अप्रामाणिक उद्योगपतींना फायदा होतो. कोणी उद्योगपती भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला मदत करीत असतील, पाठींबा देत असतील तर गैर काय आहे? १४ जानेवारीला काही उद्योगपतींनी पंतप्रधानांना पत्र पाठवून भ्रष्टाचारावर देखरेख ठेवण्यासाठी लोकपाल नियुक्त करण्याची मागणी केली, यात गैर काय आहे? देशाचे नागरिक म्हणून त्यांना हा हक्क नाही का? लंडनचे भारतीय उद्योगपती एस.पी. हिंदूजा यांनीही लोकपाल नियुक्त करण्याची मागणी उचलून धरली यात गैर काय आहे? देशाविषयी त्यांना आस्था असू नये का?

पण प्रफुल्ल बिडवाई यांना वाटते, ''अनेक उद्योगपतींना सोनिया गांधींचे डाव्या पक्षाकडे झुकणारे धोरण आवडत नाही.'' सोनिया गांधींचे कोणते धोरण डाव्या पक्षाकडे झुकणारे आहे? सोनिया गांधींनी एकट्याने केरळमध्ये आणि ममता बॅनर्जीच्या मदतीने बंगालमध्ये डाव्या पक्षांना पराभूत केले. डाव्या पक्षांचा विरोध असताना 'अणू करार' केला. जैतापूर अणुवीज प्रकल्पाला प्रफुल्ल बिडवाई आणि सर्व डाव्या पक्षांचा विरोध आहे. यात जातीवादी, भाषावादी शिवसेनाही त्यांच्या सोबत आहे. यांचा विरोध डावलून जैतापूर अणूवीज प्रकल्प उभारण्यासाठी सोनिया गांधीचा काँग्रेस पक्ष धडपडतो आहे. काँग्रेसचे सर्व धोरण डाव्यांना अजिबात न आवडणारे आहे. हे पाहता बिडवाई यांचे आरोप निराधार आहेत हे स्पष्ट होते.

अण्णा हजारेंच्या आंदोलनामुळे काँग्रेस पक्ष लोकांच्यात अप्रिय होईल. याचा फायदा दोन नंबरचा प्रबळ पक्ष म्हणून भाजप आघाडील होणार, हे स्पष्ट आहे; पण याचा फायदा डावे पक्ष जेथे प्रबळ आहेत त्यांनाही होणार आहे. म्हणून अण्णा हजारेंच्या आंदोलनामुळे भाजपाला आनंद वाटणे स्वाभाविक आहे. पण डावे पक्ष आंदोलनावर कठोर टीका करताना दिसत नाहीत. याचा अर्थ त्यांना आंदोलन रूचले आहे असेही नाही. प्रबळ लोक भावनेच्या विरोधात गेलो तर अप्रिय होऊन संपू या भीतीने डावे पक्षही आंदोलनाला सावध पाठींबाच देत आहेत. त्यांच्या मनात भीती आहे. पण ते व्यक्त करीत नाही. बिडवाई यांचे सारखे विचारवंत आंदोलनासंबंधी मात्र मोकळेपणाने मत व्यक्त करतात. यावरून डाव्यांचे अंतरंग स्पष्ट होते.

अरूंधती रॉय यांचा अण्णा हजारेंच्या चळवळीवर टिका करणारा लेख दैनिक हिंदू (२१ ऑगस्ट २०११) रोजी प्रसिध्द झाला आहे. या लेखात त्यांनी अण्णा हजारेंच्या सहकाऱ्यांच्या हेतूविषयी संशय व्यक्त केला आहे. ''केजरीवाल, सिसोदिया, बेदी यांच्या सेवा संस्थांना विदेशी मदत मिळते. केजरीवाल यांच्या संस्थेला ४ लाख डॉलर (अंदाजे १ कोटी ८० लाख) इतकी मदत फोर्ड फौंडेशनकडून गेल्या ३ वर्षांत मिळाली आहे. फोर्ड फौंडेशनला अमेरिकन कंपन्या मदत करतात.''

''तसेच इंडिया अगेन्स्ट करप्शन या संस्थेला अनेक भारतीय उद्योगपतींनी देणगी दिली आहे. राज ठाकरे व नरेंद्र मोदी यांचे कौतुक अण्णा करतात. अण्णांचे काही सहकारी राखीव जागांविरोधी आंदोलनात होते. त्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जुने संबंध आहेत.''

''भ्रष्टाचार विरोधी चळवळ ही जागतिक बँकेच्या कार्यक्रमाची नक्कल आहे. अण्णा त्यांचे मेंदू नाहीत. त्यांना ''जनतेचा संत'' बनवून पुढे केले जात आहे. ही जनतेची चळवळ नाही. माध्यमांनी तयार केली आहे. हा रियालिटी शोसारखा प्रकार आहे.''

''भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणात देशातील अनेक उद्योगपती तुरूंगात गेले आहेत. काही जातील असे असताना हे आंदोलन व्हावे, याबद्दल त्यांना शंका आहे. जनलोकपालमध्ये कॉर्पोरेट, मीडिया आणि सेवाभावी संस्था यांचेतील भ्रष्टाचाराबद्दल काहीही तरतूद नाही. सर्व रोख केवळ सरकारी भ्रष्टाचारावरच आहे.''

थोडक्यात अरूंधती रॉय यांना अण्णा हजारेंचे आंदोलन म्हणजे जागतिक बँकेच्या निर्णयाची नक्कल वाटते. भ्रष्ट भारतीय उद्योगपतींनी अटक आणि चौकशी चुकवण्यासाठी केलेले कारस्थान वाटते. यात अण्णांच्या सहकाऱ्यांच्या सेवा संस्थांना मदत करणाऱ्या अमेरिकन संस्था व कंपन्या यांचा हात आहे, असे त्यांना वाटते. केजरीवाल, मोदी, सिसोदिया यांना मॅगॅसेसे पारितोषिक मिळणे हेही त्यांना संशयास्पद वाटते.

श्रीमती रॉय आंदोलकांच्या संस्थांना मिळणाऱ्या विदेशी मदतीबद्दल आक्षेप घेतात. पण नक्षलवादी, काश्मीरचे हुरियत, तामिळ टायगर, पाकिस्तानी दहशतवादी यांचे समर्थन करतात. या सर्वांना मोठ्या प्रमाणात विदेशी मदत मिळते हे उघड आहे. निरपराध लोकांची अत्यंत क्रुरतेने हत्या करून या संघटनांनी दहशत निर्माण केली आहे. तरीही त्यांचे रॉय समर्थन करतात.

धरण विरोधी, जैविक तंत्रज्ञान विरोधी, जागतिकीकरण विरोधी, विकास विरोधी, अणूवीज विरोधी चळवळींचे त्यांनी समर्थन केले आहे. या सर्व चळवळींना मोठ्या प्रमाणात विदेशी मदत मिळते हे उघड आहे. या चळवळीच्या नेत्यांना अनेक विदेशी पारितोषिकांनी सन्मानित केले आहे. तेव्हा रॉय यांना विदेशी मदत आणि पारितोषिके खटकली नाहीत.

देशात १९९० नंतर आर्थिक सुधारणा जागतिक बँकेच्या दबावामुळेच झाल्या. जागतिक बँकेच्या दबावामुळे झालेल्या उदारीकरणामुळेच देशाची विकासगती वाढली. देशातील दारिद्र्य संपले नाही तरी खूप कमी झाले. रोज ७०० रूपये पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या मध्यमवर्गाची संख्या २.५ कोटी वरून १६ कोटीवर गेली. कोट्यावधी लोकांना रोजगार मिळाला. अद्याप देशातील काही लोक या फायद्यापासून वंचीत आहेत हे खरे आहे. त्यांनाही याचा फायदा मिळू द्यायचा असेल तर उदारीकरणाची प्रक्रिया अधिक गतीमान करावी लागेल.

उदारीकरणाची प्रक्रिया गतीमान करण्यात भ्रष्टाचार हा मोठा अडथळा आहे. जुन्या समाजवादी नियंत्रित व्यवस्थेतील भ्रष्ट नोकरशाही विरूध्द संर्घषासाठी नवा मध्यमवर्ग तयार झाला आहे. प्रामाणिकपणे उद्योग, व्यवसाय, नोकरी करून उन्नती साधून घेणारा नवा मध्यमवर्ग विरूध्द भ्रष्ट नोकरशाही असा संघर्ष अटळ आहे. उद्योगपतींनाही भ्रष्टाचाराचा खूप त्रास सोसावा लागतो. म्हणून त्यांचाही भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला पाठिंबा आहे. या संघर्षात नवा मध्यमवर्ग पुढे असला तरी भ्रष्टाचाराने गांजलेली सर्वसामान्य जनता त्यांच्यामागे आहे.

अरूंधती रॉय आणि त्यांच्या सहप्रवाशांनी जागतिक बँकेची भीती दाखवून उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण विरोधात खूप मोठे आंदोलन केले. या आंदोलनात जुन्या मध्यमवर्गाचा मोठा पाठिंबा त्यांना मिळाला. जुन्या मध्यमवर्गातच भ्रष्ट नोकरशहाची मोठी संख्या आहे. या वर्गाचे हितसंबंधच डावे सांभाळतात.

उदारीकरणविरोधी चळवळीत सरकारी, सहकारी आणि सार्वजनिक उद्योगातील नोकर वर्गाचा मोठा वाटा राहिला आहे. भ्रष्ट सरकारी नोकरशाही चालू ठेवण्यातच या वर्गाचे हितसंबंध होते. म्हणूनच १९९० साली उदारीकरण सुरू झाल्यानंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांच्या विरोधात डाव्या पक्षांनी चालवलेल्या मोहिमेचा आधार हा नोकरवर्गच होता.

सरकारी नोकरांच्या भ्रष्टाचारावर कोणीही कारवाई करू नये. तोट्यात चाललेले, काहीही उत्पादन न करणारे सार्वजनिक उद्योग सुरूच राहावे. सार्वजनिक वितरण व्यवस्था, रोजगार हमी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असला तरी या योजना सुरूच राहाव्यात असा प्रयत्न डावे करीत होते. नेते आणि नोकर यांच्या भ्रष्टाचाराला कोणीही अडवू शकत नाही. ही एक अटळ अपरिहार्य स्थिती म्हणून समाजाने स्वीकारली होती. पण आता त्याहूनही प्रबळ नवा मध्यमवर्गाच्या निर्मितीमुळे परिस्थती बदलली आहे.

या वर्गाला धक्का लागतो असे दिसताच ते अस्वस्थ होतात. डावे लोक उदारीकरणाच्या विरोधात यशस्वी झाले असते तर आजची प्रगती झाली नसती. तेव्हा जागतिक बँकेचा कार्यक्रम भ्रष्टाचार विरोधी असेल तर त्याचे आम्ही स्वागत करतो. आम्हाला खरे भय रॉय यांच्या सारख्या स्वदेशी विचारवंतांचे आहे. त्यांना शक्य असते तर त्यांनी देश कायम दरिद्री आणि मागासच ठेवला असता.

खाजगी दूरदर्शन वाहिन्यांनी, वृत्तपत्रांनी पाठपुरावा केल्याने आदर्श, कॉमनवेल्थ गेम, टु जी प्रकरणांची चौकशी करावी लागली. त्यामुळेच काही नेते, उद्योगपती तुरूंगात आहेत. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला बळ मिळाले. तुरूंगात जाण्याची शक्यता असलेल्या उद्योगपतींनी भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला का पाठिंबा द्यावे, हे अरूंधती रॉय यांनाच माहीत. सर्व उद्योगपती भ्रष्टच असतात. हा डाव्यांचा अपप्रचार आहे. भ्रष्टाचारमुक्त, खुल्या व्यापारात स्पर्धा करणे बहुतेक उद्योजकांना आवडते. यामुळे भ्रष्टाचार विरोधी चळवळीला त्यांचा पाठिंबा असणे स्वाभाविक आहे.

दलित, मुस्लीम, इतर मागासवर्गीय लोकांचा अण्णा हजारे यांच्या चळवळीला विरोध असल्याचा प्रचार जाणीवपूर्वक केला गेला. दलितांचा विरोध मी समजू शकतो. कारण सरकारी नोकरीत राखीव जागा असल्याने अनेक दलित तरुणांना नोकरीची संधी मिळाली. आंबेडकरांनी दलितांनी सत्ताधारी होण्याचे स्वप्न ठेवले होते. दलितांना राजकीय सत्ता मिळाली नाही तरी नोकरीच्या निमित्ताने सरकारी सत्तेत चंचूप्रवेश मिळाला.

बहुजन, दलित सरकारी नोकरीत आले तरी गोरगरीब जनतेची पिळवणूक थांबेल असे महात्मा फुलेंना वाटत होते; पण तो भ्रम आता दूर झाला आहे. सरकारी खुर्चीत कोणत्याही जातीचा माणूस आला तर तो भ्रष्ट होतो. सर्वसामान्यांची पिळवणूक करतोच. भ्रष्टाचार सरकारी नोकरांना मिळणाऱ्या विशेषाधिकाराचा गुण आहे. सरकारी नोकरी हेच दलितांचे साध्य होते. पण आता सरकारी नोकर भ्रष्ट खलनायक म्हणून समोर येत आहे. यामुळे दलित नेत्यांनी भांबावून जाणे स्वाभाविक आहे.

उदारीकरणानंतर नव्या संधी खाजगी क्षेत्रात निर्माण होत आहेत. दिवसेंदिवस सरकारी नोकरीचे महत्व कमी होत आहे. सरकारी नोकरांचा भ्रष्टाचार यापुढे फार सहन केला जाणार नाही. तेव्हा सरकारी नोकरी हे एकच ध्येय समोर न ठेवता खाजगी क्षेत्रात जाण्याची मानसिकता दलितांना ठेवावीच लागेल. सरकारी नोकऱ्या १.५ कोटी पेक्षा जादा वाढू शकणार नाहीत. पण खाजगी क्षेत्रात २५ कोटी पेक्षा जादा नोकऱ्या तयार होतील. अशा स्थितीत सर्व सरकारी नोकऱ्या दलितांना राखून ठेवल्या तरी दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत. तेव्हा भ्रष्ट सरकारी नोकरशाहीवर झालेला हल्ला दलितांनी समजून घेणे आवश्यक आहे.

भांडवलशाही हा शब्द दलित नेत्यांना फारसा आवडत नाही. वर्णव्यवस्थेतून होणाऱ्या अन्यायावर भांडवलशाही, उदारीकरण, जागतिकीकरण हा उतारा होऊ शकतो. हे त्यांनी लक्षात घेतले पाहिंजे. खाजगी, बहुराष्ट्रीय कंपनीत, बाजारपेठेत तुमच्या जातीपेक्षा, श्रम व गुणवत्तेलाच वाव मिळेल. अशा स्थितीत जातीय अन्यायाचे राजकारण करून नेतृत्व प्रस्थापित करू पाहणाऱ्या दलित, इतर मागासवर्गीय नेत्यांची पंचाईत होणे स्वाभाविक आहे. तरीही त्यांनी वास्तव समजावून घेणे आवश्यक आहे. या पुढील विकासाचा मार्ग खाजगी क्षेत्रातूनच जातो. यापासून दूर राहणे आत्मघातकच ठरेल.

मुस्लीम मुख्यतः स्वयंरोजगारी आहेत. इतर मागासवर्गीय सुध्दा मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगारी आहेत. उदारीकरणातून होणाऱ्या विकास प्रक्रियेमुळे त्यांना मोठा फायदा मिळणार आहे. कारण त्यांची मानसिकता मुलतः उद्योजक आहे. उदारीकरणानंतर इतर मागास वर्गातील लोकांनी छोट्या मोठ्या व्यापार उद्योगात मोठी आघाडी घेतली आहे.सुरक्षित सरकारी नोकरी एकेकाळी ब्राम्हणी मानसिकता होती. ती आता दलितांची होऊ पहात आहे. या सापळ्यातून ब्राम्हण बाहेर येत आहेत. दलितांनी त्यात शिरू नये. अण्णा हजारेंच्या आंदोलनाच्या विरोधात दलित, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांना उभे करण्याचा प्रयत्न त्यांच्या हिताचा नाही.

विविध अल्पसंख्याक नेत्यांची मुलाखत घेऊन ते सर्व अण्णा हजारेंच्या विरोधात असल्याचे सीमा चिस्ती दर्शवतात. (इंडियन एक्सप्रेस, २५ ऑगस्ट ११) घटना आणि लोकसभेमुळे मुस्लीम व अल्पसंख्याक यांना संरक्षण मिळाले आहे. अण्णा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लोकनियुक्त प्रतिनिधींचा अपमान करून दलितांना, अल्पसंख्यांकाना संरक्षण देणारी यंत्रणा संपवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा त्यांचा आरोप आहे.

शांती भूषण आणि प्रशांत भूषण या दोघांनी गुजराथ दंग्यात पिडीतांची बाजू घेतली. ते विचाराने डावे आहेत. जनलोकपालचा मसुदा तयार करण्यात या दोघांचा मोठा वाटा आहे. तरीही अशा शंका व्यक्त केल्या जातात. रामदेवबाबा, श्रीश्री रवीशंकर यांच्या सहभागाबद्दल शंका व्यक्त केली जाते. राजकीय पक्ष म्हणून भाजपचे नेते पाठिंबा देण्यासाठी आले, त्यांचा उल्लेख करून मुस्लीमांना घाबरवले जात आहे. एकूण आपले दलित, अल्पसंख्याक टोळ्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्याचाच हा प्रयत्न आहे.

अण्णा हजारेंची भ्रष्टाचार विरोधी चळवळ इंडिया अगेंस्ट करप्शन या संस्थेच्या वतीने सुरू आहे. या संस्थेचे २० संस्थापक आहेत.

ते विरोध का करतात?



भ्रष्टाचार विरोधाच्या आडून त्यांना सर्व प्रकारच्या पोकळ घोषणा आणि कार्यक्रम पुढे न्यायचे आहेत. सरकारच्या गर्दीसमोरील भित्रेपणामुळे गर्दीसमोरील अस्थिरता निर्माण होत आहे. आमचे हक्क आणि स्वातंत्र्य यांचे संरक्षण करणारी प्रस्थापित व्यवस्थाच त्यांना मोडायची आहे.

- अख्तर उल वासे

संचालक, इंस्टीट्युट ऑफ इस्लामीक स्टडीज, जमिया मिलीया इस्लामीया



या चळवळीबद्दल मला संशय आहे. लोकसभा आणि लोकशाहीचा आदर करणे हे प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे. लोकसभेचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

- मौलाना अब्दुल कासीम नोमाणी

मोहत्तामीन, देवबंद

या आंदोलनाचा हेतू लोकसभा आणि लोकशाहीला दुर्बल करण्याचा आहे. हा धर्मनिरपेक्ष भारताला धक्का आहे.

- मौलाना अहमदखीजार शाह काश्मीरी

तन्झीम उलेमा ए हिंद

यात रामदेवबाबा, श्रीश्री रविशंकर आणि स्वामी अग्निवेश यांचे सारखे हिंदू साधू आहेत. तसेच दिल्लीचे ख्रिस्ती धर्माचे आर्चबिशप विन्सेट कॅन्सॅओ, मुस्लीम खासदार आणि जमाते उलमा हिंदचे महमूद मदानी हेही आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे. संयोजकांना ही चळवळ सर्व जाती धर्माची करावयाची होती. तथापि आंदोलनाचा प्रभाव वाढला तसे या अल्पसंख्याक नेत्यावर दबाव आला.

दबाव सरकार पक्षाकडून तसेच त्यांच्या समजातील काही वजनदार नेत्यांकडून दबाव आला असावा. आंदोलनाच्या काळात महमूद मदानी सहारानपूर येथेच राहिले. दबावामुळे त्यांनी कोणाशीही संपर्क करण्याचे टाळले. मात्र आर्चबिशप विन्सेट कन्सॅओ यांनी ''उपोषण करून दबाव आणणे आत्मघातक आहे. प्रस्थापित संसदीय परपरा मोडणे योग्य नाही. प्रश्नासंबंधी मी सहमत आहे. पण आंदोलनाच्या पध्दती संबंधी नाही. एकच मसुदा मान्य करा असे कसे म्हणू शकतो?'' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

पण रामलीला मैदानातील गर्दीने आणि श्री. अण्णा हजारे (वय वर्षे ७४) यांच्या उपोषणामुळे लोकशाही घटना आणि संसद धोक्यात येते हे कितपत खरे आहे? आपली राजकीय व्यवस्था खरोखरच इतकी नाजूक आहे काय? बलाढ्य लष्करी आणि पोलिसी ताकद पाठीशी असलेली राजकीय व्यवस्था मोडण्याची ताकद रामलीला मैदानातील गर्दीत होती काय? सुरूवातीला अण्णा हजारेंच्या मागण्या टोकाच्या होत्या. पण मित्रांनी, विरोधकांनी त्यातील उणीवा दाखवताच अण्णांनी त्यासंबंधी तडजोडीची तयारी दाखविली होती. (संदर्भ : कुलदीप नय्यर यांचा लोकमत मधील लेख) पण सरकारला हे आंदोलन रामदेवबाबांसारखे चिरडायचे होते. पण अण्णा हजारे आणि त्यांचे सहकारी रामदेवबाबा सारखे अपरिपक्व नव्हते. ते सरकारच्या सर्व कारस्थानाला पुरून उरले.

अल्पसंख्याकांना संरक्षण देणारी घटना धोक्यात आहे असे सांगून मुस्लीम आणि ख्रिस्ती अल्पसंख्यांकांना आंदोलनाबासून दूर करण्याचा प्रयत्न झाला. आंबेडकरांची घटना आणि राखीव जागा धोक्यात असल्याचा प्रचार करून दलित नेत्यांना दूर करण्याचा प्रयत्न झाला. पण भ्रष्टाचार विरोधी जनभावनाच इतकी तीव्र होती की समाजाचे नेते बाजूला गेले तरी समाज आंदोलनात आला. 'फूट पाडा आणि राज्य करा' ही नीती वाया गेली.

अमिर खान, फरहान अख्तर सारख्या लोकप्रिय कलाकारांनी आंदोलनाला पाठिंबा देऊन मुस्लीम बाजूला नाहीत हे दाखवून दिले आहे. स्वतंत्र, स्वकर्तृत्वावर यशस्वी झालेले अमिर खान आणि मुस्लीम अल्पसंख्याकांना कायम भीती दाखवून गठ्ठा राजकारण करणारे नेते यांचेतील हा फरक आहे.थोडक्यात अण्णा हजारे यांना विरोध करण्यात जातीयवादी आणि धर्मवाद्यांचा हेतू स्पष्ट आहे.

तवलीन सिंग सारख्या उजव्या विचारवंतांचाही अण्णांना विरोध आहे. इंडियन एक्सप्रेसचे शेखर कपूर हेही विरोध करतात. अण्णांच्याभोवती असलेल्या डाव्या लोकांच्या संबंधी त्यांना संशय वाटतो. तो रास्तही आहे. शांतीभूषण, प्रशांत भूषण डावे आहेत. उदारीकरणामुळेच भ्रष्टाचार वाढला असे त्यांचे मत आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेला पर्यायी, भ्रष्टाचाराला कमी वाव देणाऱ्या फुड कुपन किंवा कॅश ट्रान्सफर




आंदोलक शिक्षित, शहरी, उच्चवर्णीय, एमबीए टाईप, नवा उदारमतवादी आहे. सरकार विरुध्द असंतोष निर्माण झाल्याने नव उदारमतवादी सुधारणांना मदत होईल.

- आनंद तेलतुंबडे
दलित डावे लेखक



कॉर्पोरेट सेक्टर मधील काही लोक जेलमध्ये जाण्याची शक्यता असताना हे आंदोलन का सुरु केले? जनलोकपालमध्ये कॉर्पोरेट सेक्टरचा समावेश का नाही? या आंदोलनाला कॉर्पोरेट सेक्टर प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष मदत करीत आहेत.

- राम पुनियानी



स्वयंघोषित तारणहारांपासून जगाला वाचवण्याची गरज आहे. जनलोकपाल मसूदा सरकार इतकाच राक्षसी आहे. हजारेंना फॅसीस्ट लोकांनी घेरले आहे.

- महेश भट्ट
चित्रपट दिग्दर्शक

योजनेला अरविंद केजरीवाल यांचा विरोध आहे. मेधा पाटकर यांचा तर सर्व विकासालाच विरोध आहे. यामुळे या चळवळी विषयीच सर्व उजव्या विचारवंतांत संशय आहे.

पण या विचारवंतांनी अण्णांच्या सहकाऱ्यांपेक्षा अण्णांचा अनुयायी - नवा मध्यमवर्ग - पाहिला असता तर कदाचित विरोध केला नसता. नेहरूंच्या समाजवादी व्यवस्थेतून निर्माण झालेल्या सर्व शोषक भ्रष्ट नोकरशाही विरूध्द इतरांनी केलेले हे बंड आहे. नेत्यांची वैयक्तिक मते काहीही असली तरी त्यांना अनुयायांच्या आशा आकांक्षा टाळता येणार नाहीत.अण्णा हजारे विकास विरोधी, कृती करू लागले तर हे अनुयायी त्यांचे बरोबर राहणार नाहीत. त्यांचा भ्रष्टाचाराला विरोध आहे. पण दारूबंदीला पाठिंबा नसेल.समृध्द चांगले जगण्याला कोणी चंगळवाद म्हणून विरोध केला तर ते त्यांना मान्य नसेल. साध्या ग्रामजीवनाचे आदर्श त्यांना मानवणार नाही.या पुढे नेते नव्हे तर अनुयायी नेत्यांची भूमिका ठरवतील.आधुनिकता विरोधी, समृध्दी विरोधी, विकास विरोधी भूमिका घेतल्यास अनुयायी दूर होतील नेते संपतील.

जेव्हा तवलीन सिंग, स्वामिनाथन अय्यर, शेखर कपूर, तसेच माझे मित्र सुधाकर जाधव, मुग्धा कर्णीक यांची मते अरूंधती रॉय, प्रफुल्ल बिडवाई यांचेशी जुळू लागली तेव्हाच काही तरी चुकते असे मला वाटू लागले. केवळ जागतिक बँकेच्या दबावामुळे झालेली अर्धवट उदारीकरणाची प्रक्रिया डाव्या संघटना व नोकरशाहीच्या विरोधामुळे थांबली आहे.

आता नव्या मध्यमवर्गाची संख्या आणि ताकद वाढली आहे. पण तो राजकारणापासून आतापर्यंत अलिप्त होता. आता त्याला त्याच्या ताकदीची जाणीव झाली आहे. हीच ताकद रामलीला मैदानात उफाळून आली आहे. डाव्या विचारवंतांची अवस्था रामलीला मैदानात - ''आपुले मरण पाहिले म्या डोळा, अनुपम सोहळा मृत्यूचा'' अशी झाली आहे. तेव्हा डावे जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांचा विरोध स्वाभाविक आहे.

अजित नरदे
१८ अ, श्रध्दा संकुल, दुसरा मजला,
६ वी गल्ली, जयसिंगपूर ४१६१०१, जि. कोल्हापूर
फोन : (०२३२२) २२५३४८, २२६३४८,
मोबाईल : ९८२२४५३३१०
ई-मेल : hmìhÿ.Áìoßh°wñ½Ë.åXñ

■■

सहकाराची साखर फक्त नेत्यांसाठी गोड

४०-५० वर्षांपूर्वी हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना त्या पक्षाच्या एका मोठ्या नेत्याने जाहिरपणे असे सांगितले होते की आपण महाराष्ट्रात प्रयत्नपूर्वक सहकाराची चळवळ वाढवली पाहिजे, जोपासली पाहिजे. कारण त्याच चळवळीच्या माध्यमातून आपण आपला पक्ष जिवंत ठेवू शकतो. हीच चळवळ आपल्या कार्यकर्त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय करू शकते आणि त्याद्वारेच आपण आपली सत्ता राज्यावर चालवू शकतो. हा नेता आता दिवंगत झाला असल्यामुळे त्याच्या नावाची चर्चा आम्ही अप्रस्तूत समजतो; पण ते तसे म्हणाल्याचे जाणकारांना माहीत आहे. मुद्दा मोठा महत्त्वाचा आहे. राज्यावर सत्ता चालवण्यासाठी आणि कार्यकर्त्यांच्या 'उदरनिर्वाहची' सोय करण्यासाठी सहकार चळवळ चालवणे आवश्यक आहे! आता त्या बिचाऱ्या महान नेत्याल काय माहीत की भविष्यात आपल्या कार्यकर्त्यांची 'उदरे' किती मोठी होणार आहेत ते! सहकार सम्राटांच्या विशाल उदरात सगळी सहकार चळवळ गडप झाल्यात जमा आहे आणि त्यात काही सुधारणा होण्याची सुतराम शक्यता नाही. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचा अभ्यास करून २००७ साली कॅगनेही तोच निष्कर्ष काढला आहे.

जसे टी. एन. शेषन यांनी निवडणूक आयुक्त या पदास एक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली तीच प्रतिष्ठा सध्याच्या कॅगला प्राप्त झालेली आहे. सरकारने तीन तीन निवडणूक आयुक्त नेमून शेषन यांचे पंख छाटले तसेच काही कॅगच्या बाबतीत घडले तर नवल वाटू नये!

२००६ मध्ये कॅगने प्रकाशित केलेल्या अहवालातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे :

मार्च २००६ मध्ये तपासलेल्या २२ सहकारी साखर कारखान्यांकडे (ससाका कडे) रु. २,६५८ कोटी बाकी होते. तसेच शेअर कॅपिटलचे पैसे एकूण रु. १६४ कोटी सभासदांकडे बाकी होते. तसेच भागभांडवलाचे म्हणून जमा केलेले रु. ७४ कोटी 'सस्पेन्स' म्हणून जमा केले होते!



श्रीकृष्ण उमरीकर

कारखान्यांची सुधारणा करण्याकरिता दिलेली कर्जे पूर्ण वापरली गेली नाहीत किंवा भलत्याच कारणासाठी वापरल्या गेली. अशी कर्जे घेतलेले १३ कारखाने अवसायानात निघाले. कित्येक कारखान्यांनी आधुनिकीकरणासाठी किंवा कारखाना चालवण्यासाठी जी कर्जे घेतली त्यांचा उपयोग कशासाठी केला याची कागदपत्रे दाखलच केली नाहीत.

शासनाने रु. ३,५०० कोटींपेक्षा जास्त रकमेची 'थकहमी' घेतली होती.

ऊसतोडणी मजुरांच्या नावाने तारणाशिवाय दिलेली अग्रीम रक्कम रु. २३ कोटी वसूल झालेली नव्हती. एवढेच काय जी अग्रीम वसूल केली (रु. ९२ कोटी) ही कारखान्यानेच वापरली, बँकेला परत केली नाही!

साखर आयुक्तांच्या सल्ल्याला डावलून सरकारने पाच कारखान्यांना परवानगी दिली. इतकेच काय तर त्यांना कागदपत्रांची खातरजमा न करताच नियमबाह्य भागभांडवलही पुरविले.

सरकारने गुंतवणूक केलेल्या कित्येक कारखान्यांनी ५-१५ वर्षांचा विलंब करूनसुद्धा आपले बांधकाम पूर्ण केले नव्हते जे केवळ ३ वर्षांतच पूर्ण व्हायला हवे.

११ साखर कारखान्यांचा खर्च सरकारमान्य निकषांपेक्षाही जास्त होता. त्यामुळे पाच वर्षांत रु. ११०० कोटींपेक्षाही जास्त खर्च झाला होता.

६१ कारखान्यांचे लेखापरीक्षण बाकी होते.

तसेच त्यांची तपासणी आयुक्तालयाकडून झालेली नव्हती.

ससाकांचे व्यवस्थापन कसे सुधारावे याचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या गोडबोले समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्यात आलेली नव्हती.

तपासलेल्या २२ पैकी एकाही कारखान्याचे हिशेब योग्य प्रकारे ठेवलेले नव्हते.

२००१-२००६ दरम्यान सहा नव्या कारखान्यांचे अर्ज साखर आयुक्तांकडे आले. त्यातील केवळ एकाला त्यांनी परवानगी दिली. सरकारने हस्तक्षेप करून उरलेल्या पाचांनाही परवानगी दिली. त्यातील केवळ रेणापूरचा कारखाना सुरू झाला आणि त्या कारखान्यालाही उसाचा तुटवडा होता. म्हणून त्याने दुसऱ्या कारखान्याच्या क्षेत्रातून जास्त भावाने ऊस विकत घेतला आणि त्याचे पर्यवसन कारखान्याला तोटा होण्यात झाले.

जानेवारी २००५ मध्ये साखर आयुक्तांनी ७ कारखान्यांची परवानगी रद्द करण्याची शिफारस शासनास केली. तिकडे शासनाने कानाडोळा केला. हे कारखाने चालू झालेच नाहीत आणि त्यांना शासनाने पुरवलेले भागभांडवल तसेच पडून आहे.

साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या भागभांडवलाची शहानिशा न करताच खोट्या आकडेवारीला ग्राह्य धरून शासनाने अशा कारखान्यांना आपले भागभांडवल पुरविले.

शासनाने तथा उत्पादकाने स्वीकारलेल्या किमतीपेक्षा जास्त किमतीला रेणापूर ससाकाने आपली यंत्रसामग्री खरेदी केली. त्या वाढीव किमतीची भरपाई शासनाने केली.

यंत्र सामग्री खरेदी करताना खूप अनियमतता आढळून आली आहे.

उसापासून साखर तयार करण्याचा खर्च किती असावा या संबंधी शासनाने काही मर्यादा घातलेल्या आहेत. वेगवेगळ्या कारखान्यांचा खर्च १२% ते ७०००% (म्हणजे जिथे रु. १ खर्च करायचा तिथे रु. ७० खर्च केले!) जास्त होता! त्यामुळे अर्थातच कारखाने तोट्यात गेले!

कारखान्यांनी आपली साखर कमी किमतीत विकली.

ससाकामध्ये मर्यादेपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची भरती केलेली आहे. कारखाना चालवायला आधुनिक तंत्रज्ञानाची जाण असलेला कार्यकारी संचालक नेमावा तसेच तो शासनाने संमत केलेल्या ६६ जणांपैकी असावा असा आदेश असतानाही ससाकांनी जुनेच संचालक ठेवले.

ही झाली कॅगची निरीक्षणे. आता साखर करखान्यांच्या कारभारावर प्रकाश टाकणाऱ्या या गोष्टी बघा.

साखर कारखाने आपले कर्ज बुडविणार आहेत हे माहीत असतानाही सरकार त्यांना मदत करतेच आहे. चालू हंगामात अंदाजे ११०० कोटी रुपये विविध ससाकांना देण्यात येणार आहेत. या मदतीचा खरा फायदा ससाकांच्या राजकारणी संचालकांनाच होतो हे सर्वांना माहीत आहे. त्यातून जर काही शेतकऱ्यांचा फायदा होतच असला तरीही त्यांचे प्रमाण केवळ ८-९% आहे. ४-५% जमिनीवर घेण्यात येणारे पीक आणि ते पिकविणारे ८-९% शेतकरी यांच्या भल्यासाठी केवळ सरकार ही मदत करतच असेल तर याच सरकारने राज्यातल्या इतर ९१-९२% शेतकऱ्यांचाही थोडाकाळ विचार करावा.

ससाकांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे पैसे हडप केले. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात रिट दाखल केले आणि सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे (मशीबॅ) गहाण ठेवलेली साखर विकून कर्मचाऱ्यांची रक्कम देऊ करण्याचे आदेश दिले. त्यामुळे झाले काय की भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने ही साखर ताब्यात घेऊन तिचा लिलाव केला. कर्मचाऱ्यांना त्यांचे पैसे मिळाले; पण महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे तारण मात्र राहिले नाही. ससाकांना हेच हवे होते. आधीच कर्ज फेडण्याच्या नावाने बोंब होती. आता तर तारणच राहिले नाही. शेजाऱ्याच्या हातून साप मारला गेला. खरे तर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या वकिलाने साखर तारण म्हणून असल्यामुळे तीवर बँकेचा हक्क असल्याचे प्रतिपादन करायला हवे होते आणि भविष्य निर्वाह निधीचे पैसे संचालकांकडून वसूल करण्यात यायला हवे होते पण...

मुंबई विद्यापीठात माला लालवानी यांनी एक शोध निबंध सादर केला आहे. त्यात त्यांनी असा निष्कर्श काढला आहे की 'ससाकांचा वापर केवळ आपापले मतदार खुश ठेवण्यासाठी करण्यात येतो. त्यांचा मुख्य फायदा पश्चिम महाराष्ट्रातल्या शक्तिमान नेत्यांना झालेला आहे आणि विदर्भ-मराठवाड्यातल्या शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे.' सदर निबंधात इतरही बरीच निरीक्षणे नोंदवण्यात आली आहेत.

मसाबॅच्या एकूण थकित कर्जापैकी ५७% ससाकांकडे आहे. म्हणजे ससाकांनी बँकेचे रु. १३२७ कोटी बुडविले आहेत. खरे तर शिखर बँकेचे उद्दिष्टच मुळी जिल्हा सहकारी बँकांना वित्त पुरवठा करण्याचे आहे. २०-२५ वर्षांपूर्वी ससाकांना कर्ज पुरवठा करण्यास खउऱ्हख ने नकार दिला होता. त्याचे कारण ससाकांचा कारभार पुरेशा 'व्यावसायिकतेने' चालविल्या जात नाही हे होते. सरकारला तर ससाका चालवणे फार गरजेचे होते. म्हणून सरकारने हक्काच्या शिखर बँकेच्या माध्यमातून वित्तपुरवठा सुरळीत करून घेतला आणि जनतेचा पैसा आपल्या बगलबच्च्यांवर उधळण्याचा मार्ग प्रशस्त केला. २००२ मध्येच रिझर्व्ह बँकेने आर्थिक शिस्त नसलेल्या ससाकांना शिखर बँकेने नवे कर्ज देऊ नये असा इशारा दिला होता. तसे केल्यास शिखर बँकेची परिस्थिती वाईट होईल असे रिझर्व्ह बँकेला वाटत होते. साखर कारखान्यांची वकिली करण्यासाठी आपले विलासराव देशमुख आणि आपले 'जाणते राजे मा. शरदचंद्रजी पवार साहेब' तेव्हाचे वित्त मंत्री जसवंत सिंग यांना भेटायला गेले होते. अर्थातच रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून ससाकांना कर्ज दिल्या गेले आणि शिखर बँकेने विनाशाकडे आणखी एक पाऊल टाकले आणि बँकेच्या भोंगळ कारभाराला कंटाळून शेवटी

पान १२ पाहा

कांद्याचा भडका

कितीदा पेटणार, किती दिवस पेटणार?

कुठलीही दूरदृष्टी न दाखवता निर्यातबंदी लावणे किंवा उठवणे हा मंत्री गटाचा खेळ सापशिडी खेळल्यासारखा दिल्लीत चालू आहे. २५-३० वर्षांपासून कांदा, ऊस, कापूस, धान, गहू यांच्या चढउताराचा फटका शेतकऱ्यांना आणि ग्राहकांनाही बसत असताना व वेळोवेळी शेतकरी संघटनेने यावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि चांगले मार्ग सुचवले असतानाही २५ वर्षांत सरकारने शेतीमालाच्या किमतीच्या बाबतीत कुठलेही धोरण ठरवलेले नाही.

सध्याच्या आंदोलनामध्ये मुंबई-आग्रा महामार्गावर ठिकठिकाणी विशेषत: बसवंत पिंपळगाव- नाशिक या ठिकाणी शेतकऱ्यांनी रास्तारोको केले आहे. या आंदोलनात पक्षभेद विसरून सगळे लोकप्रतिनिधी एकत्र आलेले आहेत. नाशिक, नगर, पुणे या कांदा उत्पादक पट्ट्यातील बाजारसमित्या निर्यातबंदी उठेपर्यंत बंद राहणार आहेत. मुख्यमंत्री चव्हाण यांनी पंतप्रधानांना यासंदर्भात तातडीने पत्र लिहून निर्यातबंदी उठवावी व शेतकऱ्यांचे नुकसान टाळावे असे केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी आणि मंत्री गटाच्या सदस्यांची भेट घेऊन सांगितले आहे. केवळ आंदोलनानेच हा प्रश्न आता सुटणार नाही, तर यासाठी केंद्र सरकारच्या निर्यातबंदीच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचीही तयारी बाजारसमितीच्या संचालकांनी मुंबईतील विधिज्ञांशी चर्चा करून सुरू केली. भाजप, शिवसेना हे विरोधी पक्ष आंदोलनात उतरले आहेत; परंतु मोठी गमतीची गोष्ट म्हणजे भूजबळ व त्यांचे दोन्ही पुत्र या आंदोलनात सक्रीय झाले आहेत. बांधकाम मंत्री, छगन भुजबळ यांनी तर राज्यात कांद्याच्या पडत्या भावामुळे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो असेही नाशिक येथे बोलताना म्हटले. एकाच वेळी त्यांनी आर.आर. आबा व युतीतील आपला सहकारी पक्ष यांच्यावर आघात केला आहे. पर्यायाने आपल्याच पक्षाच्या; परंतु त्यांच्या विरोधकांवर कुरघोडी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या रोषाचा त्यांनी खुबीने वापर करून घेतला आहे. भुजबळांचे तर संपूर्ण घरच आंदोलनात आहे. त्यामुळे त्यांचे शेतकरी निश्चितच कौतूक करतील. शेतकऱ्यांनी त्यांना इथून पुढे कुठल्याही कार्यक्रमात सत्कार समारंभात फक्त कांद्याच्या माळाच घालाव्यात इतकी त्यांची प्रतिमा आता शेतकऱ्यांच्या मनात उंचावली आहे. शेतकऱ्यांनी मात्र इथून पुढे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भाजप फारसा आक्रमक नाही, कारण त्यांना एकदा त्यांचे दिल्लीतील शीला दीक्षित यांचे महाग कांद्याने राज्य गेल्याची आठवण ते कधीच विसरत नाही. शहरी ग्राहकांशी फारसे वितुष्ट घेण्याचे काम भाजप कधी करत नाही. युतीतील काँग्रेसला आंदोलनाची धार जसजशी वाढेल तसतशी शेतकऱ्यांचा रोष ओढू नये यासाठी विखे पाटलांनी व्यापाऱ्यांना साठेबाज म्हणून लवकरच कार्यवाही करण्यात येईल असे म्हटले आहे.



ज्ञानेश्वर शेलार

२५-३० वर्षांपूर्वी शेतीमालाचे भाव मुंबई-दिल्लीत ठरतात असे शेतकरी संघटनेने सांगायला सुरुवात केली, तेव्हा सर्वांनाच नवल वाटायचे. शेतात पिकवतो, डोक्यावर, बैलगाडीने, ट्रॅक्टरने जमेल तसे बाजारात विकतो. तिथे व्यापारी मालाची प्रत आणि उपलब्धता पाहून शेतीमाल खरेदी करतात एवढा साधा व्यवहार आणि त्यात दिल्ली-मुंबई कोठून आली अशी शंका अर्थतज्ज्ञांच्या, राजकारण्यांच्या मनात यायची. शेतीमाल पिकवणाऱ्या शेतकऱ्याला तर या विषयी नवलच वाटायचे की, शेतीमालासारख्या टाकाऊ आणि नाशवंत मालाचे भाव दिल्लीत आणि मुंबईत बसून ठरवण्याइतका वेळ तरी कुणाला आहे. हळूहळू शेतकरी संघटनेने शेतीमालाच्या भावाचे अर्थशास्त्र जेव्हा शेतकऱ्यांसमोर मांडले आणि एककलमी कार्यक्रम शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव हे शेतकऱ्यांसमोर ठेवले. त्यांच्या मालाच्या विक्रीतून कधीकधी मुबलक पैसा आणि बऱ्याच वेळा उलटी पट्टी हे अनुभव सांगितले. तेव्हा त्यांनाही हे अर्थशास्त्र पटकन समजले. १९८० साली शेतकरी संघटनेचे पहिले रास्ता रोको आंदोलन चाकण येथे झाले. कांदा हे व्यापारी पीक आहे. संघटनेच्या आंदोलनाची सुरुवात त्याने झाली. नंतर कापूस, ऊस, ज्वारी या सगळ्यांचेच भाव नेमके शेतीमाल बाजारात आल्यावर पडतात आणि शेतकऱ्याच्या हातातून माल गेला की लगेच वाढतात. हे सर्वांनीच अनुभवले. त्याच चाकणमध्ये आणि पूर्ण पुणे जिल्ह्यात पुन्हा एकदा कांद्याच्या भावासाठी आंदोलन होत आहे. कृषी उत्पन्न बाजारसमित्या बंद आहेत. शेतकऱ्यांची रस्ता रोकोची तयारी चालू आहे. नाशिक, नगर या जिल्ह्यांमध्ये गेल्या पाच दिवसांपासून रास्ता रोको, मोर्चे, बाजारसमिती बंद ही आंदोलने चालू आहेत. या सर्व आंदोलनांमध्ये सर्वच पक्षांनी उडी घेतली आहे. एवढेच नव्हे तर शेतकरी



संघटनेचेच अर्थशास्त्र, सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या, पुढाऱ्यांच्या, लोकप्रतिनिधींच्या तोंडी आहेत. या संधीत आपण कोठे पाठीमागे राहू नये ही त्यांची भावना आहे. आंदोलनाची सुरुवातच भुजबळांनी प्रधानमंत्र्यांना पत्र पाठवून केली आहे. आपण शेतकऱ्यांचेही नेते आहोत हे दाखवण्याची हमकाहमकी सगळ्यांनीच सुरू केली आहे. गेली २५ वर्षे ज्या पुढाऱ्यांना शेतकरी संघटनेचे, शेतकऱ्यांचे, शेतीमालाच्या भावाचे वावडे वाटायचे तेच आता मुलाबाळांसहीत - म्हणजे नाशिकला पिताजी, नांदगावला एक मुलगा आणि मनमाडला एक मुलगा असे जाहीर तोफा डागत आहेत. शेतकऱ्यांनीही आम्हाला कुणी रास्त भाव देत असेल किंवा त्यासाठी लढत असेल, तर कुणाचेही वावडे नाही, अगदी डब्ल्यूटीओचा डंकेल आला आणि त्याने शेतकऱ्यांच्या हातापायातील दंडबेड्या काढून टाकण्याचे काम केले तर त्यालाही आम्ही शेतकरी संघटनेचा बिल्ला लावू एवढ्या उदार मनाने सर्व पक्षांच्या, नेत्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या आंदोलनात सहभाग घेतला आहे. पक्षीय किंवा राजकीय संघटनात्मक जात-धर्म-पक्ष यांचा कुठलाही भेदाभेद आम्ही आमच्या या शेतीमालाच्या रास्त भावाच्या लढाईत येऊ देणार नाही, असे आपल्या प्रतिज्ञेतच त्यांनी म्हणून ठेवल्याने शेतकऱ्यांनी त्यांचे वावडे मानण्याचे काहीच कारण नाही.

दरवर्षी ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये कांद्याचे भाव गगनाला भिडतात. राज्याराज्याचे आणि दिल्लीचे सरकार हादरून जाते. शहरी ग्राहकांना स्वस्तात कांदा मिळावा यासाठी सरकारच्या हातातील जालीम अस्त्र निर्यातबंदी लावले जाते. ही निर्यातबंदी टीव्ही, प्रसारमाध्यमे यांच्यामध्ये ग्राहकांच्या अश्रूचे लोट वाहून झाल्यानंतर केली जाते. कुण्या तज्ज्ञाने यावर्षी कांद्याच्या पिकात २० ते २५ टक्के घट होणार आहे अशी हाकाटी दिल्याबरोबर केंद्रसरकारने ताबडतोब निर्यातबंदी लावली. भाववाढीबद्दल फार मोठा गदारोळ झालेला नसतानाही आणि माफक दरात बाजारात कांदा उपलब्ध असताना, तसेच उन्हाळी कांदा बाजारात येण्याचे सुरू असतानाच कांद्यावर निर्यातबंदी लादली. दरवर्षी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आंदोलनांपासून दिल्लीने काहीही धडा घेतलेला नाही. उलट कांद्याच्या भाववाढीबद्दल कुठलीही ओरड नसताना अगोदरच निर्यातबंदी लावली आहे. याचा अर्थ केंद्रसरकार अधिक निर्ढावलेले आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गांभीर्याने लक्ष देण्यास तयार नसल्याचे दिसून येते. सरकारची हिम्मत शेतकऱ्यांच्या विरोधात कारवाया करण्याची आणि भाव पाडण्याचे कारस्थान करण्याची कमी होण्याऐवजी वाढीस लागली आहे. हे शेतकऱ्यांच्या आणि देशाच्याही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

कुठलीही दूरदृष्टी न दाखवता निर्यातबंदी लावणे किंवा उठवणे हा मंत्री गटाचा खेळ सापशिडी खेळल्यासारखा दिल्लीत चालू आहे. २५-३० वर्षांपासून कांदा, ऊस, कापूस, धान, गहू यांच्या चढउताराचा फटका शेतकऱ्यांना आणि ग्राहकांनाही बसत असताना व वेळोवेळी शेतकरी संघटनेने यावर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि चांगले मार्ग सुचवले असतानाही २५ वर्षांत सरकारने शेतीमालाच्या किमतीच्या बाबतीत कुठलेही धोरण ठरवलेले नाही. आपण अजूनही पावसावर चालणारी अनियमीत आणि बाजारपेठेत भावाच्या चढउतारावर चालणारी शेती यावर बाजारपेठेतच निर्णय होतील, अशा प्रकारची व्यवस्था उभारू शकलेलो नाही.

ज्यांनी दिल्लीत आणि मुंबईत बसून या सगळ्या गोष्टी करायच्या तेच आम्ही शेतकऱ्यांसाठी प्रसंगी रस्त्यावर उतरू, आमच्या पक्षाच्याच आणि नेत्यांच्या विरोधात जायला कमी करणार नाही; पण शेतकऱ्यांचा प्रश्न मात्र धसाला लावू. चालू हंगामापुरता अशा अहमहमिकेने रस्त्यावर उतरले आहेत.

पाच वर्षांपूवी निफाड येथे तत्कालीन आणि आताच्या कृषीमंत्र्यांना ते कुठल्यातरी उद्घाटनासाठी आलेले असताना आणि कांद्याचे भाव पडलेले असताना शेतकऱ्यांनी त्यांना कांदे फेकून मारले. नंतरच्या पाच वर्षांत कांद्याच्या धोरणात त्यांनी काय केले? हे सगळ्या शेतकऱ्यांना माहीत आहे. राज्यातील त्यांचे चेले-चपाटे मात्र शेतकऱ्यांनी आपल्याला कांदे मारू नयेत यासाठी स्वत:च कांद्याच्या माळा गळ्यात घालून फिरत आहेत असे चित्र सध्या दिसत आहे. सत्तेत असलेले दोन्ही पक्ष चारदोन दिवसांनी एकमेकांना कांदे फेकून मारतानासुद्धा दिसतील. शेतकरीही आपल्यासाठी हे पुढारी काहीही करायला तयार आहेत, असे मनात आणून कदाचित पुढच्या निवडणुकीत पुन्हा त्यांनाच निवडून देतील आणि येरे माझ्या मागल्या म्हणत पुन्हा त्यांच्या बरोबर जाऊन कांद्याच्या भावासाठी रस्त्यावर जाऊन बसतील. शेतकरी संघटनेने सांगितलेले अर्थशास्त्र आता देशातील वेगवेगळ्या संघटना आणि राजकीय पक्षही बोलू लागले आहेत. त्यांचा अंतस्थ हेतू आम्ही तुमच्यासाठी लढायला तयार आहोत हे दाखवण्याचा आहे. संसदेत कायदे होत नाहीत. भ्रष्टाचार मिटत नाही, आहे त्या कायद्यांचा वापर होत नाही म्हणून दिल्लीच्या लाल चौकात अण्णा हजारेंना लोकपाल विधेयकासाठी जनसंसद भरवावी लागली. पुढाऱ्यांनी मात्र यातून काहीच धडा घेतलेला नाही आणि ते गावोगावी शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये सहभागी होत आहेत. यात प्रत्यक्ष विधानसभेत आणि लोकसभेत जाऊन बसणारी मंडळीही आहेत. त्यांनी इतके दिवस तेथे बसून शेतीमालाचे भाव पडू नयेत आणि ग्राहकांनाही माफक दरात शेतीमाल मिळावा यासाठी काय केले? कोणते कायदे केले? कोणत्या कायद्यांत बदल केले? हा प्रश्नही आज ना उद्या या पुढाऱ्यांना शेतकरी विचारणार आहेत! तेव्हा ते कोणत्या तोंडाने उत्तरे देतील?

सध्या तरी निवडणुकीच्या वेळी शेतकरी मागचं सर्वकाही विसरून पुन्हा जातीपातीच्या धर्माच्या, नात्याच्या, प्रादेशिकतेच्या गुंत्यात पडतो. त्याच त्याच पुढाऱ्यांना निवडून देतो. शेतीमालाच्या भावाचा प्रश्न शेतकरी स्वत:च विसरून जातो; पण आता मात्र शेतकऱ्यांनी हा प्रश्न

जेवढा तीव्रतेने भाव पडल्यानंतर रस्त्यावर येऊन मांडला, तेवढ्याच तीव्रतेने निवडणुकयंत्राचे बटण दाबतानाही लक्षात ठेवावा लागेल. नसता हेच पुढारी पुन्हा आम्ही तर तुमच्यासाठी रस्त्यावर उतरलो, लढलो असे सांगून मते घेऊन पळून जातील आणि जेथे कायदे केले जातात, आयात-निर्यातीचे धोरण ठरले जाते तेथे मात्र काहीच करणार नाहीत. रस्त्यावर उतरलेल्या पुढाऱ्यांचे सत्ताधारी आणि विरोधक सर्वांचेच दिल्लीत बसलेले आहेत. त्यांच्या नावाने कुणी शंख करायला तयार नाही. ज्यांनी निर्यातबंदी लावली त्या पक्षाच्या स्थानिक नेत्यांना खरे तर शेतकऱ्यांनी घेराव घालणे, त्यांच्या घरासमोर ठिय्या मांडणे, त्यांच्या गाड्या अडवणे असे कार्यक्रम घेण्याऐवजी विविध कारणाने डागाळलेल्या पुढाऱ्यांबरोबर शेतकरीही जाऊन बसतायत. आज ना उद्या हेच पुढारी आपली दुटप्पी भूमिका दाखवून देतील. त्यावेळी शेतकऱ्यांना विसर पडता कामा नये. शेतकऱ्यांनी आपल्या छातीवर संघटनेचा एक लाल बिल्ला अवश्य लावावा; पण एक बिल्ला या विविध पक्ष आणि संघटनांच्या लढवय्या पुढाऱ्यांसाठी त्यांच्या छातीवर लावण्यासाठी खिशात ठेवावा. शेतीमालाच्या रास्त भावाच्या प्रश्नासाठी लढणाऱ्या कुणालाही त्यांनी हा बिल्ला लावावा आणि त्याच्या गळ्यात हात टाकून आता तू माझा भाऊ आहेस असे म्हणावे.

काही पुढारी शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न करीत आहेत. निर्यातबंदी लागल्यानंतर लगेच कसे काय कांद्याचे भाव पडतात. याला जबाबदार साठेबाज पुढारी आहेत, अशी हाकाटी त्यांनी सुरू केली आहे. लवकरच व्यापाऱ्यांवर धाडी पडायला सुरुवात होईल. शेतकऱ्यांना आणि ग्राहकांनाही व्यापारीच आपला शत्रू आहे आणि त्यांनी साठेबाजी केल्यामुळे कांद्याचे भाव पडतात, असे चित्र उभे राहील. उत्पादक, व्यापारी आणि ग्राहक हे कधीच एकमेकांचे शत्रू नसतात. ते एकमेकांसाठीच जन्माला आले आहेत. त्यांचे शत्रूत्व असूच शकत नाही. शत्रूत्व असेलच तर ते शेतकरी, व्यापारी, ग्राहक हे एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला सरकारी धोरण असे आहे. सरकार मात्र वड्याचे तेल वांग्यावर काढून व्यापाऱ्यांना निशाण्यावर घेत आहे. शेतकरी आणि ग्राहकांनी याकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. आयात-निर्यातीचा खेळ जोपर्यंत ज्यांना शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नाची अजिबात जाण नाही अशा लोकांच्या हातात असणे किंवा ज्यांना या प्रश्नाची अत्यंत सूक्ष्म जाणीव आहे अशा राजकारणी लोकांच्या की ज्यांचे राजकारण शेतकऱ्यांच्या गरिबीवर, त्यांच्यासाठी सतत काहीतरी नवीन नवीन योजना आणून त्यांना भिकेला लावण्याच्या कारस्थानावर चालू आहे, अशा लोकांच्या हातात असणे अत्यंत घातक आहे. संपूर्ण देशातील ७०% लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न असताना त्यावरच आपले राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांना आणि आम्ही मात्र तुमचे कैवारी आहोत असे गावागावात दाखवणाऱ्या त्यांच्या चेल्यांना शेतकरी केव्हा जागा दाखवणार आहे. शेतीमालाच्या प्रश्नावर शेतकऱ्यांनी एकदा तरी मनापासून मतदान करावे - त्यांनाच समजेल की त्यांची ताकद काय आहे आणि देशाच्या दारिद्र्याचा अर्थात शेतीमालाच्या भावाचा प्रश्न किती चुटकीसरशी संपू शकतो.

ज्ञानेश्वर शेलार
मो. ९२२६७९७०१८
■■

पान ९ वरून पुढे

रिझर्व्ह बँकेने शिखर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून त्यावर प्रशासक नेमला. अर्थात त्याला राजकारणाचा रंग होता.

थोडक्यात काय तर ससाकांचा कारभार स्वच्छ नाही. त्यांच्याकडे कर्मचारी गरजेपेक्षा जास्त आहेत. ससाकांनी हिशेब ठेवलेले नाहीत. बहुतांश ससाका तोट्यात आहेत. त्यांनी आपल्या कर्जाची परतफेड केलेली नाही. कित्येक ससाकांच्या एकूण किमतीपेक्षा त्यांची कर्जे जास्त आहेत. तरीही राज्य सरकारला अशा ससाकांना पुन्हा पुन्हा मदत करावी वाटते. त्यांच्या फाटक्या झोळीत पुन्हा पुन्हा पैसे ओतावे वाटतात. हे काय गौडबंगाल आहे ते उघड झालेच पाहिजे. रब्बी आणि खरीप लागवडीच्या एकूण क्षेत्रापैकी केवळ ४% क्षेत्र ऊस लागवडीखाली येते. तसेच उसाची शेती करणारे शेतकरी केवळ ८.५%-९% आहेत.

साखर कारखाने आपले कर्ज बुडविणार आहेत हे माहीत असतानाही सरकार त्यांना मदत करतेच आहे. चालू हंगामात अंदाजे ११०० कोटी रुपये विविध ससाकांना देण्यात येणार आहेत. या मदतीचा खरा फायदा ससाकांच्या राजकारणी संचालकांनाच होतो हे सर्वांना माहीत आहे. त्यातून जर काही शेतकऱ्यांचा फायदा होतच असला तरीही त्यांचे प्रमाण केवळ ८-९% आहे. ४-५% जमिनीवर घेण्यात येणारे पीक आणि ते पिकविणारे ८-९% शेतकरी यांच्या भल्यासाठी केवळ सरकार ही मदत करतच असेल तर याच सरकारने राज्यातल्या इतर ९१-९२% शेतकऱ्यांचाही थोडाकाळ विचार करावा. 'जाणते राजे माननीय शरदचंद्रजी पवार साहेब' यांना एकदा तरी आत्महत्या करणाऱ्या कापूस उत्पादक शेतकऱ्याची कणव यावी ही गणेशाच्या चरणी प्रार्थना आणि त्यांना जर तशी कणव येत नसेल तर निदान गलथान कारभार करणाऱ्या ससाकाला मदत न करण्याची सुबुद्धी त्यांना दे अशी गणेश चरणी प्रार्थना. कारण आर्थिक शिस्तीकडे दुर्लक्ष केल्यास देशाचे काय हाल होतात हे अमेरिका-ग्रीस-स्पेन-इटली यांच्या उदाहरणावरून दिसतेच आहे.

बुडणाऱ्या उद्योगांना कर्जे देऊन राज्य सरकार रुपयाचे अवमूल्यन करत आहे. एवढेच नव्हे तर बहुतांश शेतकऱ्यांवर अन्याय करत आहे. जनतेचा पैसा योग्य त्या ठिकाणी वापरून राज्याची प्रगती कशी होईल ते पाहणे सरकारचे कर्तव्य आहे; पण सहकार महर्षींच्या बळावर चालणारे हे सरकार वठणीवर येण्याची चिन्हे दिसत नाहीत. जनतेलाच काही अक्कल आली तर तिनेच या मुजोर राजकारण्यांना धडा शिकवावा नसता आपल्या राज्याचा सर्वनाश होण्यास वेळ लागणार नाही.

श्रीकृष्ण उमरीकर
नानलपेठ, परभणी-४३१४०१
मोबाईल : ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com
■■

भू-संपादन बिलाचे मायाजाल

भाग २

खेडे आणि शहरी विस्तार योजनांच्या नावाखाली जमीन संपादन पडेल भावाने बिल्डरला विकणे आणि बिल्डरकडून गगनचुंबी भावाने 'शहरी' आणि 'खेडे' विस्तार योजनेतील लाभधारकांना विकणे हा कुठला सार्वजनिक उद्देश असू शकतो. म्हाडा, सिडको आणि हडको या योजना बनवताना संपादन करताना दिलेल्या किमती आणि योजनेतून कुणी का असेना कमावलेला पैसा यातील अंतर पाहता हा पैसा कुणाच्या खिशात जातो हे तर पाहायलाच नको.

शेती काय नि मालमत्ताधारणा काय, भारतीयांसाठी जीव की प्राण! त्याचपुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागरिकांच्या मूलभूत हक्कांमध्ये मालमत्ता धारणाच्या अधिकाराला स्थान दिले होते; पण पं. नेहरूनीतिची वाकडी नजर या हक्कांवर पडली आणि हा हक्क मूलभूत अधिकारांमधून हद्दपार झाला. मात्र शेतकऱ्यांच्यासाठी त्यांची शेती जीव की प्राण होती आणि आजही आहेच. दुर्दैवाने त्याच्या या प्रश्नाकडे राजकारण्यांनी कानाडोळा केला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यात शेतकरी पुत्र असलेल्या नेता गणांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

नवीन भू-संपादन बिलामुळे हा प्रश्न सुटला असे होत नाही. मुळात शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न बनलेल्या शेतीला हिसकावून घेण्याचे वारंवार प्रयत्न होतातच त्यातला हाही एक प्रकार. या नवीन बिलाची घोषणा होते न होते तोच संबंधितांनी शेतकऱ्यांची शिकार करण्यासाठी हाकारे घालायला सुरुवात केली आहे.

भारतीय उद्योजकांची देश पातळीवरची संघटना 'फिकी' ने या बिलासंदर्भात आपले आक्षेप सादर केले आहेत. त्यांनी प्रामुख्याने चार आक्षेप सादर केले आहेत. त्यांच्या मागणीप्रमाणे बिलात उद्योजकाला जेव्हा शंभर किंवा त्यापेक्षा जास्त जमीन संपादन करायची असते त्यावेळी या संपादनामुळे ज्यांच्या पोटापाण्याच्या प्रश्नांवर गदा येणार असते. त्यांच्या पुनर्वसन आणि पुनर्वसाहतीसाठी उद्योजकांवर काही बंधने घातली जातात. तेव्हा ही मर्यादा १०० ऐवजी ५०० एकरांवर असावी. एकीकडे शेतकरी म्हणतात खासगी उद्योगांसाठी त्यांच्या जमिनींची संपादनी करण्यातच येऊ नये, तिथे उद्योजकांना जमीन तर पाहिजे; पण पुनर्वसन आणि पुनर्वसाहतीची जबाबदारी टाळायची आहे.



ॲड. अनंत उमरीकर

फिकीची दुसरी मागणी आहे ती ८०% पासूनच्या सूटीची. बिलात खासगी उद्योगांसाठी जमीन संपादनीसाठी ८०% बाधित कुटुंबांची संमती आवश्यक आहे. ही टक्केवारी ५०% असावी असं त्यांचं म्हणणं आहे. त्यांची ही मागणी अवास्तव आहे. वास्तवात खासगी उद्योजकांनी १००% जमीन खासगी वाटाघाटींद्वारे खरेदी करावी, तीही शेतकऱ्यांच्या संमतीने त्या व्यवहारात शासनाचा काही सहभाग नसावा अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे.

अधिग्रहीत जमिनीचा वापर पाच वर्षे न केल्यास ती जमीन मूळ मालकाला परत करावी या ऐवजी फिकीला हीच मूदत दहा वर्षे करून पाहिजे. त्याही पलीकडे जाऊन कंपन्यांची अशीही मागणी आहे की त्यांच्यावर सामाजिक दायित्व टाकू नये आणि उद्योग धंद्याबाबत 'लवचिक' आणि 'लाभधारक' योजना असावी.

थोडक्यात भूसंपादन कायदा पूर्वीसारखाच असावा म्हणजे नेतागणांचा फायदा आणि उद्योजकांचाही! मधल्यामधे शेतकरी मेला तर मरू दे! आणि फिकीच्या या मागण्या मान्य होतीलही. त्यांची शासनात जबर वट आहे, तर शेतकऱ्यांचे हित पाहणारे शोधूनही सापडणार नाहीत.

शक्य तो जमीन जाऊच नये अशी जरी शेतकऱ्यांची इच्छा असली तरी भूसंपादन होणारच असेल तर किमान बाजारभावाने तरी किंमत मिळावी एवढीच त्याची अपेक्षा असते. नवीन बिलात त्याही बाबतीत आनंदी आनंद आहे. याबाबत बिलाच्या कलम २० मध्ये तरतूद

आहे. त्यानुसार किंमत ठरवण्याच्या दोन पद्धती ठरवण्यात आल्या आहेत. एक दस्त नोंदणीसाठी त्या त्या भागासाठी जी किंमत ठरवली आहे. ती किंमत आणि दोन : त्या गावातील किंवा त्या परिसरातल्या इतर गावांच्या जमिनीच्या गेल्या तीन वर्षांतल्या व्यवहारापैकी ५०% व्यवहाराची सरासरी रक्कम, यापैकी जी रक्कम जास्त असेल ती.

हा तर आपल्या सर्वांचाच अनुभव आहे की ठरलेल्या किमतीपेक्षा किती तरी पटीने कमी किमतीत दस्त नोंदणी होत असते. तेव्हा या पद्धतीने किंमत ठरवणे म्हणजे शेतकऱ्यावर अन्याय करणे होय. जुन्या कायद्यात निदान सरासरी किंमत नाहीतर सर्वाधिक किंमती एवढी किंमत देण्याची सोय होती, शिवाय जी जमीन अधिग्रहीत होणार आहे तिच्या भावी उपयोगाच्या शक्यतेचा विचार करून किंमत ठरवावी, अशीही न्यायालयीन तरतूदी होत्या. या बिलात या दोन्ही बाबींना पुरता फाटा देण्यात आलेला आहे.

भावी काळात ही जमीन ज्या कामासाठी वापरली जाऊ शकते त्या कारणाच्या दृष्टीने जमिनीच्या किमतीचा विचार व्हायला पाहिजे. सध्याच्या कायद्यातील या तरतूदींच्या आधारे 'पोटेन्शिअल यूज' या बाबीचा विचार करून कोर्टाने अनेक निकाल दिलेले आहेत. आता येऊ घातलेल्या बिलात या निकषाला पूर्ण फाटा देऊ घातला आहे. तीच गत दस्त नोंदणी बाबतच्या स्टँप ॲक्टप्रमाणे सरकारने ठरवलेल्या किमतीची. चालू बाजारभावापेक्षा कमीच किंमत दस्त नोंदणीसाठी ठरवण्यात आलेली होती. लोक कमी किमतीत खरेदी विक्री व्यवहार दाखवतात म्हणून सरकारने त्यांच्या दृष्टीने 'योग्य' किंमत ठरवली आणि त्या किमतीपेक्षा कमी किमतीत व्यवहार ठरवले तरी दस्त नोंदणीसाठी लागणारा स्टॅम्प हा सरकारी नियमाप्रमाणेच असावा असा कायदा करण्यात आला.

काय विरोधाभास आहे बघा. जुन्या कायद्याप्रमाणे जेव्हा दिवाणी कोर्टात भूसंपादनाच्या किमतीबाबत प्रश्न समोर यायचा तेव्हा दस्त नोंदणीसाठी शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत या कोर्टाने स्वीकारावी अशी मागणी जमीनधारकाकडून केली जायची तेव्हा ही किंमत पुरावा म्हणून वापरता येणार नाही आणि तशी किंमत देता येणार नाही, अशी नियमावली शासनाने केली आणि आता मात्र ती किंमत आधार मानता येईल आणि त्याच वेळेस सर्वाधिक किमतीचा दस्त ग्राह्य न धरता तीन वर्षांची सरासरी ग्राह्य धरावी अशी तरतूद नवीन बिलात करण्यात आली आहे. म्हणजे काय दोन्ही बाजूने शेतकऱ्यांवर अन्यायच होतो आहे. 'चित भी मेरी, पट भी मेरी, ठिय्या मेरे बाप का' यासारखी परिस्थिती आहे शासनाची तेव्हा तीन वर्षांची सरासरी नको तर सर्वाधिक किंमत आणि नजीकच्या काळात ज्या कामासाठी जमीन उपयोगात आणली जाऊ शकते ते कारण लक्षात घेऊनच किंमत द्यावी. उदा. शेतजमीन जर प्लॉट पाडून विक्री योग्य परिस्थिती असेल तर शेतजमीन म्हणून विचार न करता घर बांधणीसाठी म्हणून जी रक्कम येऊ शकते ती किंमत स्वीकारण्यात यावी, असा आग्रह धरायला पाहिजे.

किंमत ठरवताना शासनानं या बिलात आणखी एक मखलाशी केली आहे. शहरी विभाग आणि ग्रामीण विभाग ही अशी विभागणी असून शहरी भागातल्या जमिनीला मूळ ठरलेल्या किमतीच्या दुप्पट रक्कम द्यावी ग्रामीण भागातील जमिनीला सहापट द्यावी. ज्यात किमतीच्या तिप्पट किंमत धरायची आणि त्याच्या वर १००% सोलेशियण अशी सहापट रक्कम. शहरी भागाला ठरवण्यात आलेली किंमत आणि त्यावर १००% सोलेशियण अशी दुप्पट रक्कम. हा फरक का याला काही सबळ कारण नाही.

यात आणखी एक अडचण अशी आहे की, शहरी विभाग आणि ग्रामीण विभाग यांची व्याख्या केलेली नाही. आपण असं गृहीत धरूया की नगर परिषद, महापालिका यांचे क्षेत्र म्हणजे शहरी भाग तर ग्रामपंचायत आणि इतर गावे ही ग्रामीण. पश्चिम महाराष्ट्रात कित्येक गावे शहरांच्या तोंडात मारणारी आहेत, आर्थिकदृष्ट्या आणि लोकसंख्येतही; पण त्या गावांत आजही नगरपालिका नसून ग्रामपंचायती आहेत. उदाहरणादाखल नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत आणि नगर-पुणे रस्त्यावरचे इंदापूर ही गावे घेऊया. पिंपळगाव बसवंतला वीस बँकांच्या शाखा आहेत आणि लोकसंख्या लाखात आहे. तरीही तिथे ग्रामपंचायत आहे. त्या उलट मराठवाड्यातील जिंतूर, पालम आणि सोनपेठ हे तालुके. या ठिकाणी नगरपरिषदा असूनही या गावांची तुलना पिंपळगावशी होऊच शकत नाही. तरीही त्या गावांना शहर म्हणायचं का? आणि त्यांना अल्प किमतीवर समाधानी ठेवायचं का? त्यापेक्षा शहर आणि ग्रामीण हा भेद मिटवूनच टाकायला पाहिजे आणि शहरी भागालाही सहापट किंमत द्यायला पाहिजे.

नवीन बिलात येऊ घातलेल्या अडचणींमुळे शेतकऱ्यांची हीऊ घातलेली ससेहोलपट एवढ्याने थांबणार नाही. शासनाचा एकदा का भूसंपादनाचा निर्णय अंतिम झाला की त्या विरुद्ध दाद मागण्यासाठी राज्य सरकारे आणि केंद्रीय योजनांसाठी केंद्र सरकार 'वाद निर्णय लवाद' निर्माण करणार. आणि हा लवाद 'त्वरित न्याय' मिळावा यासाठी आहे असं सरकारचं म्हणणं आहे. कारण त्या बिलातील कलम ३६ आणि ३७ मध्ये तसं नमूद केलं आहे. यामुळे शासनाचे प्रश्न चटकन सुटतीलही; पण जमीनधारकांचं काय? या राज्य लवादावर तिघेजण असतील, पैकी एक त्या त्या राज्याच्या उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि इतर दोघांपैकी एकजण जिल्हाधिकारी यांच्या पदांपेक्षा कमी नसणारा आणि दुसरा शासनाच्या कायदा विभागातील डायरेक्टर या पदापेक्षा लहान पदधारक असणार नाही. म्हणजे दोघे जण शासनाचे पगारदार असतील तर ते शासनाचे हुकूम पाळणार की जमीन धारकाचे? हायकोर्टापुढे एरवीच वर्षानुवर्षे हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत, तेव्हा त्यांच्यापैकी एकाच्या डोक्यावर हे आणखी एक ओझं टाकून 'त्वरित न्याय' साधणार कसा? होणार एवढंच की प्रकरण वर्षानुवर्षे सडत पडणार आणि कमी किमतीत शासनाचं काम पार पडणार मग पुढे काही होवो! म्हणजे होणार काय की शासन आरोपी आणि न्यायाधीशही शासनच!

सध्याच्या कायद्याप्रमाणे, कलेक्टरचा अवार्ड मान्य नसणारा जमीनधारक अवार्ड विरुद्ध भूसंपादन अधिकाऱ्याकडे आक्षेप सादर करायचा आणि ती तक्रार निवाड्यासाठी संबंधित दिवाणी न्यायाधीशाकडे पाठवण्यात येई आणि दोन्ही बाजूंचे साक्षी पुरावे एकून कोर्ट निकाल देई. तो मार्ग या नव्या कायद्याने बंद झाला आहे.

या बिलात असं नमूद केलं आहे की, आवश्यकतेप्रमाणे एकापेक्षा अधिक खंडपीठांची निर्मिती केल्या जाईल. ज्या प्रमाणात प्रचंड प्रमाणावर भूसंपादन सुरू आहे त्या प्रमाणात खंडपीठ निर्माण करायचे



काय विरोधाभास आहे बघा. जुन्या कायद्याप्रमाणे जेव्हा दिवाणी कोर्टात भूसंपादनाच्या किमतीबाबत प्रश्न समोर यायचा तेव्हा दस्त नोंदणीसाठी शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमत या कोर्टाने स्वीकारावी अशी मागणी जमीनधारकाकडून केली जायची तेव्हा ही किंमत पुरावा म्हणून वापरता येणार नाही आणि तशी किंमत देता येणार नाही, अशी नियमावली शासनाने केली आणि आता मात्र ती किंमत आधार मानता येईल आणि त्याच वेळेस सर्वाधिक किमतीचा दस्त ग्राह्य न धरता तीन वर्षांची सरासरी ग्राह्य धरावी अशी तरतूद नवीन बिलात करण्यात आली आहे. म्हणजे काय दोन्ही बाजूने शेतकऱ्यांवर अन्यायच होतो आहे.

झाले तर त्यासाठी तेवढे हायकोर्ट जज्ज आणायचे कुठून? आणि या लवादाचं प्रमुख ठिकाण हे मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद हे असणार, म्हणजे हिंगोली जिल्ह्यातल्या टोकाच्या गावातलं प्रकरण असेल तर त्यासाठी त्या खेड्यातल्या जमीनधारकाने औरंगाबादला चकरा मारायच्या की काय? म्हणजे पूर्वी कापूस एकाधिकार योजनेखाली कापसाच्या विक्रीसाठी आधी दिवसेंदिवस कापूस केंद्रावर आणि नंतर पैशांसाठी बँकेकडे चकरा माराव्या लागायच्या तसं आता हायकोर्टाच्या गावी साक्षीदारांना घेऊन चकरा मारणं झालं! त्या पेक्षा या बिलात बदल करून पूर्वीप्रमाणे जिल्हा न्यायाधीशाकडे किंवा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्याकडे वाद निकालाने अधिकार क्षेत्र सोपवावं!

एकूणच या बिलाचा साकल्याने विचार करता या बिलातील तरतुदींचा फेर विचार करण्यात यावा आणि खालीलप्रमाणे बदल व्हावेत.

१) बाधित कुटुंबांपैकी ८०% लोकांबरोबर जमीन धारकांपैकी ८०% लोकांची संमती आवश्यक असावी.

२) 'सार्वजनिक हिताच्या' व्याख्येतून शहरांचे विस्तारीकरण, खेड्यांचे विस्तारीकरण वगळावे.

३) उद्योजकांसाठी जमीन संपादनी हे 'सार्वजनिक हीत समजू नये.

४) कंपनीसाठी जमीन संपादनी असेल तर शासनाने कंपनी आणि शेतकरी यांच्यामध्ये येऊ नये. हा व्यवहार त्या दोघांतला खासगी असावा.

५) मूलभूत सोयी (इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट) योजनेतून 'विशिष्ट वर्गांसाठी गृह निर्माण योजना' वगळण्यात याव्या. तसेच 'सरकार वेळोवेळी जाहीर करील अशा योजना' हेही वाक्य वगळण्यात यावे. (कलम (२) (एन्) ii आणि iv

६) कलम (२) (वाय) 'सार्वजनिक उद्देश' च्या व्याख्येतून ii मधून 'औद्योगिकीकरण', 'शहरीकरण योजना' हे शब्द वगळावे. iii मधून 'ग्रामीण' वा 'शहरी' जागा 'ग्रामीण भागाच्या सुधारणेसाठी' (या नावाखाली जमीन बळकावणे थांबवण्यासाठी हे वगळणे आवश्यक आहे.) तसेच 'गरिबांसाठी घरे' निर्माण करणे (या नावाखाली आमदारांना घरे वाटण्यात आल्याचा ताजा प्रकार लक्षात घेता) या गोष्टी वगळाव्या.

iv यातील सामान्य लोकांच्या हितासाठी तसेच कंपन्यांसाठी जमीन संपादन करणे हेही वगळण्यात यावे.

७) अवार्डला आव्हान देणारी सारी प्रकरणे चालवण्याचा अधिकार पूर्वीप्रमाणेच दिवाणी न्यायालयाकडेच असावा आणि त्याच्या अपिलाचे अधिकार संबंधित जिल्हा न्यायाधिशाकडे असावेत.

या सर्व बाबींचा शेतकऱ्यांनी विचार करणे आवश्यक आहे. प्रसंगी आंदोलन छेडण्याचाही विचार व्हायला पाहिजे.

ॲड. अनंत उमरीकर
नानलपेठ, परभणी-४३१४०१
मो. ९८९०३९६६५७



गणपतीबाप्पा, पुढच्या वर्षी थोडा उशीरा ये रे बाबा...

दत्ता जोशी
media.care.abd@gmail.com

आदरणीय गणेशदेवा,

आपणास साष्टांग प्रणिपात. आपण ठरल्याप्रमाणे चतुर्थीला आलात आणि चतुर्दशीला मार्गस्थ झालात. तुमचं रुपलावण्य किती नेत्रसुखद. आम्हाला जेव्हापासून कळायला लागलं, त्या वयापासून आम्ही सारे तुमच्या प्रेमात पडलेलो आहोत. खरं सांगायचं, तर देवा हे तुमचं भाग्य! तुम्ही सर्वज्ञ ना? मग तुम्हीच सांगा किती जणांनी आपल्या बालपणी मातीचे - शाडूचे गणपती बनविले? किती मुलांनी आपल्या चित्रकलेच्या तयारीत कागदावर आपली छबी चितारण्याचा प्रयत्न केला. एवढे प्रमाण ब्रह्मा-विष्णुपासून पार अलिकडे संतोषीमातेपर्यंत कोणत्या देवतामध्ये आढळते?

आम्हाला आठवते, 'गणपती येत आहेत' याची चाहूल आम्हाला लागायची ती श्रावणातील शिडकाव्यानंतर घराशेजारच्या उंचवट्यावर आघाडा-दुर्वा उगवू लागल्यावर...! मग नदीकाठच्या ओल्या चिकणमातीचे छोटेछोटे गोळे आमच्या घरासमोरील अंगणात आणत असू. कधी मिळालाच तर शाडूही आणता येई आणि मग गणराया, तुला साकारण्यासाछी आमची इवली बोटे झटू लागत. तुझं रुपडं साकारताना आमचं रुपडं मात्र पार काळवंडून जात असे. मग आमची झटापट सुरू होई रंग आणि ब्रशशी. अशा प्रकारे दोन-तीन दिवसांच्या मेहनतीनंतर तुझी मूर्ती साकारत असे. मूर्ती विकत आणावी लागणार नाही, या आनंदात घरातील मोठ्या माणसांचा आमच्या मूर्तीला पाठिंबा मिळे. विसर्जनापर्यंत दररोज सकाळ संध्याकाळची आरती मात्र अनेकदा आम्ही विसरत असू. मग घरात कोणाला तरी आठवण येई आणि आरती म्हटली जाई.



विसर्जनाच्या वेळी मूर्ती पाटावर ठेवून हा पाट डोक्यावर घेऊन तोल सांभाळत नदीपर्यंत जाऊन नदीत तुझे विसर्जन करताना आपल्या आयुष्यातील एक महान कलाकृती आपल्याकडून हिरावली जात असल्याचे दुःख मात्र अंतःकरणात सलत असे. या विसर्जनानंतर गावातील मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीत आम्ही सहभागी होत असू. तुझ्यापुढे नाचताना वय, जात, धर्म विसरला जात असे. बैलगाडीच्या कठड्यांवर फळ्या आडव्या टाकून तयार केलेल्या प्लॅटफॉर्मवर तुझी विशालकाय मूर्ती ठेवलेली असे. नारळाच्या झावळ्या किंवा केळीचे खुंट यांच्या हिरव्यागार कमानींमध्ये तुझी गोजिरी मूर्ती शोभत असे. समोर गावातील ब्रॉसबँड वाजत असे. क्वचित एखाद्या मंडळाला कर्णे लावून गाणी वाजविण्याचा मोह आवरत नसे. पण सारे वातावरण चैतन्याने मुसमुसलेले... प्रसन्नतेचा अर्थ तेव्हा आकळत असे...

मधली काही वर्षे अशीच गेली. आमच्या वडिलांची जागा आम्ही घेतली आणि आमची जागा आमच्या मुलाने... पण त्याने कधी मातीत हात मळविलेले आम्ही पाहिले नाही. शिस्तशीरपणे बाजारातून तुझी मूर्ती मखरासह घरात येई. या वर्षी पर्यावरणाच्या रक्षणासाठी शाडूची मूर्ती आणायचे मुलाने ठरविले तेव्हा मला आनंद वाटला. माझं वर्तुळ थोडे तुटकपणे का होईना जुळत होतं... पण शाडूची मध्यम आकाराची मूर्ती आणण्यासाठी त्याने तब्बल पाचशे रुपये खर्ची घातल्याचे कळले, तेव्हा, देवा खरं सांगतो, वाईट वाटलं...

असे वाईट वाटण्याचे दिवस आजकाल बरेच येत आहेत. बाप्पा, तुम्ही विघ्नहर्ता ना? मग हे असं का होतं? की आमच्या प्रार्थनेतील



हे गणनायका, दुःखहारका, तू दरवर्षीप्रमाणे या वर्षी ठरल्या वेळी आलास आणि ठरल्याप्रमाणे दीड दिवस, सात दिवस, नऊ दिवस, अकरा दिवस असा वेळ घेत परत गेलासही. पण आता तू येताना आमच्या काळजाचा ठोका चुकू लागतो. तू विघ्नविनाशक, पण तुझ्या येण्याने जेवढी विघ्ने येतात ती पाहता आता हळूहळू तू जरासा उशीरानेच येण्याचे पाहा... कालांतराने येणे बंद केलेस तरी चालेल...

आर्तता कमी झालीय... की तुमचा प्रभाव कमी होतोय? लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य आंदोलनातील जनजागरणाचे साधन म्हणून आपल्याला विराट स्वरुपात सादर केले. आम्ही लोकमान्यांना पाहिले नाही आणि स्वातंत्र्यलढाही अनुभवला नाही. आम्ही एका वेगळ्याच लढ्यात अडकलो आहोत. हा लढा आमच्याच अस्तित्वाचा आहे. नाक्यानाक्यांवरील 'लोकमान्य' खंडणीला वर्गणी समजतात. रस्ते अडवणे, कर्णकर्कश संगीत वाजविणे हा त्यांचा हक्क आणि समाजाची अडवणूक हे कर्तव्य! आम्ही या चक्रव्यूहात अडकलो आहोत.

हा भाग तर खूपच छोटा. आता तू खराखुरा 'व्हीआयपी' झाला आहेस. तुझ्या रक्षणासाठी पोलिसांच्या फौजा तैनात असतात! तू खरा विघ्नहर्ता, पण आम्ही तुझी क्षमताही निष्प्रभ बनविली! परवाचीच गोष्ट... दिल्लीत साक्षात हायकोर्टासमोर स्फोट झाला. अजूनही त्याचे धागेदोरे शोधले जात आहेत. पंतप्रधानांनी हा भ्याड हल्ला असल्याचे म्हटले आहे. गृहमंत्री नेहेमीप्रमाणेच या स्फोटात कोणकोणत्या स्फोटकांचा वापर झाला असावा, या विषयी अंदाज वर्तवित आहेत. या हल्ल्याची पूर्वसूचना गुप्तचर खात्याने दिली होती, असा दावाही त्यांनी केला. दरवेळी परदेशातील अतिरेक्यांनाच अशा हल्ल्यांना जबाबदार धरून चालणार नाही, या हल्ल्यामागे देशातच प्रशिक्षित झालेले दहशतवादी असू शकतात, असेही त्यांनी सुचविले आहे. त्यांचे 'बिटवीन द लाईन्स' कळण्याएवढे आता लोक जागृत झाले असावेत. जखमींना भेटायला गेलेल्या राहूल गांधींची हुन्यो उडवीत लोकांनी त्यांना रुग्णालयापासून परत पाठविले. प्रणव मुखर्जी, कपिल सिब्बल आणि --- यांनी या वेळी कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही. ही बुद्धी त्यांना आपणच दिली बाप्पा?

देवा, हे सारे काय चालले आहे? नागरिक असुरक्षित आणि अतिरेकी मुक्त आहेत. रामदेवबाबांवर दिल्लीत प्रवेशाची बंदी लादली जाते आणि अतिरेकी बिनधास्त येऊन स्फोट घडवून जातात. अण्णा हजारे यांना गोळ्या घालण्याची खास सरकारी भाषेतील धमकी दिली जाते. ज्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत असे समाजकंटक सरकारच्या नजरेत येत नाहीत. असे का होते देवा? केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकताच आपल्या संपत्तीचा तपशील जाहिर केला. देवा, खूप आश्चर्य वाटले. दरमहा ५० हजार - एक लाखाचे वेतन आणि भत्ते घेणाऱ्या नेत्यांच्या मालमत्ता कोट्यवधींच्या आहेत, तरीही अनेकांच्या नावावर घर नाही, वाहन नाही... काय हा लोकशाहीचा चमत्कार!

या हल्ल्यापाठोपाठ देशात इतस्त्र हल्ले चढवण्याचे ई मेल आले आणि संसदेवरील हल्ल्याचा गुन्हेगार अफजल गुरूला सोडण्याची मागणीही अतिरेकी गटांनी केली. आता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हायकोर्टासमोर वाहने उभी करण्यास मनाई करण्यात आली आहे. गजानना, तू बुद्धीची देवता ना? मग राज्यकर्त्यांना तू बुद्धी का देत नाहीस? निर्बुद्धपणाचे सारे विक्रम तोडण्याच्या जिद्दीने यांचा राज्यकारभार सध्या चालू आहे. यांचा गृहमंत्री स्फोट घडून गेल्यानंतर त्यात कोणती स्फोटके वापरली असावीत, याचे विश्लेषण करतो. यांचा परराष्ट्रमंत्री युनोत जाऊन भलत्याच देशाच्या मंत्र्याचे भाषण वाचू लागतो आणि चूक लक्षात आल्यानंतर त्याचे निर्लज्ज समर्थनही करतो. यांचा भावी पंतप्रधान दहशतवाद आटोक्यात आणणे अशक्य असल्याचे जाहीर विधान करतो. अशा स्थितीत गणराया आम्हाला तुझ्याशिवाय कोण बरे आधार आहे?

बाप्पा तू युद्धकलेतही पारंगत. साऱ्या गुणांचा तुझ्यात समुच्चय. तू राज्यकर्त्यांना

बुद्धी देऊ शकत नसशील तर किमान युद्धकला तरी शिकव. पाकिस्तान हा भारताचा शत्रू आहे, हे सत्य त्यांना उमगू दे. पाकिस्तानच नव्हे तर चीन हा भारताचा सर्वात मोठा शत्रू आहे, याचे भान त्यांना येऊ दे. हे भान सरकारपेक्षाही कम्युनिस्ट पक्षाला लवकर येऊ दे. वाजपेयी सरकारच्या काळात तत्कालीन परराष्ट्रमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी चीन हा भारतासाठी सर्वात धोकादायक शेजारी असल्याचे विधान केले होते तेव्हा हेच पक्ष त्यांच्यावर चवताळून उठले होते. आता चीनने काश्मीरचे डोके गिळंकृत केले आहे. तिबेट बळकावला आहे. अरुणाचलात तो आत शिरला आहे. तो ब्रह्मपुत्रेचे पाणी रोखतो आहे. सीमेवर शस्त्रास्त्रांची जमवाजमव करतो आहे. भारताच्या हद्दीत घुसतो आहे. तरीही येथील कम्युनिस्टांना तो भारताचा मित्रच वाटतो आहे. देवा, काय करशील?

गणराया, ११ सप्टेंबर २००१ नंतर अमेरिकेवर एकही हल्ला झाला नाही. त्यांनी आपली सुरक्षाव्यवस्था सीमेवरच आवळली. 'पंछी भी पर नही मार सकता' हे एकेकाळी मुलायमसिंह यादव यांनी कॉपीराईट करून ठेवलेले विधान आता अमेरिकेने पळविले आहे. व्हायरसेस शरीरात शिरण्याआधीच रोखले तर अँटीबायोटीक्सचे दुष्परिणाम होण्याची शक्यताच मावळते, हे सांगायला कोणाची गरज पडावी? इथे समुद्र किनाऱ्यावर महिनाभरात दोन महाकाय जहाजे वाहत येतात आणि कोणत्याही यंत्रणेला त्याचा थांगपत्ता नसतो. उलट, ही जबाबदारी आपली नसल्याचे खुलासे या यंत्रणा करतात. या विषयावर संसदेत चर्चाही होत नाही. गुजरातेत लोकपाल नेमल्याच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष संसदेचे कामकाज रोखतात पण जहाजांशी कोणाचे देणेघेणे नसते. देशावरील अलिकडचा सर्वात मोठा हल्ला याच मार्गाने घुसखोरी करून झाला, हा इतिहास ताजा असताना सुद्धा हा निष्काळजीपणा हा देश करू शकतो. इतिहासातील चुकांपासून धडा घेत नाही त्या देशाला भविष्यकाळ नसतो, असे एक विधान आम्ही वाचले होते. या देशापुरते तरी हे विधान खोटे ठरो, अशी विनंती आम्ही आपल्याजवळ करतो.

पण देवा, हे सारे काय चालले आहे? नागरिक असुरक्षित आणि अतिरेकी मुक्त आहेत. रामदेवबाबांवर दिल्लीत प्रवेशाची बंदी लादली जाते आणि अतिरेकी बिनधास्त येऊन स्फोट घडवून जातात. अण्णा हजारे यांना गोळ्या घालण्याची खास सरकारी भाषेतील धमकी दिली जाते. ज्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत असे समाजकंटक सरकारच्या नजरेत येत नाहीत. असे का होते देवा? केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकताच आपल्या संपत्तीचा तपशील जाहिर केला. देवा, खूप आश्चर्य वाटले. दरमहा ५० हजार - एक लाखाचे वेतन आणि भत्ते घेणाऱ्या नेत्यांच्या मालमत्ता कोट्यवधींच्या आहेत, तरीही अनेकांच्या नावावर घर नाही, वाहन नाही... काय हा लोकशाहीचा चमत्कार! तिकडे आंध्रात जगनमोहन रेड्डींची मालमत्ता वर्षभरात दुप्पट होते. ते गोडीत होते तोपर्यंत सारे काही आलबेल होते. ते विरोधात जाताच त्यांची संपत्ती आक्षेपार्ह ठरली. तिकडे कर्नाटकात दुसरे रेड्डी डबल रोलमध्ये कार्यरत होते. इकडे भाजपाला मदत आणि तिकडे राजशेखर रेड्डी आणि जगनमोहन रेड्डी यांच्या रुपाने काँग्रेसला मदत. ही रसद चालू होती तोवर सारे आलबेल पण रसद तोडताच ते खलनायक? हे काय चालले आहे गणपतीबाप्पा?

इकडे अण्णा भ्रष्टाचाराविरुद्ध रणशिंग फुंकतात आणि तिकडे या तापलेल्या तव्यावर शेकण्यासाठी भाजपा आपल्या भाकरी थापून तयार राहते? निष्कलंक वैयक्तिच चारित्र्याच्या विषयावर अडवाणींबद्दल नक्कीच आदर वाटतो पण भ्रष्टाचाराने बरबटलेल्या त्यांच्या पक्षातील इतर काही नेत्यांचे काय? अण्णा हजारे यांनी 'त्यांच्या राज्यांत आधी लोकपाल नेमून दाखवावेत' या आव्हानाला या पक्षाने अद्यापपर्यंत कोणतेही उत्तर दिलेले नाही. पुढचे सरकार बनविण्याची मनस्वी इच्छा असलेल्या या पक्षाला अद्यापही ही सद्‌बुद्धी आपण का देत नाही देवा?

देवा, प्रत्येक युगाच्या अंति महाप्रलय येत असतो म्हणतात. साऱ्या व्यवस्था सडल्या, कुजल्या, निकामी झाल्या की देश एका मोठ्या अराजकाकडे वेगाने वाटचाल करू लागतो. आजची या देशाची अवस्था पाहून आम्ही सारे जण एका खूप मोठ्या अराजकाकडे निघालो आहोत, असे तुम्हाला वाटते का? हीच महाप्रलयाची सुरवात आहे का देवा?

खरे तर तुझ्या येण्याने एकेकाळी मोठा आनंद होत असे. मातीत हात घालण्याआधी तेव्हा घरची परवानगी लागत नसे. तुझी सुबक मूर्ती घडविण्याचा विचार फक्त विचारच राहायचा. प्रत्यक्षात बनलेल्या तुझ्या मूर्तीकडे तू स्वतः पाहिले असतेस, तर फक्त सोंड आहे म्हणून ती तुझीच मूर्ती आहे, एवढीच ओळखीची खूण पटली असती. तरीही तू प्रसन्न वाटायचास. आता सर्वोत्तम दर्जाच्या मूर्तीकारांनी तयार केलेली मूर्तीही मनाला प्रसन्न करत नाही. आता तुझ्या येण्याने मनावर दडपण येते. तू येणार म्हटले की आता तुझ्या आधी वर्गणीवाले गुंड येतात. मग कर्कशश 'डीजे'वाले गोंधळकर्ते येतात. त्या पाठोपाठ बंदोबस्ताच्या नावाखाली पोलिस येतात. मग आम्ही अतिरेकी येण्याची वाट पाहतो. ते आले नाहीत तर हुश्श म्हणतो आणि बिचाऱ्या पोलिसांना सारे श्रेय देऊन मोकळे होतो.

पण आता ही सहनशक्ती कुठपर्यंत टिकवणार देवा? आणि तू ही आजकाल निष्क्रीय होतो आहेस. योग्यता नसलेले लोक राज्यकर्ते आहेत. रक्षण करणाऱ्यांच्या हाती दंडुके आहेत आणि भक्षकांच्या हाती अद्ययावत शस्त्रे...! राज्यकर्ते बदलावेत, तर चांगला पर्याय कुठे आहे? असा स्थितीत आता तुझी सरबराई करणे आम्हाला जड जाते आहे बाप्पा... आपण सर्वज्ञ, आपणालाच हे कळायला हवे. आम्ही पुढच्या वर्षी लवकर येण्याच्या घोषणा तर दिल्या, पण तू जरा उशिरानेच आलास आणि लवकर गेलास तर आमची तेवढीच लवकर मुक्तता...! हळू हळू तुझे आगमन लांबवत जा आणि मुक्काम कमी करत जा. खात्रीने सांगतो, काही वर्षातच आम्ही तुला विसरून जाऊ... हे नको असेल तर मग नाही तर एकच कर, सर्वांना सद्‌सद्‌विवेकबुद्धी दे. देशाचे हित सर्वोच्च असल्याची जाणीव सर्वांच्या मनात पुन्हा एकदा जागृत कर... ही जबाबदारी आता तुझीच!

दत्ता जोशी
मो. ९२२५३०९०१०

■■

आंदोलनाने उभे केलेले प्रश्न

आंदोलन काळातील भयचकीत करणारी घटना म्हणजे लष्कर प्रमुखाने पुढे येऊन आंदोलनाचे समर्थन करण्याची आहे. आजपर्यंत कोणत्याही लष्करप्रमुखाने कधीही देशांतर्गत घटना व घडामोडींवर भाष्य केले नव्हते; पण या आंदोलनाच्या निमित्ताने ते घडले. लष्करी अधिकाऱ्याचे कुटुंबीय पहिल्यांदाच एखाद्या आंदोलनात सामील झाले असले तरी त्याबद्दल आक्षेप घेण्याचे कारण नाही. कारण तो त्यांचा नागरी अधिकार आहे. लष्कर प्रमुखाची सक्रियता ही मात्र नक्कीच चिंतेची बाब आहे. आंदोलनात सामील कार्यकर्त्यांना ही बाब चिंतेऐवजी भूषणावह वाटत असेल तर आपण पाकिस्तानच्या अनुभवावरुन काहीच धडा न घेता त्याच्या पावलावर पाऊल टाकायला उतावीळ झालो आहोत असाच त्याचा अर्थ होईल.

देशात विविध कारणांसाठी आणि विविध मागण्यांसाठी कमी जास्त तीव्रतेची आंदोलने उभी राहणे ही तशी नित्याचीच बाब आहे. मात्र साऱ्या देशाला ढवळून काढण्याची शक्ती असलेले आंदोलन हे नित्याचं आंदोलन असत नाही. ५-५० वर्षांत असे एखादे आंदोलन उभे राहत असते. श्री. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील उभे राहिलेले आंदोलन या प्रकारात मोडणारे आहे. खरे तर याला आंदोलन म्हणताना आंदोलन या शब्दाच्या मर्यादेची जाणीव होते. श्री. हजारे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला भावनिक तुफान किंवा भावनिक त्सुनामी म्हणणे सत्याच्या जास्त जवळचे होईल. असे तुफान देशाने लालकृष्ण अडवाणी यांच्या रथयात्रेच्या निमित्ताने अनुभवले असले तरी त्याचे नियोजन आणि तयारी, त्याची वातावरण निर्मिती दीर्घ काळ सुरू होती. मात्र अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन हे एखाद्या उठावासारखे होते. या निमित्ताने प्रकट झालेला लोक उद्रेक हा आजच्या राजकीय व्यवस्थेबद्दल लोकमानसात खदखदत असलेल्या प्रचंड असंतोषाचे प्रकटीकरण असल्याने यात विचारापेक्षा भावनिकता प्रबळ असणे स्वाभाविक आहे. किंबहुना ही भावनिकता हीच हजारे आंदोलनाची मोठी ताकद होती आणि आहे हे मान्य करावे लागेल; पण अशा भावनिक उद्रेकात विचाराचे स्थान गौण बनते. सर्वांगीण विचार करण्याची शक्ती लोप पावते. जोपर्यंत ही भावनिक लाट ओसरत नाही तोपर्यंत आंदोलनाचे परिणाम वगैरे या बाबी आंदोलकासाठी अजिबात महत्त्वाच्या नसतात. आंदोलना दरम्यान कोणी त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न म्हणजे आंदोलनाला विरोध करणे असल्याची तीव्र भावना अशा भावनिक प्रभाव असलेल्या आंदोलकांत असते; पण एकदा का हा भावनिक ज्वर ओसरला की मग आंदोलनात सर्व शक्तीनिशी व तीव्रतेनिशी सामील झालेला आंदोलक ही आंदोलनाच्या परिणामांविषयी विचार करायला तयार होतो.



सुधाकर जाधव

आंदोलन आणखी पुढे न्यायचे असेल तर तसा विचार करणे गरजेचे असते. आज तशी वेळ असल्याने या आंदोलनातून निर्माण झालेल्या काही प्रश्नांचा इथे उहापोह करणार आहे. या प्रश्नांची सार्वजनिक चर्चा देशहित लक्षात घेऊन झाली पाहिजे. ही चर्चा अभिनिवेशाने आणि वाद विवादाच्या स्वरुपात झाली तर त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. म्हणूनच या प्रश्नांची सार्वजनिक चर्चा करण्याआधी प्रत्येकाने मग तो आंदोलक समर्थक असो , आंदोलनाचा विरोधक असो की काठावर बसलेला असो त्याने या प्रश्नाची उत्तरे आधी स्वत:लाच दिली पाहिजेत. इथे उपस्थित करीत असलेल्या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडेही नाहीत. माझी भूमिका उत्तर शोधण्याची आहे, आंदोलनाच्या समर्थकावर किंवा विरोधकावर आरोप करण्याची नाही हे लक्षात घेऊन या प्रश्नाकडे पाहावे.

संस्था संघटनांच्या मर्यादा

लोकांचे प्रश्न समजून घेऊन ते मांडण्यासाठी, सोडविण्यासाठी किंवा त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी स्वयंसेवी संस्था किंवा संघटना निर्माण होत असतात. अशा संस्था संघटनांचे जाळे देशभर पसरलेले आहे.

स्वातंत्र्यानंतर जे काही महत्त्वाचे, ऐतिहासिक किंवा क्रांतिकारी कायदे संमत झालेत ते कायदे तयार करण्यात, ते कायदे विधिमंडळात संमत व्हावेत यासाठी प्रयत्न करण्यात यातील अनेक संस्था किंवा संघटनांनी मोलाची भूमिका निभावली आहे. लोकपाल कायद्याइतकेच महत्त्वाचे आणि यातील काही कायदे तर लोकपाल कायद्यापेक्षा अधिक परिणाम करणारे कायदे आहेत. स्वयंसेवी संस्था, संघटना यांच्या पुढाकाराने लोकसहभागातून निर्माण झालेले असे अनेक कायदे आज अस्तित्वात आहेत. रोजगाराची हमी देणारा कायदा, वन आणि

त्यातील संपत्तीवर लोकांचा हक्क प्रस्थापित करणारा कायदा, ग्राहक हक्क प्रस्थापित करणारा राष्ट्रीय ग्राहक संरक्षण कायदा किंवा सर्वांत महत्त्वाचा माहिती अधिकाराचा कायदा यासारखे अनेक कायदे लोक सहभाग व लोक चळवळीतून निर्माण झाले आहेत. मात्र अशा प्रकारचे कायदे तयार करताना सरकार व संबंधित संस्था-संघटना यांच्यात अनेक मुद्यांवर मतभेद असूनही ते मतभेद प्रभावी कायदा तयार करण्याच्या आड आले नाहीत हा या कायदा निर्मितीचा इतिहास सांगतो. यातील माहिती अधिकाराचा कायदा सोडला तर इतर कायदे संस्था-संघटनांनी सुचविलेल्या जवळपास सर्व तरतुदींसह सरकारने मान्य केले आहेत. माहिती अधिकाराच्या कायद्याचा जो मसुदा सरकारने संसदेत सादर केला होता तो माहिती अधिकार चळवळीने सुचविलेल्या अनेक तरतुदींना फाटा देणारा होता; पण प्रत्यक्षात जो कायदा संसदेने संमत केला त्या मसुद्यात तब्बल १५३ दुरुस्त्या करून व सर्व महत्त्वाच्या तरतुदींना स्थान देऊन! इथे लक्षात घेण्यासारखी बाब ही आहे की, कोणत्याही संस्था, संघटना व व्यक्तीने या सर्व कायद्यांत काय तरतुदी असाव्यात याचा आग्रह राखत असताना अंतिम मसुदा तयार करण्यात आम्हाला सहभागी करून घेतलेच पाहिजे असा अट्टहास कधीच धरला नव्हता. आम्ही सांगू तसाच कायदा संमत झाला पाहिजे असा तर कोणाचाच हट्ट नव्हता. तरीही सरकारने संबंधित व्यक्ती, संस्था आणि संघटना यांना सन्मानपूर्वक बोलावून कायदा तयार करण्यात त्यांची मदत घेतली होती. हा सगळा उज्ज्वल इतिहास असताना लोकपाल कायदा बनविताना सरकार व समाज प्रतिनिधी यांच्यात एवढ्या टोकाचा संघर्ष का निर्माण झाला असा प्रश्न निर्माण होतो. लोकपाल आला तर सरकारातील लोकांच्या मुसक्या आवळल्या जातील आणि म्हणून त्यांना लोकपाल कायदा होऊ द्यायचा नाही आणि केला तरी त्यात पळवाटा ठेवायच्या आहेत आणि म्हणून असा संघर्ष निर्माण झाला असेच उत्तर येईल. या उत्तरात तथ्य नाही असेही म्हणता येणार नाही; पण मग या उत्तरातून निर्माण होणाऱ्या प्रतिप्रश्नाचेही उत्तर शोधावे लागेल. राज्यकर्त्यांना व सरकारी यंत्रणेला जाचक व मारक ठरेल असा माहिती अधिकाराचा कायदा यांनीच मंजूर केला ना? रोजगार हमीचा कायदा वगळता वर उल्लेखिलेले बाकी तिन्ही कायदे राज्यकर्ते व त्यांचे समर्थक यांच्या हितसंबंधाना बाधक ठरणारे आहेत. लोकपाल तर जेव्हा चोरी पकडल्या जाईल तेव्हा चित्रात येईल; पण सर्व प्रकारची चोरी पकडल्या जाऊ शकेल असा महाभयंकर कायदा माहिती अधिकाराचा आहे. तो जर पाहिजे तसा बिनबोभाट संमत होऊ शकत असेल तर लोकपाल कायदा पाहिजे तसा संमत होणार नाही हे कसे मान्य करायचे? माहिती अधिकाराचा कायदा पंतप्रधान कार्यालयालाही लागू आहे आणि त्यावर सरकारसकट कोणाचाच आक्षेप नाही. लोकपाल बाबतीत असे आक्षेप उपस्थित होत असतील तर त्याची निश्चित काही कारणे असतील तर ती काय आहेत हे समजून घेण्याचा प्रयत्न करायला काय हरकत आहे? लोकपाल कायदा बनविण्यासंदर्भात सरकार व समाज प्रतिनिधी यांच्यात एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नातून संघर्ष उभा राहिला काय या अंगानेही विचार झाला पाहिजे. लोकपालचा कायदा तयार करण्याच्या मसुदा समितीत राजपत्रात नावे घोषित करून स्थान देण्याची मागणी कितपत समर्थनीय ठरविता येईल? सकृतदर्शनी हा प्रकार स्वयंसेवी संघटनांच्या मर्यादातिक्रमणाचा किंवा मर्यादा उल्लंघनाचा आहे. कायदा कसा असला पाहिजे व तो बनविण्यासाठी दबाव आणण्यासोबतच मदत करण्यास तत्पर असणे ही भूमिका आजपर्यंत राहत आली; पण आम्ही म्हणू तसा कायदा बनला पाहिजे अशी भूमिका घ्यायची असेल तर सरळ कायदेमंडळात प्रवेश करण्याचा मार्ग अधिक तर्कसंगत नाही का वाटत? पण समाज प्रतिनिधींचा कायदे बनविण्यातील सहभागाचा आग्रह आणि तो आग्रह मान्य करण्यात सरकारने दाखविलेली अपरिपक्वता व अदूरदर्शिता यात आजच्या संघर्षाची बिजे रोवल्या गेलीत असे वाटत नाही का?

४० वर्ष आणि चार दिवस

४० वर्षे लोकपालचा रेंगाळत पडलेला प्रश्न सिव्हिल सोसायटीने अवघ्या ६ महिन्यात ऐरणीवर आणला व मोठा लोकलढा उभा केला ही बाब अद्‌भूत आणि अभूतपूर्व अशीच आहे; पण ४० वर्षे हा प्रश्न रेंगाळला त्याचे महत्त्वाचे कारण त्याच्या परिणामकारकतेबद्दल फारसा विश्वास नसणे हे आहे. प्रशासकीय व्यवस्थेबद्दल नेमलेल्या सरकारी आयोगांकडून झालेली शिफारस वगळता मागणी झालीच नाही. मागणी होते आहे आणि सरकारे टाळाटाळ करताहेत असे कधी घडलेच नाही. कोणताही दबाव नसताना ६-७ वेळेस हे विधेयक मांडल्या गेले होते आणि लोकसभेत पहिल्यांदा मांडलेले हे विधेयक १९६९ साली संमतही झाले होते! सरकारने थोडीफार हालचाल केली होती; पण अन्य व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी लोकपाल प्रश्नाकडे कधीच गांभीर्याने लक्ष दिले नाही ही वस्तुस्थिती आहे. लोकपालची आवश्यकता व महत्त्व कोणाच्याच लक्षात न आल्याने हा प्रश्न रेंगाळला होता. आजच्या सिव्हिल सोसायटीचे नेते श्री. शांतीभूषण जनता राजवटीत कायदेमंत्री होते. त्यावेळेस त्यांनीसुद्धा हा प्रश्न रेटला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. दस्तुरखुद्द श्री. अण्णा हजारे जवळपास २० वर्षांपासून भ्रष्टाचाराच्या विरोधात लढत आहेत. सहा महिन्यांआधी त्यांनीसुद्धा भ्रष्टाचार निर्मूलनासाठी लोकपाल आवश्यक आहे असे कधी म्हटले नाही. अरविंद केजरीवाल, किरण बेदी किंवा शिसोदिया यांच्या संस्था किमान मागच्या पाच वर्षांपासून सक्रीय आहेत; पण मागच्या सहा महिन्यांतच त्यांनी ही मागणी उचलली आहे. हा प्रश्न रेंगाळला याचा दोष सर्वांकडे सारखाच जातो. ४०वर्षांनंतर हा प्रश्न सर्वांच्या अजेंड्यावर आला हीच सिव्हिल सोसायटीसाठी मोठी उपलब्धी आहे. सरकारेतर समूहांनी कायद्याचा मसुदा पुढे केल्यावर त्यावर साधकबाधक चर्चा होऊन त्याचे चांगल्या कायद्यात रुपांतर होण्यासाठी ४-५ वर्षांचा कालावधी लागत आला आहे. लोकपाल इतकेच ते महत्त्वाचे कायदे होते हे आपण बघितलेच आहे. अशा महत्त्वाच्या कायद्यावर सर्वांगीण विचार होऊन व सर्व संसदीय मर्यादांचे पालन होऊन ४-६ महिन्यांनंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले असते तर कोणते आकाश कोसळणार होते असा प्रश्न टीम अन्नाची विचक्षण व विलक्षण घाई पाहून निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. या अनाकलनीय घाईतून लोक विरुद्ध सरकार असा संघर्ष निर्माण झाला की असा संघर्ष निर्माण करण्यासाठीच अशी हातघाई करण्यात आली असा प्रश्न उभा राहतो. लोकपालचे निमित्त पुढे करून आणि अण्णांच्या खांद्यावर बंदूक ठेवून कोणाला काही साध्य करायचे तर नव्हते ना असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. हा प्रश्न पडण्यामागे एक महत्त्वाचे कारण हे आहे की, लोकपाल संदर्भात ज्या मुद्यांवर आंदोलन सुरू झाले होते ते मुद्दे तसेच कायम असताना अण्णांनी उपोषण सोडले. अण्णा साधे सरळ असले तरी पुरेसे खंबीर आहेत. सर्व साधारण स्थितीत त्यांनी उपोषण मागे घेतलेच नसते; पण हे आंदोलन चिघळत राहण्यात काही शक्ती कार्यरत आहेत हे ग्रामीण भागात राहण्यातून येणाऱ्या उपजत




शहाणपणाच्या आधारे अण्णांच्या लक्षात आले असावे आणि देशहीत लक्षात घेऊन त्यांनी आजूबाजूच्या रथीमहारथींना बाजूला सारून समझौत्याचा मार्ग प्रशस्त केला हे साऱ्या देशाने पाहिले आहे.

या मागे कोण?

अज्ञात हेतूने अज्ञात शक्ती आंदोलनात सक्रीय होत्या असे संकेत या आंदोलनातून नक्कीच मिळतात. आपल्याकडील टीव्ही चॅनल किती धंदेवाईक आहेत हे आपणा सर्वांना माहीत आहे. एका-एका मिनिटाच्या प्रसारणासाठी हजारो रुपये मोजावे लागतात. अशी चॅनल्स जेव्हा जाहिरातीविना रात्रंदिवस आंदोलनाचे प्रसारण करतात तेव्हा शंकेची पळ चुकचुकल्याशिवाय राहात नाही. या चॅनल्सचा टीआरपी वाढविण्याचा प्रयत्न म्हणून या प्रसारणाकडे पाहिल्या जाते; पण हा टीआरपी शेवटी जाहिरातीच्या कामीच येतो ना? हे प्रसारण कोणी प्रायोजित केले नसेल तर तब्बल १५ दिवस कोट्यवधींचा तोटा प्रत्येक चॅनलला सहन करणे ही फार मोठी गोष्ट आहे; पण त्यांच्या आजवरच्या वर्तनाच्या विपरीत असल्याने अविश्वसनीय वाटते. ही सगळी चॅनल्स आपल्या तोट्याचा हिशेब जाहीर करतील व तोटा कसा सहन केला हे स्पष्ट करतील तेव्हाच आपल्याला खरी परिस्थिती कळेल. असेच गौड बंगाल बॉलीवूडमधील सेलेब्रीटीचे आहे. ही मंडळीसुद्धा फुकट कुठे जात नाहीत. लाखो रुपयांचा मलिदा हाती आल्याशिवाय अगदी सदहेतूने व सामाजिक भल्यासाठी आयोजित कार्यक्रमांसाठी पैसे घेण्याची व ते हिशेबात न दाखविण्याची यांची परंपरा आहे. ही परंपरा यांच्या उपस्थितीबाबत नक्कीच शंका निर्माण करणारी आहे. ज्या मुद्यांसाठी हे आंदोलन होते त्या जनलोकपाल विधेयकाची प्रत आंदोलकांपर्यंत पोचली नाही; पण अण्णा टोपी, शर्ट, झेंडे यांचा प्रसार मात्र देशभर एका दिवसात झाला ही बाब नक्कीच चकीत करणारी आहे. आंदोलनाचे नेते सरकारशी वाटाघाटीत व्यस्त असताना हे परस्पर घडत होते. नियोजनबद्ध पद्धतीने हे कोण करीत होते ही बाब अजून गुलदस्त्यात आहे; पण आंदोलनाच्या नेतृत्वाशिवाय अन्य शक्ती आंदोलनात सक्रीय होत्या या शंकेस पुष्टी देणाऱ्या या घटना आहेत; पण सरकारी प्रचारामुळे संशयाची सुई राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे जाऊ शकते; पण त्यात यासाठी तथ्य असू शकत नाही की पैशांची उलाढाल करण्याची किंवा पैशांच्या बळावर उलथापालथ करण्याची संघाची परंपरा नाही. अण्णा आणि सर्व सामान्य आंदोलक जनता ज्याबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ होते अशा शक्तीचा वावर आंदोलनात होता अशी शंका येण्याचे भयचकित करणारे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. खरे तर या कारणाने देशभर वादळ उठायला हवे होते. पण आंदोलन काळात देश ज्या नाजूक स्थितीतून जात होता ते लक्षात घेऊन या घटनेवर मौन पाळणेच सर्वांनी श्रेयस्कर मानले असावे. भयचकित करणारी ही घटना म्हणजे लष्करप्रमुखाने पुढे येऊन आंदोलनाचे समर्थन करण्याची आहे. आजपर्यंत कोणत्याही लष्करप्रमुखाने कधीही देशांतर्गत घटना व घडामोडीवर भाष्य केले नव्हते; पण या आंदोलनाच्या निमित्ताने ते घडले. लष्करी अधिकाऱ्यांचे कुटुंबीय पहिल्यांदाच एखाद्या आंदोलनात सामील झाले असले तरी त्याबद्दल आक्षेप घेण्याचे कारण नाही. कारण तो त्यांचा नागरी अधिकार आहे. लष्करप्रमुखाची सक्रियता ही मात्र नक्कीच चिंतेची बाब आहे. आंदोलनात सामील कार्यकर्त्यांना ही बाब चिंतेऐवजी भूषणावह वाटत असेल तर आपण पाकिस्तानच्या अनुभवावरून काहीच धडा न घेता त्याच्या पावलावर पाऊल टाकायला उतावीळ झालो आहोत असाच त्याचा अर्थ होईल. या आंदोलनाच्या निमित्ताने सरकारची अकर्मण्यता व निर्णय घेण्याची अक्षमता सिद्ध झालीच आहे. यांच्या राजवटीला लष्करप्रमुख ही दुषणे देत असतील तर हे सरकार सत्तेत राहणे किती धोक्याचे आहे याची ही चाहूल आहे. लोकशाही व संसदीय मार्गाने या सरकारला लवकरात लवकर पायउतार करण्याची गरज लक्षात न घेता आम्ही लोकपालसाठी भांडत बसून मोठ्या अनर्थाला तर निमंत्रण देत नाही आहोत ना या प्रश्नावर अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे.

लोकपाल विधेयकाने काय होईल?

अण्णांचे एक सहकारी मनीष शिसोदिया यांनी एका न्युज चॅनलवरील चर्चेत भाग घेताना हे आंदोलन भ्रष्टाचार निर्मूलनासाठी आहे असे म्हणण्यापेक्षा जनलोकपालसाठी आहे असे म्हणणे बरोबर राहील असे म्हटले आहे. भ्रष्टाचार निर्मुलन आणि जनलोकपाल ही एकच गोष्ट नाही हे त्यांच्या प्रतिपादनातून स्पष्ट होते. जनलोकपाल भ्रष्टाचार निर्मुलनासाठी नाही हे एक सत्य त्यातून उघड होते. भ्रष्टाचारी व्यक्तीवर जरब बसावी आणि त्याला जबर शिक्षा व्हावी यासाठी लोकपाल आहे ही वस्तुस्थिती आहे; पण आंदोलनात सामील सर्व सामान्यांना मात्र भ्रष्टाचार निर्मूलनाचा जालीम उपाय म्हणजे जनलोकपाल वाटतो. जनलोकपालमुळे भ्रष्टाचार कमी होईल हे अण्णा हजारेंवरील त्यांच्या विश्वासामुळे वाटत असणार हे उघड आहे. अण्णांनी जंतरमंतरवर जनलोकपालने भ्रष्टाचार ९०% कमी होईल असे सांगितले तेव्हाही लोकांनी त्यावर विश्वास ठेवला आणि आता रामलीला मैदानावर त्यांनी हा दावा ६५% पर्यंत खाली आणला तरी त्यांचा विश्वास ढळला नाही. हा विश्वास सार्थ मानला तरी ६५% नी भ्रष्टाचार कमी होणार याचा अर्थ काय होतो याचा आंदोलकांनी खोलात जाऊन

विचार केला आहे काय? जनलोकपालच्या कक्षेत येणारा भ्रष्टाचार आणि जनलोकपालच्या कक्षेबाहेरचा भ्रष्टाचार असे वर्गीकरण करून त्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाचा विचार केलेला दिसत नाही. लोकपालच्या कक्षेत फक्त लोकसेवक येतात. यांच्याइतकेच किंबहुना लोकसेवकापेक्षा मोठा भ्रष्टाचार व्यापार आणि उद्योग जगतात होतो. ही क्षेत्रे म्हणजे करचोरी आणि काळ्या पैशांच्या निर्मितीची कारखाने आहेत. यावर कोणताही अंकुश लोकपालचा असणार नाही. व्यावसायिकांनी व उद्योगपतींनी बाहेर देशात ठेवलेला काळापैसा लोकपालमुळे परत येईल अशी समजूत करून दिली जात असली तरी ती खरी नाही. यांच्या कोणत्याही व्यवहारावर लोकपाल नियंत्रण ठेवू शकणार नाही. भूखंड लाटण्याचे प्रकार जसे राजकीय लोकांनी केले तसेच माध्यमांच्या मालकांनीही केलेत. अशी किती तरी भ्रष्टाचाराची बेटे आहेत तिथे लोकपाल काहीच करू शकणार नाही. अगदी पंतप्रधानांपासून ग्रामसेवकांपर्यंत जरी लोकपालच्या कक्षेत ठेवले तरी निम्माही भ्रष्टाचार लोकपालच्या कक्षेत येत नाही. यातही मोठ्या भ्रष्टाचाराने पोखरलेले संरक्षणक्षेत्र आधीच बाजूला काढून ठेवले आहे. गणिती भाषेत सांगायचे झाले तर साधारण पणे ४०% भ्रष्टाचार लोकपालच्या कक्षेत येईल आणि अण्णांचे म्हणणे प्रमाण मानायचे झाले तर या ४०% भ्रष्टाचारातील ६५% भ्रष्टाचार कमी होणार! म्हणजे देशात चाललेल्या भ्रष्टाचारापैकी जेमतेम २५% भ्रष्टाचार लोकपालमुळे कमी होईल हा अण्णांच्या दाव्याचा अर्थ होतो. हा भ्रष्टाचार कमी करण्यासाठी लोकपालची जी यंत्रणा उभी केली जाणार आहे त्यासाठी अण्णांनी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १% रक्कमेची तरतूद करण्याची मागणी केली होती. आज अशी तरतूद ७५००० कोटींच्या घरात जाते व २-३ वर्षात ही रक्कम वाढून लाख कोटीच्या घरात जाईल. लोकपालची यंत्रणा सरकारीच राहणार आहे आणि सरकारी यंत्रणा भ्रष्ट होणार नाही याची १% तरी खात्री कोणाला देता येईल का? या पद्धतीने विचार केला आणि त्याचे अधिकार व अधिकार कक्षा या संबंधीच्या वादांचा विचार बाजूला ठेवला तरी लोकपालच्या रूपाने आपण कोणते दुखणे विकत घेत आहोत याची कल्पना येऊ शकेल. खरी गोष्ट अशी आहे की निरंकुश सत्ताधाऱ्यांना लगाम घालण्याची आमची मनापासूनची इच्छा आहे आणि त्यासाठी आमची कोणतीही किंमत मोजण्याची तयारी आहे! दरवर्षीच्या एक लाख कोटी रुपये खर्चाचे सोडून द्या, त्यासाठी आमची लोकशाहीवर पाणी सोडण्याचीदेखील तयारी आहे. लोकशाहीला आम्ही एवढे विटलो आहोत की लोकशाही मार्गाने निरंकुश राज्यकर्त्यांवर अंकुश ठेवता येतो हा विचारही आमच्या मनाला शिवत नाही. आपल्या अशा मानसिकतेतून आंदोलनातील सहभाग लोकशाही व्यवस्थेला संकटात टाकणारा नाही का याचे स्वत:लाच प्रामाणिक उत्तर देण्याची ही वेळ आहे.

सर्वोच्चतेच्या मर्यादा

या आंदोलनाच्या निमित्ताने एका महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा सुरू झाली आहे तो मुद्दा म्हणजे लोकशाहीत सर्वोच्च कोण? लोक की संसद? या मुद्यांवर दोन्ही बाजूंनी टोकाची मते व्यक्त होत आहेत. खरे तर आदर्श स्थिती ही आहे की असा प्रश्नच निर्माण होता काम नये. कारण संसद ही लोकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे; पण असा प्रश्न निर्माण होण्याची दोन कारणे आहेत. एक तर, लोकप्रतिनिधी आपल्या मतदार संघाचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करीत नाही. निम्म्याही मतदारांचे त्याला समर्थन लाभत नाही. निवडून गेल्यानंतर लोकांचा त्यांच्यावर अंकुश राहील अशी व्यवस्था विकसित करण्यात आलेले अपयश आहे. समुचित कायद्याचा अभाव व मतदारांचे मतदानाकडे होत असलेले दुर्लक्ष ही या मागची कारणे आहेत. आजची व्यवस्थाच अशी आहे की त्यात प्रतिनिधीचे निरंकुश बनणे सहज संभव आहे आणि त्याचे दुष्परिणाम लोकांना भोगावे लागणे अपरिहार्य आहे. यातूनच आजच्यासारखा संघर्ष उभा राहतो. अशा संघर्षातून कोणाची सर्वोच्चता सिद्ध होऊ शकत नाही. अशा संघर्षातून सर्वोच्चता सिद्ध करण्याचा रस्त्यावरील लोकांनी किंवा संसदेत बसलेल्या प्रतिनिधींनी प्रयत्न केला तर त्यातून फक्त अराजकता माजेल. लोकशाहीत लोकांची सर्वोच्चता अंतिमत: मत पेटीतूनच प्रकट होत असते हे विसरून चालणार नाही. रस्त्यावर उतरून भावना आणि मत व्यक्त करण्याचा लोकांचा अधिकार आहे आणि त्यांच्या मताचा आदर आणि कदर करणे हे कायदे मंडळात बसलेल्या प्रतिनिधींचे कर्तव्य आहे एवढीच निष्पत्ती या संघर्षातून झाली तर लोकशाही बळकट होईल. लोकांच्या भावना लोकप्रतीनिधींना कळतच नसतील तर मतपेटीद्वारे त्यांना पायउतार करणे हाच मार्ग उरतो. अन्य मार्गाने संसदेचे नाक दाबून आपले म्हणणे मान्य करून घेण्याचा प्रयत्न किती घातक ठरू शकतो याची उदाहरणे इतिहासात आहेत. ३०००० च्या जमावाच्या मदतीने इटलीमधील रोमच्या रस्त्यावर ठिय्या मांडून आणि तिथल्या पार्लमेंटला वेढा घालून मुसोलिनीने सत्ता काबीज केली होती या घटनेला अजून १०० वर्षे पूर्ण व्हायचीच आहे. या आंदोलनात दोन्ही बाजूंनी सर्वोच्चतेचा दाखविला गेलेला अहंकार घातक वळणावर येऊन पोचला होता हे समजून घेण्यात व मान्य करण्यात खरा प्रामाणिकपणा आहे. आपल्या मनात काय आहे हेदेखील नीट तपासण्याची गरज आहे. आपल्याला लोकपाल हवा की लोकप्रतिनिधीवर अंकुश हवा याचे उत्तर आपले आपण शोधले पाहिजे. लोक प्रतिनिधीवर अंकुश ठेवण्याचा आसूड आपण दुसऱ्याच्या हाती देण्यासाठी का जीवाचे रान करीत आहोत? लोकशाहीत हा आसूड जनतेच्या हातीच राहिला पाहिजे. आमच्या प्रतिनिधीचे सुप्रीम कोर्ट किंवा आणखी कोणी उपटसुंभ कान धरीत असतील तर तो आपला अधिकार आहे हे विसरून आम्ही टाळ्या वाजविण्याचे काम करतो. जिथे जनता आपल्या अधिकाराचे भान न ठेवता आपल्या अधिकारावर पाणी सोडण्यात आनंद मानते तेव्हा लोकशाहीच्या भवितव्याची चिंता करण्याचे दिवस येतात. लोकप्रतिनिधींवरील जनतेच्या अंकुशाचा पर्याय लोकपाल नाही तर राइट टू रिकॉल, राइट टू रिजेक्ट, मतदानाची टक्केवारी शतप्रतिशत राहील यावर भर देणाऱ्या निवडणूक सुधारणा आहेत. त्यासाठी कंबर कसण्याची खरी गरज आहे. लोकशाहीत लोकांची सर्वोच्चता या निवडणूक सुधारणांमधून प्रस्थापित होणार आहे. लोकपालाने राज्यकर्ते धोक्यात येतील अशी आमची समजूत आहे, पण लोकपालामुळे खरी धोक्यात येणार आहे ती लोकांची सर्वोच्चता! लोकांचे श्रेष्ठत्व व लोकपालचे श्रेष्ठत्व या परस्परविरोधी संकल्पना आहेत आणि लोकपालच्या निर्मितीतून लोकांची सर्वोच्चता सिद्ध करण्याच्या बाता म्हणजे निव्वळ आत्मवंचना आहे.

सुधाकर जाधव
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

सत्तास्थळ हेच भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र : उत्तरार्ध

लायसन्स-कोटा-परमिटच्या अतिरेकामुळे राजकारणी आणि प्रशासकीय मंडळींना चरण्यासाठी मोठे कुरण उपलब्ध झाले आहे. टप्प्याटप्प्यावर निर्माण झालेल्या शासकीय चारा केंद्रांवर अंकुश लावण्यासाठी जोपर्यंत धोरणात्मक पावले उचलण्यात येत नाही तोपर्यंत भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे कठीण आहे. अण्णा हजारेंचे भ्रष्टाचाराविरोधातील आणि जनलोकपाल विधेयकाच्या समर्थनार्थ सुरू असलेले आंदोलन या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे एवढेच म्हणता येईल. टीम अण्णाला जनलोकपाल विधेयकाच्या मसुद्याखेरीज करावयाच्या अन्य उपाययोजनांबद्दल अजूनही नीटशी मांडणी करता आलेली नाही. गरजेनुसार वेळोवेळी टीम अण्णा वेगवेगळे विचार मांडतात, त्यांच्या विचारात एकजिनसीपणा फारसा आढळत नाही, हे अनेकवेळा सिद्ध झालेले आहे.

समाजाची जसजशी पुढे वाटचाल होत जाते तसतशी नैतिकता आणि भ्रष्टाचाराची परिमाणे बदलत जाणे अपरिहार्य असते. कालची अनैतिकता ही आजची नैतिकता व कालचा असंस्कृतपणा हा आजचा संस्कृतपणा ठरायला लागतो. आजीबाईला नातीच्या ड्रेसमध्ये असंस्कृतपणा दिसणे, नातवाला आजोबाचे विचार सनातन वाटायला लागणे किंवा सासू आणि सुनेच्या विचारात जनरेशन गॅप दिसायला लागणे, हा सामूहिक मानसिकतेतील बदल याच वाहत्या काळाच्या वाहत्या बदलातून आलेला असतो. काळानुरूप भ्रष्टाचाराच्या व्याख्याच बदलत गेल्याने कालच्या भ्रष्टाचाराची जागा आज शिष्टाचाराने घेतली असते. मात्र भ्रष्टाचार पूर्वापार काळापासून चालत आला असला तरी आजच्या एवढी अत्युच्च पातळी कधीच गाठलेली नव्हती, असे मात्र नक्कीच म्हणता येईल. भ्रष्टाचाराचे मुख्य कारण सरकारच्या चुकीच्या धोरणातच दडलेले असल्याने, राज्यकर्ते हेच मुख्यतः भ्रष्टाचारात डुबलेले असल्यानेच भ्रष्टाचाराला राजमान्यता मिळाल्याचे अघोषित स्वरूप प्राप्त झाले आहे. भ्रष्टाचार एका निहीत मर्यादेपर्यंत खपवून घेतला जाऊ शकतो पण आज शासकीय आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराने मर्यादेच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराला आवर घालणे ही काळाची गरज झाली आहे. नाकाला सुसह्य असणारा मोती दागिना ठरत असला तरी तोच मोती जर नाकापेक्षा जड व्हायला लागला तर ते असह्य व हानिकारक ठरत असते मग त्याला काढून फेकण्याशिवाय गत्यंतर उरत नसते. भ्रष्टाचाराने नैतिकता आणि सभ्यतेच्या पार व्याख्याच बदलून टाकल्या आहेत. धर्म-पंथाच्या शिकवणी व मूल्ये भ्रष्टाचाराच्या बाबतीत इतिहासजमा झालेली आहेत. धर्मपंथांवर किंवा पापपुण्यावर श्रद्धा बाळगणारे भ्रष्टाचारापासून दूर आहेत, असे काही आज चित्र राहिलेले नाही.



गंगाधर मुटे

भ्रष्टाचारामुळे वैतागलेल्या जनतेला आता दाहक चटके बसू लागल्याने त्याविरोधात प्रचंड जनमानस तयार व्हायला लागले आहे. भ्रष्टाचार निर्मूलनाविषयी त्यांच्यात एकमत असले तरी करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात मात्र मतभिन्नता आढळते. भ्रष्टाचार संपला पाहिजे असे ज्यांना वाटते, त्यांच्यात भ्रष्टाचार संपविण्याविषयीचे प्रामुख्याने दोन मतप्रवाह आढळतात.

कठोर जनलोकपाल : टीम अण्णा आणि त्यांच्या समर्थकांना कठोर जनलोकपाल विधेयक आणले की, भ्रष्टाचाराला आळा बसेल असे वाटते. याव्यतिरिक्त इतर काही ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशा तऱ्हेच्या भूमिकेचे अजून तरी त्यांनी सूतोवाच केलेले नाही किंवा यासंदर्भात त्यांना शास्त्रीय किंवा अधिक तार्किक विचार करण्याची फारशी गरज भासत आहे, असेही दिसत नाही.

नैतिकतेची पातळी उंचावणे : लोकपाल वगैरे आणल्याने भ्रष्टाचार संपणार नाही कारण भ्रष्टाचाराची सुरुवात नैतिकतेची पातळी खालावल्याने झाली असे ज्यांना वाटते त्यांची लोकपालाने काहीही साध्य होणार नाही, अशी धारणा आहे. त्यासाठी जनजागरण करून जनतेत उच्च कोटीची नैतिकता रुजविली पाहिजे असे त्यांना वाटते.

मला मात्र तसे वाटत नाही. कठोर जनलोकपाल आणल्याने किंवा नैतिकतेची पातळी उंचावल्याने अंशतः भ्रष्टाचाराला आळा बसेल परंतू आर्थिक भ्रष्टाचार पूर्णतः नियंत्रणात येऊच शकणार नाही. कारण मागील लेखात म्हटल्याप्रमाणे मनुष्यस्वभावातच विविधता भरली आहे. आर्थिक भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने विचार केल्यास मनुष्यस्वभावाचे ढोबळमानाने चार प्रकारात वर्गीकरण करता येईल.

अ) काही व्यक्ती निष्कलंक चारित्र्याच्या असतात. त्यांना नैतिकतेची चाड असते आणि त्यांच्या मनात

समाजाविषयीचा सन्मानही असतो.

ब) काही व्यक्ती समाजाला व कायद्याला भीत नाहीत पण नैतिकतेला सर्वोच्च स्थान देतात.

क) काही व्यक्तींच्या आयुष्यात नैतिकतेला अजिबात स्थान नसते पण कायद्याला अत्यंत घाबरणाऱ्या असतात.

ड) मात्र व्यक्तींचा एक वर्ग असाही असतो की तो कशालाच जुमानत नाही. ना नैतिकतेला ना कायद्याला. नैतिकतेला आणि कायद्याला न जुमानणारा वर्ग कायमच स्वार्थ साधण्यासाठी संधीच्या शोधात असतो. नानाविध कसऱ्या लढवीत असतो, कायद्यातील पळवाटा शोधून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा सतत प्रयत्न करत असतो.

अ आणि ब वर्गप्रकारातील व्यक्ती स्वमर्जीनेच वाममार्गाने जाण्याचे टाळतात. त्यांचा स्वतःचा स्वतःवर ताबा असतो. त्यांना ऐहिक किंवा भौतिक सुखापेक्षा आत्मसुख महत्त्वाचे वाटते. अशा व्यक्ती भ्रष्टाचाराशी दूरान्वयानेही आपला संबंध येऊ देत नाही. पण ह्या व्यक्ती राजकारणात किंवा प्रशासनात जायचे टाळतात. उच्च आदर्श घेऊन राजकारणात गेल्याच तर आजच्या काळात हमखास अयशस्वी होऊन अडगळीत फेकल्या जातात. उच्च आदर्श घेऊन प्रशासनात वावरताना अशा व्यक्तींची पुरेपूर दमछाक होते. प्रशासनात एकलकोंडी किंवा निरर्थक भूमिका वाट्याला येते. इतरांप्रमाणेच भ्रष्टाचारात सामील होता येत नसल्याने वारंवार प्रशासकीय बदल्यांना सामोरे जावे लागते. या व्यक्ती स्वतःहूनच भ्रष्टाचार करीत नसल्याने यांना कायदा किंवा नैतिकता शिकविण्याची गरजही उरत नाही.

ब वर्गप्रकारातील व्यक्तींना नैतिकतेचे धडे देऊन किंवा कायद्याचा धाक दाखवून भ्रष्टारापासून रोखले जाऊ शकते. मग नैतिकता कोणी कुणाला शिकवायची याचा विचार करणे आवश्यक ठरते. ज्ञानदेव, तुकारामांचा काळ संपल्यानंतर गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्यासारखे थोडेफार अपवाद वगळले तर नैतिकतेची शिकवण देणाऱ्या लोकशिक्षकांची पिढीच लयास गेली आहे. शाळा-महाविद्यालयीन अभ्यासक्रमात नैतिकतेची शिकवण हा उद्देशच निकाली काढण्यात आला आहे. शासकीय किंवा निमशासकीय शिक्षण संस्थेला लाच दिल्याशिवाय शिक्षकाची किंवा प्राध्यापकाची नोकरीच मिळत नसेल तर मग अशा परिस्थितीत आजच्या युगातील गुरू किंवा गुरुकुलाच्या स्थानी निर्माण झालेल्या शिक्षणसंस्था कोणत्या तोंडाने विद्यार्थ्यांना नैतिकतेचे धडे देणार, याचाही विचार झाला पाहिजे. अशा नीतिमत्ता गमविलेल्या शिक्षणव्यवस्थेत शिकून बाहेर पडणारा ब प्रकारातील मनुष्यस्वभाव असलेला विद्यार्थी प्रशासनात गेला किंवा राजकारणात गेला तर तेथे भ्रष्टाचारापासून अलिप्त राहील अशी कल्पनाच करणे मूर्खपणाचे ठरते. पण ब प्रकारच्या व्यक्ती कायद्याला घाबरणाऱ्या असल्याने कठोर कायद्याने आणि त्याच्या अंमलबजावणीने वठणीवर येऊ शकतात. त्यांच्यासाठी कठोर जनलोकपालासारखा कायदा रामबाण इलाज ठरू शकतो.

ड प्रकारातील व्यक्ती मात्र नैतिकता आणि कायदा दोहोंनाही घाबरत नाही. नैतिकता बासनात गुंडाळून कायद्याला हवे तसे वाकविण्यात ही मंडळी तरबेज असतात. आज भ्रष्टाचाराने जे उग्र रूप धारण केले आहे त्याचे खरेखुरे कारण येथेच दडले आहे.

उच्च शिक्षण घेणे आणि प्रशासनात नोकरी मिळविणे, या दोन्ही प्रकारामध्ये पाय रोवण्याचा आधारच जर गुणवत्तेपेक्षा आर्थिकप्रबळतेवर आधारलेला असेल तर तेथे नैतिकतेची भाषा केवळ दिखावाच ठरत असते, हे मान्य केलेच पाहिजे.

प्रचलित व्यवस्थेत भ्रष्टाचाराची अनिवार्यता

आज राजकारणदेखील अत्यंत महागडे झाले आहे. तुरळक अपवाद वगळले तर खासदारकीची निवडणूक लढायला कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. खर्च करण्याच्या बाबतीत एकएक उमेदवार आठ-नऊ-दहा अंकीसंख्या पार करतो, हे आता लपून राहिलेले नाही. ज्याला राजकारणात जायचे असेल त्याला प्रथम बऱ्यापैकी माया जमविल्याखेरीज राजकारणात जाण्याचे स्वप्नही पाहता येत नाही. राजकारणात जाणे दूर; केवळ स्वप्न पाहायचे असेल तरी माया जमविण्यासाठी भ्रष्टाचार करणे अपरिहार्य आणि अनिवार्य झाले आहे.

लोकशाहीच्या मार्गाने देशातील सर्वच नागरिकांना निवडणुका लढण्याचे अधिकार आहेत, हे वाक्य उच्चारायला सोपे आहे. पण निवडणूक लढवायची झाल्यास भारतातील नव्वद टक्के जनतेकडे कोट्यवधी रुपये आहेत कुठे? राजकारण आणि सत्ताकारणावर कायमची मजबूत पकड ठेवण्यासाठी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून प्रस्थापित व्यवस्थेकडे एवढे प्रचंड आर्थिक पाठबळ तयार झाले आहे की, आता देशातील नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त जनतेचे राजकारणाकडे जाणारे सर्व रस्ते बंद झाले आहेत.

म्हणून भ्रष्टाचार नियंत्रण किंवा भ्रष्टाचारमुक्तीचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, शासन आणि प्रशासनावर घट्ट पकड ठेवून असलेले सर्व प्रस्थापित हे ड या वर्गप्रकारातीलच आहे. यांना नैतिकतेचे धडे शिकवणे जसे उपयोगाचे नाही तसे कठोर कायदे करूनही फारसा उपयोग नाही, कारण कायदे बनविणारेही तेच, कायदे राबविणारेही तेच आणि सोयीनुसार कायद्याला हवे तसे वाकविणारेही तेच; असा एकंदरीत मामला आहे.

नेता तस्कर, गुंडा अफसर

सर्व बाजूंनी विचार करता एक मुद्दा सहज उलगडत जातो की, केवळ नैतिकतेची शिकवण देऊन किंवा कठोर कायदे केल्याने भ्रष्टाचार आटोक्यात येण्याची शक्यता नाही. नैतिकता आणि कायदे यांनाही काही मर्यादा आहेत, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात म. गांधींचा स्वदेशी-गांधीवाद बासनात गुंडाळून नेहरूनितीचे या देशाच्या शासकीय व्यवस्थेवर रोपण करण्यात आले. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याऐवजी सत्तेच्या केंद्रीकरणाला चालना देण्यात आली. लायसन्स-कोटा-परमिटचे राज्य प्रस्थापित करण्यात आले. देशातल्या ९०-९५ टक्के लोकांना अजिबात अक्कल नाही, असे गृहीत धरून या ९०-९५ टक्के सामान्य जनतेवर पुढारी आणि सरकारी नोकरांचे पावलोपावली नियंत्रण लादण्यात आले. त्यातूनच देशाला विकासाकडे नेण्याची आणि देशाचा गाढा सक्षमपणे चालविण्याची पात्रतेसहित अक्कल केवळ पुढारी व नोकरशहा यांनाच आहे; उर्वरित ९०-९५ टक्के आम जनता म्हणजे केवळ निर्बुद्ध, देशबुडवी, तंटेखोर, करबुडवी आहे, अशा तऱ्हेचे विचित्र जनमानस या देशात तयार झाले. पुढारी किंवा नोकरशाही यांची रीतसर परवानगी मिळविल्याशिवाय ९०-९५ टक्के आम जनतेला काहीही करता येत नाही, असे चित्र तयार झाले. आम जनता दुर्बल आणि मूठभर राज्यकर्ते-नोकरशाही प्रचंड शक्तिशाली असे समीकरण निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तर काळात सारे अधिकार नोकरशाहीच्या अखत्यारीत गेलेले आहेत. काहीही करण्यासाठी पुढे पाऊल टाकायचे म्हटले तर पावलोपावली नोकरशाही आडवी येते. शेती करायची असो की व्यापार,



आज राजकारणदेखील अत्यंत महागडे झाले आहे. तुरळक अपवाद वगळले तर खासदारकीची निवडणूक लढायला कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. खर्च करण्याच्या बाबतीत एकएक उमेदवार आठ-नऊ-दहा अंकीसंख्या पार करतो, हे आता लपून राहिलेले नाही. ज्याला राजकारणात जायचे असेल त्याला प्रथम बऱ्यापैकी माया जमविल्याखेरीज राजकारणात जाण्याचे स्वप्नही पाहता येत नाही. राजकारणात जाणे दूर; केवळ स्वप्न पाहायचे असेल तरी माया जमविण्यासाठी भ्रष्टाचार करणे अपरिहार्य आणि अनिवार्य झाले आहे.

लोकशाहीच्या मार्गाने देशातील सर्वच नागरिकांना निवडणुका लढण्याचे अधिकार आहेत, हे वाक्य उच्चारायला सोपे आहे. पण निवडणूक लढवायची झाल्यास भारतातील नव्वद टक्के जनतेकडे कोट्यवधी रुपये आहेत कुठे?

उद्योग करायचा असो की स्वयंरोजगार, ही नोकरशाही जागोजाग अडवणुकीसाठी ठाण मांडून बसलेली आढळते. अगदी स्वतःचे मकान स्वतःचे जागेवर बांधायचे ठरवले तरी कागदोपत्रांच्या जंजाळाला तोंड द्यावे लागते. ही नोकरशाही कधीच कोणाला कसलीच मदत करीत नाही. उलट आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे सांत्वन करण्याऐवजी पॅकेजवर डल्ला मारून जाते. वाहन कसे चालवायचे याचे शिक्षण देत नाही मात्र लायसंस देण्यासाठी उकळता येईल तेवढा निधी उकळते. नोकरशाहीचा प्रत्येक विभाग याच तऱ्हेने चालतो. आमदार-खासदार-मंत्री दर पाच वर्षाने बदलत राहतात. त्यांच्या मालमत्तेचे आकारमान व घनता दोन्ही बदलत जाते पण आम जनतेचे नशीब काही केल्या बदलत नाही. सरकारे बदलतात पण सरकारी धेय्यधोरणे आहे तीच कायम राहतात. सत्ताधारी बदलतात पण सत्ता बदलत नाही म्हणून आमजनतेचे प्रश्नही निकाली निघत नाही. सत्तेकडे जाणारी पावले जनसेवा करण्याच्या उद्देशाने नव्हे तर सत्तेत असलेल्या मलिद्यांच्या आकर्षणाने सत्तेकडे आकर्षित होतात, हे मूलभूत तत्त्व मान्य केल्याखेरीज आणि त्या अनुरूप उपाययोजना केल्याखेरीज भ्रष्टाचाराचा प्रश्न निकाली निघणे केवळ अशक्य आहे.

Govt resolve no problem, govt is the Problem.

लायसन्स-कोटा-परमिटच्या अतिरेकामुळे राजकारणी आणि प्रशासकीय मंडळींना चरण्यासाठी मोठे कुरण उपलब्ध झाले आहे. टप्प्याटप्प्यावर निर्माण झालेल्या शासकीय चारा केंद्रांवर अंकुश लावण्यासाठी जोपर्यंत धोरणात्मक पावले उचलण्यात येत नाही तोपर्यंत भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे कठीण आहे. अण्णा हजारेंचे भ्रष्टाचाराविरोधातील आणि जनलोकपाल विधेयकाच्या समर्थनार्थ सुरू असलेले आंदोलन या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे एवढेच म्हणता येईल. टीम अण्णाला जनलोकपाल विधेयकाच्या मसुद्याखेरीज करावयाच्या अन्य उपाययोजनांबद्दल अजूनही नीटशी मांडणी करता आलेली नाही. गरजेनुसार वेळोवेळी टीम अण्णा वेगवेगळे विचार मांडतात, त्यांच्या विचारात एकजिनसीपणा फारसा आढळत नाही, हे अनेकवेळा सिद्ध झालेले आहे. दर वर्षाला चाळीस हजार कोटीपेक्षा जास्त भ्रष्टाचार असलेल्या राशनव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यात त्यांना स्वारस्य नाही, हेही दिसून आले आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात जनमानस तापविण्याचे मोठे कार्य अण्णांनी केले आहे, हे जरी खरे असले तरी केवळ जनलोकपाल विधेयकामुळे भ्रष्टाचार आटोक्यात येईल, हा केवळ कल्पनाविलास आहे. भ्रष्टाचार संपविण्यासाठी प्रथम लायसन्स-कोटा-परमिटचे राज्य संपवणे गरजेचे आहे. पण नेमका हाच मुद्दा सोडून बाकी अवांतर मुद्यांवरच चर्चा केली जात आहे. घरभर गूळ आणि साखर अस्ताव्यस्त पसरवून द्यायची, मग मुंग्यांना साखर खाण्यापासून रोखण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करायची. माशांना हाकलण्यासाठी दुसरी यंत्रणा निर्माण करायची. माकोडे अडवण्यासाठी तिसरी यंत्रणा निर्माण करायची. या यंत्रणांना मुंग्या-माशां-माकोड्यांना अडवण्यात यश येत नाही असे दिसले की चवथी यंत्रणा उभारण्याची मागणी करायची, असा सारा हा प्रकार चाललेला आहे. गूळ किंवा साखर हवाबंद डब्यात ठेवली की मुंग्या-माशांना सहज चरण्यासाठी उपलब्ध असणारे केंद्र आपोआप नष्ट होते आणि प्रश्न सहजगत्या निकाली निघतो. अगदी त्याच धर्तीवर भ्रष्टाचार नियंत्रित करण्यासाठी भ्रष्टाचाराचा उगम आणि शक्तिशाली केंद्रे शोधून ती नष्ट केली पाहिजेत. तरच भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. पण माशा-माकोडे हाकलण्याच्या नावाखाली या यंत्रणांनाच गुळासाखरेवर डल्ला मारायचा असल्याने ते सहजासहजी कोणत्याही व्यवस्थाबदलाला राजी होतील, अशी शक्यता आज तरी दिसत नाही.

गंगाधर मुटे
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

रोजचाल विधेयक

किडनी फेल झालेल्या अमरसिंगाची बाजू घ्यायला साक्षात जयाप्रदा येऊनही काही उपयोग नसतो तर भूमीवर खड्डे करून त्या खड्ड्यांत विवरे करून पुढे त्याच्या खाणीतून १६०० कोटी रुपयांची मालमत्ता बनवूनही महान रेड्डी बंधू बेल्लारीकर यांचाही घडा भरतो, पडतो आणि फुटतो. हे सगळे आपल्याला का दिसते आहे? हे सगळे आपल्याला आपले स्थिर, वैभवशाली, शांत, सौम्य आणि स्तब्ध नशीब दाखवते आहे. हे सारे ते का दाखवत आहे तर त्या नशिबाने आपल्याला स्वत:हून आणि अण्णा हजारे (अर्थात गरीब बिचारे) यांची मदत न घेताही कायमचे आपल्यासाठी 'रोजचाल विधेयक' बनवून ठेवले आहे म्हणून!

नाईलाजाने जी मंडळी
चारित्र्यसंपन्न राहतात...
तीच सर्वांत जास्त
भ्रष्टाचारावर बोलतात !!

हे काय आम्ही लिहिण्यातून बोलत आहोत याचे तुम्हाला आश्चर्य वाटेल! हे आश्चर्य वाटले तर तो आमचा नाईलाज आहे, कारण कांद्याचा धंदा पुन्हा गंदा झाला आहे, तर लाल्या आणि मावा नावाचे दोन्ही भाऊ यावर्षीही श्रीयुत कापूसराव यांच्या वावरात मुक्कामाला येणार आहेत. हे एकीकडे आहे तर दुसरीकडे नाईलाजाने केवळ आमच्या भक्तांनाच अर्थात साऱ्या शेतकऱ्यांनाच चारित्र्यसंपन्न जगत राहण्याचे भोग नशिबात आलेले आहेत. या चारित्र्यसंपन्न राहण्यातूनच कधीकधी पोटतिडकीने भ्रष्टाचारावर बोलण्याचा उमाळा येणार आहे तो वांझोटा आहे. या उमाळ्यामागे कोणती भावना आहे, तर ती आहे की,

सदा अंतरी ते देवा
फक्त नोटांना पाही ।
मागणे हे आहे त्यांचे
रोज अन् सदाही ।।

हे आपल्यावरील नियंत्रण स्पष्टपणे गृहीत धरायला हरकत नाही. हे विश्लेषण जरा गूढ आहे हे लक्षात घ्या. आपण सारी भूमीनिष्ठ लेकरं आहोत. आजही त्या काळ्या आईच्या वेडानं पहाटे उठून रोज तिच्याजवळ चालत जातो, तिच्या अंगाखांद्यावर खेळतो, दुपारी तिच्याच पदरावरच्या झाडांच्या बेलबुट्टीखाली झोपतो, तिच आपल्याला ढगांचा पदर ओढून उन्हापासून वाचवते आणि मावळतीला अंगाईसुद्धा म्हणते आणि घरी जाताना 'घर तू सांभाळ, वावरात तर मी आहे,' असे सांगते. तिच्या ओढीपायी चालत, धावत जाऊन येताना जे 'रोजचाल विधेयक' आपल्याला जगावे लागते त्यातून ती हृदयविकाराच्या कारणांकडे करड्या नजरेने पाहावे आणि म्हणूनच पुढचे खर्च होऊ शकणारे किमान ५ लाख ती अखर्चित ठेवून तेवढे अप्रत्यक्ष सेव्हींग आपल्याला देते. हा रोजचाल विधेयकांचा एक फायदा धरला तर,

कशास आपण इकडे तिकडे
चांदणे पाहावे
आपण आपल्या मनात गाणे
मस्त गुणगुणावे

हे छान गाणे म्हणत आयुष्यातले इतर फायदेसुद्धा शोधता येतात. गंमत म्हणून आठवले तर हे लक्षात येते की, आपल्या गावात जी मंडळी छोट्या-मोठ्या, पिटुकल्या अधिकारावर नोकरीला म्हणून बिनमूळाची तणं म्हणून येतात त्यांनासुद्धा विनाकारण खोटी-खोटी गुर्मी चढलेली दिसते. आपण ही गुर्मी पाहतो आणि म्हणतो

आली पाहा याच्या डोक्यावर
उसनीच की हो झापड
चड्डीमध्ये चळचळेल
मारली जर एक थापड!

ठेवणाऱ्या नेत्या अन् पित्यांचे वर्तन पाहून ही भावना सोडून दुसरे काय मनात येणार आहे. कांद्याची निर्यातबंदी राहो अथवा उठो किंवा कापसाचा भाव भविष्यात कोसळो, ही सगळी चिंता सोडून भाद्रपदातल्या या कृष्ण पक्षातल्या पितृपंधरवड्यात एवढेच लक्षात आणा की किडनी फेल झालेल्या अमरसिंगाची बाजू घ्यायला साक्षात जयाप्रदा येऊनही काही उपयोग नसतो तर



शे.भ.प. शेती भक्त परायण)
-'थंडा' महाराज देगलूरकर



भूमीवर खड्डे करून त्या खड्ड्यांत विवरे करून पुढे त्याच्या खाणीतून १६०० कोटी रुपयांची मालमत्ता बनवूनही महान रेड्डी बंधू बेल्लारीकर यांचाही घडा भरतो, पडतो आणि फुटतो. हे सगळे आपल्याला का दिसते आहे? हे सगळे आपल्याला आपले स्थिर, वैभवशाली, शांत, सौम्य आणि स्तब्ध नशीब दाखवते आहे. हे सारे ते का दाखवत आहे तर त्या नशिबाने आपल्याला स्वत:हून आणि अण्णा हजारे (अर्थात गरीब बिचारे) यांची मदत न घेताही कायमचे आपल्यासाठी 'रोजचाल विधेयक' बनवून ठेवले आहे म्हणून!

आजपर्यंत तुम्ही तुमच्या घरच्या त्या जुन्या ब्लॅक ॲण्ड व्हाइट टीव्हीवर किंवा ग्रामपंचायतीत येणाऱ्या पेपरात सतत दोन महिने अण्णांच्या आंदोलनाला तुटक-तुटकपणे पाहिले असेल. शेतकरी मंडळी ही साधीच राहणार हे गृहीत धरून कोणत्याही विधेयकात त्यांच्याविषयी काही मागणे गरजेचे आहे हे कोणालाच पटत नाही; पण चमचमीत खाताना कांदा नसले की जे वाटते ते त्यांना वाटत असणारच असे आपण मनात म्हणले तरी त्याला थापड मारत नाही, कारण असा एखादा विनाकारण आपल्या गावात नोकरी जरी करत असला तरी त्याचे घर तालुक्याला तो ठेवतो. एसटीने, मोटरसायकलने आपल्या गावी येरझारा करतो. हे येरझारा करणारे मच्छर करून करून काय करू शकतात. इथे जरी पैसे खाल्ले तरी तिथे त्यांना खोट्या घरभाडे भत्त्यासाठी पैसे द्यावेच लागतात. काम केले नाही तरी काम केले- काम केले म्हणून खोट्या बोंबा माराव्या लागतात. आपल्या इथे जे काही कमावू शकेल त्याचे वैभव तो त्याच्या गल्लीतही दाखवू शकत नाही, कारण तिथेही तिथले आपल्यासारखे 'रोजचाल विधेयक'वाले त्याला भोळेपणाने प्रश्न विचारतातच की 'वरकमाई फार आहे काय हो!' आता 'खिशात घाल' विधेयकाप्रमाणे जगणारे फारच बेशरम असले तरी कासावीस होतात. खरे तर असे लोक खूप दिसतात आणि अशांचा पुराव्यासह उल्लेख करण्याचीही गरज नाही; पण एकच प्रश्न मनात येतो की, यांचे पितर यांच्याकडे पितृपक्षात आल्यावर हा आशीर्वाद देतात काय की खूप खा- खूप खा. आयुष्यात एकदा माती खा' कारण पितृलोक तर देवलोकाच्या वर आहे म्हणे आणि तिथे एन्ट्री मिळण्यासाठी खूप पूण्य गाठीशी असावे लागते म्हणे. जर पैसे खाणारी अवलाद पैदा केली तर वर त्या पितृलोकाच्या पुढे 'पाप्याचे पितृलोक' आहे काय याची माहिती होणे गरजेचे आहे. एकदा का ही माहिती दिसली की, मग या 'खिशात घाल विधेयका'प्रमाणे जगणाऱ्यांकडून दामदुप्पट वसुली करून 'आय घाल विधेयका'च्या मसुद्याप्रमाणे त्याला गावात फिरवता येईल. हे सगळे करायचीही गरज नाही, कारण दहा हजार स्क्रेअरफूटच्या मोकळ्या वातावरणात आमचे भक्त जगतात ते सुख तर मलबारहिलवरच्या माणसालाही शक्य नाही. ही सगळी पाप्यांची पितरं एका जागी बसून हवा सोडत राहतात, त्यांचे म्हणूनच सांधे दुखतात, लिव्हर सुजलेले असते. शुद्ध हवेत यांना ॲलर्जी होते, बिसलेरी पिली नाही तर हगवण लागते, आयुष्याचा गोडवा हरवल्याने साखरेची व्याधी चिकटते, विकृत विचार करून मेंदू बधीर असतो. ही सगळे नीट तपासून घ्या, मान्य करा आणि हे लक्षात आणा की या मंडळींना पुण्यवंत पित्यांची अवलाद म्हणून जो अधिकार आपण सर्व जनांसाठी, जनहितासाठी, जनजीवन सुसह्य करण्यासाझी दिला होता त्याचाच गैरवापर करून त्यांची पैसे खाण्याची प्रवृत्ती बोकाळली आहे, तीच या भ्रष्टाचाराच्या मुळाशी आहे. हे रहस्य जाणून घ्या आणि यावेळी थोडे न हसवता जरी आमच्या भक्तांशी आम्ही या वाचनातून बोललेले पटले तर हे एक तरी मान्य करा की, अब्ज अब्ज मूल्य असलेली तीन प्राथमिक सुख फक्त रोजचाल विधेयकवाल्यांकडेच आहेत. ती सुखं म्हणजे भूक लागल्यावर ती शमवण्यासाठी काही ना काही न्याहरी, शिदोरी हाती असणे आणि दुसरे सुख म्हणजे रात्री अंथरुणावर पडल्यापडल्या लवकर झोप लागणे आणि तिसरे म्हणजे बद्धकोष्ठाची बाधा नसणे. या मूल्यवान सुखांचा विचार करा आणि आजही आपल्याकडे पितरं खायला गाव येते याचा अभिमान बाळगा अन् म्हणा,

कितीही जरी फिरशील बाबा...
मोठमोठ्या गाड्यांनी
पोलिसांनी पकडून नेता
हाणतील लोक जोड्यांनी

(भारताचे माननीय क्रीडाभूषण सुरेशराव कलमाडी कर्नाटकी पुणेकर यांना पोलिसांनी पकडून नेत असता एका सामान्यजनाने त्यांच्या दिशेने आपला जोडा फेकला होता.)

तथास्तू!!

- **शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
मु. पो. thandamaharaj@gmail.com
टेम्परी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■



मुन्शी प्रेमचंद

अनुवादक - अनंत उमरीकर

भाग तेरा

गोदान

होरीला शेतातलं सारं पीक दंडापायी द्यावं लागलं होतं. वैशाखाचा महिना कसाबसा कटला; पण जेष्ट लागेतो घरात धान्याचा कण पण नाही राहिला. घरात पाचपाच पोट, तेव्हा उपाशी तरी किती दिवस राहणार? उधार घ्यायचं तरी कुणाकडून? गावातल्या छोट्या छोट्या सावकारापासून सुद्धा तोंड लपवावं लागत होतं. मजूरी करावी म्हणलं तर ती तरी कुणाची? घरातंच शेतीची कामं पुष्कळ असायची आता पावेतो. उसाचं पाण भरण होतं; पण उपाशी पोटी ते तरी कसं व्हावं?

सायंकाळची वेळ, बाळ रडू लागलं. आईलाच जेवण नाही मिळालं तर दूध येणार कुठून? सोनाला सारं कळत होतं; पण रुपाचं काय? भाकरीसाठी ती सारखं ओरडत होती. कच्या चिंचा खाऊन दिवस तर कसा बसा टळला; पण आता काही तरी पोटभरी पाहिजे होती ना. दुलारीच्या दुकानाकडे होरी गेला होता; पण ती दुकान बंद करून बाजारात गेली होती. मंगरू सादूनं तर चक्क शिव्या देऊन हाकलून दिलं होतं. ''तीन वर्षांपासून व्याजाचा एक पैसाही दिला नाही आणि वर म्हणे उधार द्या! आता काय मेल्यानंतर देणार काय? नियतच खोटी असली म्हणजे हे असं होतं. देवाला सुद्धा ही अनियती पाहवत नाही. कारकुनानं गुरकावलं, की कसे पटकन पैसे दिले! आणि माझे पैसे? बायको तर अशी, की तिची शानंच काही और!''

तिथून तो घरी आला तेव्हा पुनिया विस्तव घ्यायला आली होती. स्वयंपाकघराच्या दारात जाऊन तिनं पाहिलं तो सारा अंधार होता. ते पाहून ती धनियाला म्हणाली, ''भाभी, आज भाकरी नाही का करायची? वेळ तर झाली आहे ना?''

गोबर पळाल्यापासून दोघीत बोलणं सुरू झालं होतं. ती होरीचे उपकार मानायला लागली होती. ती हिराला आता शिव्या द्यायची. म्हणायची, ''खूनी कुठला गायीची हत्या करून पळाला. तोंडाला काळ लागलं. आता तोंड दाखवी कसं? आणि आला तर त्याला घरात पाय ठेवू देणार नाही. गोहत्या करताना लाज नाही वाटली. पोलिसांनी पकडून नेलं



असतं तर किती बरं झालं असतं!''

धनियानं आढेवेढे न घेता सांगितलं, ''घरात दाणा नाही. भाकर भाजायची कशी? तुझ्या भाव्यानं भावकीचं पोट भरलं, इकडे पोर जगो, की मरो. आता बिरादरी येते का पहायला?''

पुनियाला यावर्षी पीकपाणी चांगलं झालं होतं आणि हे सारं होरीमुळे हेही तिला मान्य होतं. हिरा होता तेव्हा एवढी बरकत कधीही आली नव्हती हेही ती मान्य करत होती. तेव्हा ती म्हणाली, ''भाभी, मला का नाही मागितलं? सुखाच्या दिवसात भांडावं; पण दुःखाचे दिवस वाटून घ्यावेत. माणूस न ओळखण्या एवढी मी आंधळी आहे, की काय? महतोनं मला सांभाळलं नसतं तर कुणी आसरा दिला असता?'' सोनाला घेऊन पुनिया आल्या पावली परत गेली आणि तिच्या सोबतीनं दोन डाली धान्य आणून ठेवलं अंगणात. धनिया काही म्हणायच्या आत ती परतली सुद्धा आणि एक मोठं डालगं भरून डाळ घेऊन आली आणि म्हणाली, ''चला, आता मीच चूल पेटवते.'' धनियानं पाहिलं तर एका टोपल्यात धान्याच्या जोडीला पीठ पण होतं. आयुष्यात पहिल्यांदा आज तिला हारल्यासारखं वाटलं. भरल्या गळ्यानं ती म्हणाली, ''घरातलं सगळंच आणलं, की काही शिल्लक ठेवलंस?''

अंगणात झुनियाचं बाळ खाटेवर पडून रडत होतं. त्याला जवळ घेऊन प्रेमानं खेळवत पुनिया म्हणाली, ''तुमच्या कृपेनं आणखी पुष्कळ आहे भाभी. पंधरा मण जव, दहा मण गळू आणि पाच मण मटर झालंय. तुमच्यापासून काय लपवणार? दोन तीन महिन्यात मका येईल. त्यापुढे परमात्मा आहे.''

झुनिया येऊन पदरानं पुनियाच्या पायाचा स्पर्श केला. सोना चूल पेटवायला रूपा पाणी आणायला गेली आणि होरीच्या घरची थांबलेली गाडी मार्गी लागली. प्रवाहातले अडथळे दूर झाले आणि मधूर खळखळ करीत प्रवाह शांतपणे परत व्हायला लागला. पुनिया म्हणाली, ''भावकीला दंड देण्याची एवढी काय घाई लागली होती?''

धनिया म्हणाली, ''भावकीत नाव कसं मोठं झालं असतं?''

''भाभी, वाईट वाटून घेऊ नका; पण एक सांगते.''

''वाईट का वाटावं?''

''तुम्ही रागवणार तर नाही ना?''

''म्हणत्ये ना, रागवणार नाही म्हणून!''

''झुनियाला घरात घ्यायला नको होतं.''

''तिनं जीव दिला असता. मग मी काय करणार?''

''माझ्या घरात ठेवायचं. तेव्हा तर कुणी काही म्हणलं नसतं.''

''हे तू आज म्हणतेस. त्या दिवशी झुनियाला पाठवलं असतं तर झाडू घेऊन पाठीमागे लागली असतीस.''

''एवढ्या खर्चात तर गोबरचं लग्नही झालं असतं!''

''होणाऱ्या गोष्टीला कोण टाळू शकतं? आणखी एवढ्यानं बला नाही टळली. भोला गायीची किंमत मागतो आहे. गाय देताना म्हणाला होता, माझं लग्न जमवून द्या. आता म्हणतो मला लग्न वगैरे काही करायचं नाही. माझे पैसे मला द्या. त्याची दोन्ही मूलं काठी घेऊन फिरताहेत. आपल्यासाठी काठी घेऊन कोण फिरणार आहे? या गायीनं आपला पुरता नाश करून टाकलाय!''

काही इकडच्या तिकडच्या गोष्टी करून विस्तव घेऊन पुनिया गेली. होरी दोघींचं सर्व बोलणं ऐकत होता. आत येऊन म्हणाला, ''पुनिया मनानं चांगली आहे.''

''हीरा सुद्धा मनानं चांगलाच होता.''

धनियानं धान्य भलेही ठेवून घेतलं असेल; पण ती मात्र स्वतःला अपमानितंच समजत होती. हा काळाचा महिमा आहे आणि आपल्याला खाली पाहवं लागत आहे असं तिला वाटत होतं.

''तू कुणाचे उपकार मानत नाहीस ही तुझ्यात खोड आहे.''

''उपकार काय मानायचे? माझ्या नवऱ्यानं तिचं घर नाही सांभाळलं? आणि मी काही दान नाही घेतलं. एक एक दाणा परत करीन.''

पुनियाला हे सारं समजत होतं. तरी ती भाव्याचे उपकार फेडत होती. जेव्हा जेव्हा धान्य संपायचं तेव्हा तेव्हा ती परत परत धान्य आणून द्यायची; पण पुढे चातुर्मास आला आणि पाऊस नाही पडला तेव्हा मात्र समस्या गंभीर झाली. श्रावणात विहिरीचं पाणी आटायला लागलं. उस उन्हात वाळायला लागला. नदीचं पाणी आधी थोडं थोडं मिळत होतं. हळूहळू तेही बंद झालं. ठिकठिकाणी चोऱ्या व्हायला लागल्या, डाके पडायला लागले. सगळीकडे हाहाकार माजला. सुदैवानं भाद्रपदात पाऊस पडला आणि शेतकरी आनंदले. पाऊस पडला त्या दिवशी लोकांत प्रचंड उत्साह होता. असं वाटत होतं, आकाशातून पाणी नाही पैसा पडत होता! शेतात गडी माणसं औत चालवायला लागले आणि पोरंसोरं तलाव, नदी नाले पाहत फिरायला लागले. तलाव पाहिला की, ''अरे वा! तलाव तर अर्धा मुर्धा भरलाय. मग खड्डेही भरले असतीलंच चला तिकडे पाहूया!''

पण आता पाऊस कितीही पडला तरी उस तर गेलाच होता. मका आणि ज्वारी होती; पण ती पुरती वाढणार नव्हती. त्यातून कराचा भरणा होऊ शकत नव्हता आणि सावकाराचं देणंही देता येणार नव्हतं. मात्र जनावरासाठी चारा आणि माणसासाठी पोटापुरतं धान्य मिळू शकणार होतं.

माघाचा महिना गेला तरिही होरीनं पैसे न दिल्याने रागारागात भोला घरी आला. ''हीच तुमची जबान का? उसावर पैसे द्यायचा वायदा तुम्ही केला होता ना? द्या आता माझे पैसे!''

सर्व प्रकारे विनवूनही भोला दारावरून सरकायला तयार नव्हता. तेव्हा होरी त्याला म्हणाला, ''महतो, यावेळी तर माझ्याकडे काहीही नाही. मीच दाण्या दाण्यासाठी मोहताज आहे. विश्वास बसत नसेल तर घरात येऊन पहा. जे काय असेल ते घेऊन जा!''

''तुमच्या घरात मी कशाला जाऊ? तुमच्याजवळ पैसे आहेत, की नाहीत याच्याशी मला काही घेणं देणं नाही. तुम्ही उसावर पैसे देतो म्हणाला होता ते आता द्या!''

''मग तुम्ही म्हणाल ते करायला मी तयार आहे; पण आता तर माझ्याकडे पैसे नाहीत.''

''पण मी काय सांगू?''

''मी तर तुमच्यावर सोडतो आहे.''

''मी तुमचे दोन्ही बैल घेऊन जातो.''

होरी विस्फारल्या डोळ्यांनी त्याच्याकडे बघत राहिला. त्याचा त्याच्या कानावर विश्वास बसेना. शेवटी हताश होऊन तो खाली बसला, मान खाली घालून. भोला त्याला भिकारी करू इच्छित होता का? दोन्ही बैल जाणं म्हणजे तर शेतकऱ्याचे दोनही हात कटणं. अत्यंत करुण शब्दात तो म्हणाला, ''बैल नेले तर माझे दोनही हात कापल्यासारखं होईल. माझा सर्वनाश होईल. तुमचा धर्म हेच सांगत असेल तर घेऊन जा दोन्ही बैल!''

''तुमचा नाश होण्याशी मला काही घेणं देणं नाही. मला माझे पैसे पाहिजेत.''

''आणि मी म्हणालो, मी पैसे दिलेले आहेत तर?''

यावर काय म्हणावं ते काही भोलाला सुचेना. होरी असा बेईमान होईल असं तर त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं. तो रागा रागात म्हणाला,

''तुम्ही हातात गंगाजल घेऊन म्हणालात तर मी गप्प बसेन!''

''तसं म्हणायला एक मन तर करतं; पण मी तसं करणार नाही.''

''तुम्ही तसं करूच शकत नाही.''

''हो बाबा, मी तसं नाहीच करू शकत. थट्टा करू लागलो.'' होरीसुद्धा क्षणभर मनस्थितीत आला आणि म्हणाला, ''हो बाबा, मी तसं नाही म्हणू शकत हे खरं आहे. भोला दादा, माझ्याशी एवढं वैर का धरता? झुनिया माझ्या दारात आली म्हणजे मला स्पर्ग मिळाला का? पोरगा तर घर सोडून गेला. दोनशे रुपये दंड भरावा लागला तोही वेगळा. मी तर चोहीकडून संपलो आणि आता तुम्ही माझ्या मागे लागलात! देवालाच ठाऊक, मला माझा मुलगा काय करत होता हे खरंच माहित नव्हतं. मला तर वाटत होतं गाण वाजवायला जातो आहे. ज्या दिवशी अर्ध्या रात्री झुनिया घरी आली तेव्हा सारं समजलं. त्या दिवशी तिला मी घरात घेतलं नसतं तर तिनं काय केलं असतं याची कल्पना करा दादा.''

झुनिया बैठकीच्या दाराआड उभी राहून सारं ऐकत होती. बापाला तर ती आता बाप नाही तर शत्रू समजत होती. होरी बैल देऊन टाकतो, की काय या कल्पनेनही ती घाबरली होती. आत जाऊन रूपाला ती म्हणाली, ''जा आणि आईला ताबडतोब बोलावून आण. म्हणावं फार जरूरी काम आहे.''

धनिया शेतात खत पसरायला गेली होती. निरोप मिळताच ताबडतोब आली आणि विचारलं, ''कशाला एवढ्या तुरत बोलावलं गं? मी तर घाबरून गेले.''

''तुम्ही बाहेर काका बसलेत ते पाहिलंत ना?''

''हो पाहिलंय. कसायासारखा दारात बसलाय. मी तर बोललेही नाही.''

''आपले दोन्ही बैल मागायलेत ते!''

धनियाच्या पोटात तर गोळाच उठला. ''दोन्ही बैल मागायलेत?''

''हो! म्हणताहेत एक तर आमचे पैसे द्या, नाही तर बैलं तरी द्या.''

''मग दादा काय म्हणाले?''

''दादा म्हणाले, तुमचा धर्म तसं मानत असेल तर घेऊन जा.''

''तर घेऊन जाऊ दे. या दारात येऊन मी भीक नाही मागितली तर माझ्यावर थुंका. आमच्या रक्तानं त्याची छाती भरून येत असेल तर भरू दे.'' तशीच रागारागानं बाहेर येऊन ती म्हणाली, ''महतो, दोनही बैल मागताहेत तर देऊन का टाकत नाही? त्यांचं पोट तेवढ्यानं भरतंय तर भरू द्या. आपल्या पाठिशी देव आहे. आपले हात तर नाही ना कापून घेणार? आजपर्यंत आपण आपलीच मजूरी करत होतो आता लोकांची करू. देवाची कृपा झाली तर बैलंही परत येतील. मजूरी करावी लागली तर त्यात वाईट काय आहे? ओला, सुका दुष्काळाची भीती तर राहणार नाही ना. मला काय माहित हे आपले वैरी आहेत म्हणून. नसता गाय कशाला घेतली असती? तिचे पाय घराला लागले तेव्हापासून सर्वनाश झालाय!''

भोलानं आतापर्यंत भात्यात राखून ठेवलेला बाण भात्याबाहेर काढला. त्याला आता पुरता विश्वास आला, की बैलाशिवाय यांच्याकडे दुसरं काही नाही. तेव्हा बैल वाचवायला ते वाटेल ते करायला तयार होतील. एखाद्या कुशल तिरंदाजासारखा नेम धरून तो म्हणाला, ''तुमची बेइज्जत व्हावी आणि आम्ही मात्र आरामात राहावं असं तुम्हाला वाटत असेल; पण तसं होणार नाही. तुम्ही तुमच्या दोनशे रुपायासाठी रडत आहा, इथे तर लाख मोलाची इज्जत गेली आहे. तुमचं भलं यातंच आहे, की तुम्ही जसं झुनियाला घरात घेतलं तसं तिला काढून टाका. मग मी गायीचे पैसे मागीन न बैल नेईन! तिनं आमचं नाक कापलं आहे, तेव्हा आम्हाला सुद्धा तिला रस्त्यावर भीक मागताना पहायचं आहे. तिनं इथे राणी बनून आराम करावा आणि तिकडे आम्ही अंधारात तोंड लपवून बसावं हे यापुढे चालणार नाही. ती माझी मुलगी आहे आणि मी तिला माझ्या अंगा-खांद्यावर खेळवलं आहे. देवाच्या साक्षीनं सांगतो मी तिला कधीही मुलापेक्षा कमी नाही समजलो; पण आता तिला रस्त्यावर भीक मागताना पाहून मन शांत होईल. बाप असूनही मी माझं मन एवढं कठोर केलं आहे. यावरून माझ्या मनावर केवढा आघात झाला असेल याची कल्पना करा. या काळतोंडीनं आमच्या सात पिढ्यांचं नाव बदनाम केलंय आणि तरी तुम्ही घरात ठेवून घेतलंय म्हणजे माझ्या जखमेवर मीठ चोळल्यासारखं आहे.''

ते सारं ऐकणाऱ्या धनियानं तर जणू एक लक्ष्मण रेषाच ओढली. ती म्हणाली, ''महतो, तर आता माझं म्हणणं ऐका. तुम्ही जे म्हणता ते तर कधीच होणार नाही. शंभर जन्म घेतले तरी नाही. झुनिया आमच्या काळजाचा तुकडा आहे. तुम्हाला बैल न्यायचे आहेत, खुशाल न्या; पण हिच्यामुळे कापल्या गेलेलं नाक आणि सात पिढ्यांची गेलेली इज्जत वाचणार असेल तर जरूर वाचवा. झुनियाकडून जरूर चूक झाली आहे. ज्या दिवशी तिनं माझ्या घरात पाय ठेवला त्या दिवशी मी तिला झाडूनं मारायला निघाले होते; पण जेव्हा मी तिच्या डोळ्यात पाणी पाहिलं तेव्हा मला तिची दया आली. महतो, तुम्ही आता म्हातारे झालात; पण याही वयात लग्न करायची तीव्र इच्छा आहे. मग ती तर आणखी पोरगीच आहे!''

भोला होरीकडे पाहत म्हणाला, ''ऐकलं का हिचं बोलणं? आता तर मी बैल नेल्याशिवाय राहणार नाही.''

होरी निश्चयपूर्वक म्हणाला, ''घेऊन जा!''

''पण नंतर म्हणू नका, बैल नेले म्हणून!''

''नाही म्हणणार.''

भोला बैलाचं दावं सोडणार तोच झुनिया ठिकठिकानी ठिगळ लावलेली साडी नेसून बाळाला कडेवर घेऊन आली आणि कापऱ्या आवाजात म्हणाली, ''काका, मी या घरातून निघून जाते आणि तुमच्या इच्छेप्रमाणे या पोराला घेऊन भीक मागते आणि आमच्या दोघांचं पोट भरते आणि ज्या दिवशी भीक मिळणार नाही त्यादिवशी जीव देईन!''

भोला चिडून म्हणाला, ''दूर हो माझ्या नजरेपासून. तुझं तोंड पहायची वेळ परत मला येऊ नये. कुलक्षणी, कलंकिनी! आता तू बुडून मेलेली बरी!''

झुनियानं त्याच्याकडे पाहिलंही नाही. तिला प्रचंड राग आला होता; पण तिच्या रागात हिंसेची भावना नव्हती, तर समर्पण होतं. धरती फाटून तिला हृदयात घेतलं असतं तर तिला ते पाहिजे होतं. तिनं बाहेर पडायला एक पाऊल उचललं आणि ती दोन पावलं जाते तोच धनिया धावत आली आणि तिला पकडून स्नेहमयी भाषेत म्हणाली, ''सूनबाई, तू कुठे चाललीस? हे घर तुझं आहे. आम्ही जिवंत असेपर्यंत आणि त्यानंतरही हे घर तुझं आहे.'' आपल्या अपत्याशी वैर धरणारे मरू देत असे शब्द या माणसाच्या तोंडून निघतात याची लाज नाही वाटत? मला धमकी देतो आहे हा नीच माणूस. अरे घेऊन जा आणि पी रक्त या बैलांचं!

रडत रडत झुनिया म्हणाली, ''आई माझा बापच जिथे माझा धिक्कार करतो आहे तिथे जगण्यात काय अर्थ आहे. माझ्यामुळेच तर तुमच्यावर संकट कोसळली आहेत. जेव्हापासून घरात आले, घर लयाला जात आलं. तुम्ही एवढे दिवस ज्या प्रेमानं सांभाळलं तेवढ्या प्रेमानं तर आईनंही सांभाळलं नसेल. देवानं मला पुन्हा जन्म दिला तर

तो तुमच्या पोटीच द्यावा असंच मला वाटतं.''

तिला प्रेमानं जवळ ओढत धनिया म्हणाली, ''हा तुझा बाप नाही, वैरी आहे मारेकरी आहे. आई असती तर तिला काळजी वाटली असती. त्याची बायको असती तर तिनं त्याला खोऱ्यानं मारलं असतं.'' झुनिया धनियाच्या मागे मागे घरात गेली. तिकडे भोलानं दोन्ही बैल सोडले आणि त्यांना घेऊन तो निघाला. आता करा म्हणावं शेती आणि वाजवा बासरी. माझा अपमान करायचा होता ना कोणत्या जन्माचं वैर काढलं कोण जाणे? अशी मुलगी कोण चांगला माणूस घरात ठेवून घेईल? सगळेच्या सगळे बेशरम झालेत. पोराचं कुठे लग्न होत नव्हतं म्हणून हा प्रकार आणि या झुनियाची हिंमत तर बघा. सटवी माझ्यासमोर उभी राहिली. दुसरी कुणी असती तर तोंड दाखवलं नसतं. डोळ्यातलं पाणी संपलंय. त्यांना वाटतं झुनिया आज त्यांची झाली. त्यांना हे कळत नाही जी बापाच्या घरात नाही राहिली ती दुसऱ्याच्या घरात काय राहते. काळ वाईट आहे. नसता भर बाजारात हिचे केस धरून तिला फरफटलं असतं. मला किती शिव्या देत होती ही धनिया?

त्यानं दोन्ही बैलाकडे पाहिलं. किती तयार होते बैल? चांगली जोडी आहे. यांना कुठेही शंभर रुपयात विकता येईल. माझे पैसे तर वसूल झाले! तो आणखी गावा बाहेरही नाही पडला तो त्याच्या मागे दातादीन, पटेश्वरी, शोभा आणि दहा बाराजण पळत आले. ते पाहून भोला तर थंड पडला. आता बैलंही जातील, मारही पडेल आणि फौजदारीही होईल. अशी भीती त्याला वाटली. मरायची वेळ आली तर लढून मरेन असाही विचार केला त्यानं.

दातादीन जवळ येऊन म्हणाला, ''हे काय केलंस तू भोला? त्याचे बैल सोडून आणतेस! तो काही बोलला नाही म्हणून तू शेर झालास? सगळे लोक आपापल्या कामात होते म्हणून कुणाला कळलं नाही. होरीनं नुसती खूण केली असती तर तुझी काही खैर नव्हती. तुझं काही भलं व्हायचं असेल तर बैल घेऊन माघारी फिर. एवढी सुद्धा माणुसकी नाही तुझ्यात?''

पटेश्वरी म्हणाला, ''तो सरळ सीधा माणूस आहे. म्हणून त्याच्या वागण्याला हे असं फळ आलंय. तुला त्याच्याकडून पैसे येणं आहेत तर दावा डिक्री करून घे. बैल सोडून आणायचा तुला काय अधिकार आहे? तुझ्यावर फौजदारी ठोकली तर हातकड्या पडतील.''

भोला नरमाईनं म्हणाला, ''लाला, मी बळजबरीनं बैल नाही नेत. होरीनं स्वतः दिले.''

पटेश्वरी शोभाला म्हणाले, ''तू बैल माघारी घेऊन जा. शेतकरी सुषीनं बैल देत नाहीत. तो तर बैलांना औताला लावत असतो.''

भोला बैलासमोर उभा राहिला आणि म्हणाला, ''माझे पैसे द्या, बैल घेऊन मी काय करणार?''

''आम्ही बैल घेऊन जात आहोत. पैशासाठी दावा लाव. नाही तर तुला शेकून काढू. तू नगदी रुपये दिले होतेस का? एक कुलक्षणी गाय त्याच्या माथी मारलीस आणि आता त्याचे बैल सोडून नेतोस.''

भोला बैलासमोरून बाजूला झाला. अशा पवित्र्यात, की परतावं लागलं तर मार खाऊनंच. वादविवादात पटेश्वरीवर कशी काय मात करू शकणार? दातादीन एक पाऊल पुढे आला आपली वाकलेली कंबर सरळ करीत त्यानं सर्वांना आव्हान दिलं, ''तुम्ही सगळे उभं राहून काय पाहताय? तयाला मारून पळवून लावा.''

बन्सी तगडा जवान होता. त्यानं एक जोरदार धक्का भोलाला दिला. तोल जाऊन भोला खाली पडला. उठण्याचा प्रयत्न तो करतो तोच बन्सीनं ठोसा लगावला. आता होरी पळत पळत येत होता हे पाहून त्याच्याकडे जात भोला म्हणाला, ''इमान घेऊन सांगा महतो, मी जबरदस्ती करून बैल सोडले का?''

दातादीन त्याच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट करत म्हणाले, ''तो म्हणतो, की होरीनं खुषीनं आपले बैल दिले. आम्हाला मूर्ख करतो आहे.''

संकोचत होरी म्हणाला, ''हा म्हणाला एक तर झुनियाला घराबाहेर काढून द्या, नाही तर पैसे तरी द्या, नाही तर मग बैल द्या. मी म्हणालो मी बहुला घराबाहेर काढणार नाही आणि माझ्याजवळ तर पैसेही नाहीत. जर तुझा धर्म परवानगी देत असेल तर बैल सोडून ने!''

''तू जर त्याच्या धर्मावर सोडलंस तर कुठली आली जबरदस्ती? त्याचा धर्म बैल न्यायची परवानगी देतो. जा बाबा जा. बैल घेऊन जा!''

दातादीनही म्हणाले, ''हां बाबा, धर्माचा प्रश्न आला तर आम्ही काय करणार?''

सगळेजण होरीकडे तिरस्कारानं पाहत परत फिरले. भोला बैलांना घेऊन विजयी मुद्रेनं त्याच्या गावाकडे निघाला.

आपल्या प्रांतात काही एक घटना घडल्याची बातमी रायसाहेबांना लागली. होरीकडून गावच्या लोकांनी दंड वसूल केल्याचं कळल्याबरोबर त्यांनी नोखेरामला ताबडतोब बोलावून घेतलं आणि चौकशी केली, ''मला ताबडतोब बातमी का नाही दिली? अशा दगाबाज माणसाला माझ्या दरबारात काहीही स्थान नाही.'' रायसाहेबांनी नोखेरामला खूप शिव्या घातल्या.

तेव्हा चिडून तो म्हणाला, ''मी एकटाच नव्हतो तर गावचे बाकी पंचही होते. माझ्या एकट्याच्या हातात काय होतं?''

नोखेरामच्या वाढत्या पोटाकडे नजर टाकत ते म्हणाले, ''उगाच बडबड करू नकोस. त्याच वेळेस तू सांगायला पाहिजे होतंस, की मी सरकारला सांगितल्या शिवाय दंड वसूल करणार नाही. मी आणि माझी रयत यांच्यात दखल द्यायचा पंचांना काय अधिकार आहे? या दंडाची रक्कम गावानं खाल्ली. कराची बाकी आसामींनी दिलीच नाही. जी काय वसुली झाली ती मी सरकारात जमा केली. आता मी काय तुमचं डोकं खाऊ? हा लाखो रुपयांचा खर्च होणार कसा? दोन पिढ्यापासून तुमचं खानदान गावची कामगिरी करतंय आणि आता तुम्हाला हे शिकवणं माझ्या नशिबात आलंय. होरीकडून किती रुपये वसूल केले?''

नोखेराम घाबरून म्हणाला, ''ऐंशी रुपये!''

''नगदी?''

''नगदी कुठले आले? त्यानं काही धान्य दिलं बाकी घर गहाण ठेवलं.''

रायसाहेबांनी यावेळी होरीची बाजू उचलली.

क्रमशः

- अनंत उमरीकर

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

शेतकरी महिला आघाडी


शेतमालाच्या भावासाठी लढताना तुरुंगवास भोगलेल्या मायबहिणींचा देशातील सर्वांत मोठी महिला संघटना- शेतकरी महिला आघाडीकडून

शेतकरी संघटना

कृषी वीरांगना गौरव

हस्ते

मा. आ. सरोजताई काशीकर



प्रमुख उपस्थिती

मा. उज्ज्वला नरदे

(पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख महिला आघाडी शेतकरी संघटना)

मा. गीता खांडेभराड

(मराठवाडा विभागप्रमुख महिला आघाडी शेतकरी संघटना)

निमंत्रिका

शबाना मुल्ला, विद्या शिंदे,
नेहा कदम, स्वाती वंजाळे

संपर्क

मो. ८००७५४८०९८,
९७३०६७८७८१

रविवार दि. २५ सप्टेंबर २०११ रोजी दुपारी १२ वाजता
स्थळ : इंगळे सभागृह, तिसरी गल्ली, जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर